म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.
५ २१७८८

म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक ... खरे | सन |
|---|---|---|
| ११२०० | | |
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव संगीत-विपाक | |
| २३६ | २३५ संगीतविपाक नाटक | |

५२

नाटक

## प्रस्तावना.

नाटकें व कादंबऱ्या वाचण्याची मला स्वभावतः फार आवड असल्यामुळें, एखादें नाटक लिहावें, असें माझ्या मनांत येऊन, मीं हें नाटक लिहिण्यास प्रारंभ केला. नाटकाचा शेवट गोड व्हावा ह्मणजे तें आनंद-पर्यवसायी असावें, असा माझा मूळ उद्देश होता प[...] टक बरेंच पूर्ण होत आल्यावर मीं तें येथील 'सा[...] सभेपुढें वाचून दाखविलें. त्याप्रसंगीं, मराठी भा[...] पर्यवसायी नाटकांची फार उणीव आहे, व जितका शोक-पर्यवसायी अशा नीतिबोधदर्शक नाटकाचा ठसा [...] पहाणाऱ्यांच्या किंवा वाचणाऱ्यांच्या मनावर पूर्णपणें [...]टतो तसा आनंदपर्यवसायी नाटकाचा उमटत [...] असें कित्येक विद्वान् व ग्रंथकर्तृत्वा[...] मार्गी चोखळलेल्या मित्रांचे उद्गार निघाले [...] शोकपर्यवसायीच केलें व [...]ऱ्या सर्व [...] येथील सिटी हायस्कुलांतील [...] भूमीवर आणून त्याचा प्रयोगही क[...]

पुढें कोल्हापूर येथील [...] का[...]जचे प्रिन्सिपाल ह्यांनीं, 'नवीन नाटक [...] तयार करून धाडण्याविषयीं, व पसंत पडेल त्या नाटकास १५० रुपये बक्षीस दिलें जाईल ' अशा अर्थाची जाहिरात [...] केली होती, ती वाचून हें नाटक कोल्हापूरच्या, म[...] नाटक ग्रंथोत्तेजक विद्वत्समाजापुढें परीक्षणार्थ पाठवावें असें माझे

मनांत आलें, व त्याप्रमाणें मीं आपल्या मित्रांचें अ[illegible]न घेऊन हें नाटक तिकडेस पाठविलें. सुदैवानें माझा हा अल्प प्रयत्न आलेल्या सर्व नाटकांत पसंत ठ[illegible] पण परीक्षक कमिटीनें संविधानक आनंदपर्यवसायी [illegible]ल तर बक्षीस मिळेल अशी सूचना केल्यावरून अ[illegible] संविधानक जुळण्याकरितां ठिकठिकाणीं बरेच फेरफार करावे लागले व शेवटचे दोन प्रवेश तर अगदीं नवे तयार करावे लागले.

[illegible] लिहिण्याचा हा माझा पहिलाच प्रयत्न तेव्हां [illegible]पेक्षां दोषच अधिक दृष्टोत्पत्तीस येतील यांत [illegible]. ह्याकरितां ह्या पुस्तकाच्या वाचकांस मी व[illegible]हेत[illegible]प्रमाणें हंसक्षीर न्यायानें माझ्या पुस्तका[illegible] [illegible]ण्याविषयीं विनंती न करितां माझ्या गुणदोषांचें पूर्णपणें [illegible]न करून, दुसऱ्या प्रयत्नाच्या प्रसंगीं मला अधिक [illegible] करण्याकरितां, त्यांनीं आपआपले अभिप्राय माझ्या[illegible]ल्पणें [illegible]हून धाडावेत अशी त्यांना सविनय [illegible]

[illegible] कथान[illegible] ह्मटलें असतां लांबलचक [illegible]हे असें कांहीं नाहीं, व तें काय [illegible]त सांगण्याची विशेष जरूरीही दि[illegible]सत नाहीं [illegible]कांस वाचतांवाचतां सहज समजण्यांत जी मौज आहे [illegible] प्रथमारंभींच समजाविण्यांत नाहीं असें माझ्या अल्प बुद्धीला वाटतें.

हें नाटक लिहितेवेळीं रा. रा. हरी माधव पंडित, व रा. रा. केशव रामचंद्र गाडगीळ व इतर मित्रमंडळींनीं मार्मिक व उपयुक्त सूचना वेळोवेळीं केल्या ह्याबद्दल त्यांचा

मी [illegible]र आभारी आहें, तसेंच मेसर्स डी. व्ही. गाधले आ[illegible] कंपनी ह्यांनीं हें पुस्तक मुंबईस फार[illegible] थोडया मुदतींत [illegible]पून दिलें ह्याबद्दल त्यांचा व रा. रा. विनायक कोंडदेव [illegible]क [illegible]ांनीं अंतःकरणपूर्वक ह्या ग्रंथाचें मुद्रण चाललें अ[illegible]त्याचें शोधन केलें ह्याबद्दल त्यांचाही मी अत्यंत आभारी आहें.

दत्तो विनायक गोखले.

नागपूर,

ता० २२ डिसेंबर सन १८८६.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं० [illegible]
ठाणें सन १[illegible]

# नाटकांतील पात्रें व शहरें

---

| | |
|---|---|
| गोपाळराव ........ | सोलापुरांतील श्रीमान् गृहस्थाचा मुलगा. |
| सरस्वती ........ | गोपाळरावाची पत्नी. |
| वासुदेवराव ........ | सोलापुरांतील श्रीमान् गृहस्थाचा मुलगा व गोपाळरावाचा मित्र. |
| रमाबाई ........ | वासुदेवरावाची पत्नी. |
| ................ | गोपाळरावाचे वडील. |
| ................ | गोपाळरावाची मातोश्री. |
| शिवरामपंत ........ | गोपाळरावाचे घरांतील कारकून. |
| गणेशपंत ........ | वासुदेवरावाचा कारकून. |
| भागी ........ <br> गजी ........ | रमाबाईच्या कुणबिणी. |
| लक्ष्मीबाई ........ <br> पार्वतीबाई ........ <br> कृष्णाबाई ........ <br> वेणूआका ........ | सोलापुरांतील सभ्य गृहस्थांच्या बायका. |
| आपा ........ <br> मामा ........ | गोपाळरावाचे वडिलांचे मित्र. |
| कृष्णराव ........ | वासुदेवरावाचा पुण्यांतील दांभिक मित्र. |
| बळवंतराव ........ | कृष्णरावाचा मित्र. |
| सावित्रीबाई ........ | कुंटीण व स्वयंपाकीण. |
| विश्वासराव ........ | गोपाळरावाचे कचेरींतील कारकून. |

गणपतराव……… एक गृहस्थ.
गंगाजी……… पुण्याची नायकीण.
……………… जोगळेकराचा गुमास्ता.
जयाजी……… कृष्णरावाचा नोकर.
रामचंद्र……… गोपाळरावाचा ब्राह्मण.
बाळू चव्हाण…… पाहरेकरी.

इतर चाकर वगैरे.

मुख्य स्थळ पुणें.

# संगतिविपाक नाटक.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

स्थल—सोलापूर—लेल्यांचा वाडा.

दिवाणखान्यांत केलेली गौरीची आरास.

( गणेशपंत आरास करण्यांत गुंतले असतां रमाबाई येते ).

रमाबाई—गजे, अग गजे, ( गजी येते ) अग, सरस्वतीला बोलावायला तूं जाणार तरी केव्हां? दोन वाजून गेले. आतां बायकांच्या झुंडींच्याझुंडी येतील बरं का. त्या आल्यावर का तूं तिला बोलवायला जाणार?

गजी—न्हाई बाईसाब. ही निघालें बगा. हंग त्यास्नी घेऊन आलेंच.

रमा०—जा तर लौकर. तिला ह्मणावं, मी केव्हांची तुझी वाट पहात बसलें आहें. यायचं असलं तुझ्या मनांत तर सासूबाईंना विचारून लौकर ये, नसलं यायचं तर तसं सांग ह्मणावं. असें सांगशील तेव्हां ती येईल.

गजी—बर हाय. ( गजी निघून जाते ).

गणेशपंत—का बाईसाहेब, हा थाटमाट आपल्या मनाजोगा झाला ना?

रमा०—हें काय विचारावें गणेशपंत! तुह्मी मनावर घेतल्यावर काय नाहीं होणार? गतवर्षीच्या थाटमाटाला आणि यंदाच्या किती सूट आहे पण! फारच आहे.

खरेंच. ही आरास पाहिल्याबरोबर सगळ्या बायकांना नवलच वाटेल.

गणेशपंत–मग चिंता नाहीं. आपल्या मनास आलें म्हणजे झालें.

रमा०–इतकी खटपट करून केलेलें कोणाच्या मनास नाहीं येणार ? मग मी मोठी शहाणीच म्हणायची ! तुम्ही मात्र आज फार थकलां. चला आंत जेवायला. भुकेनें अगदीं गळून गेलां असाल.

गणेशपंत–हा स्नानास निघालोंच. ( गणेशपंत जातो. )

रमा०–( आंत बाहेर जाऊन ) काय बाई ! दोन तीन बोलावणीं झालीं. आतां ही सरस्वती येणार तरी केव्हां ? भागे, ( भागी येते ) बाहेर जा आणि तिकडच्या रस्त्यानें सरस्वतीचा मेणा येत आहे कां पहा बरें.

भागी–( बाहेर जाते व परत येऊन ) आला बाइसाब मेना, व्हई व व्हई. त्यांचाच हाय. त्ये बघा. त्यांच्याच मेन्याच भुई हालता.

( सरस्वतीस घेऊन गजी येते. )

रमा०–वा: ! लवकर आलीस, बरें सरस्वती ! तूं आज [illegible] विहिणी सारखें काय ओढून धरलें होतेंस ? एका पाठीमागून एक, एका पाठीमागून एक अशीं सतरा बोलावणीं पाठविलीं, तरी आपला तुझा कसला तो ठिकाण नाहीं !

सरस्वती–अग, करूं तरी कसें ? यावें खरें, पण वाट तर हवी ?

रमा०–वाट हवी म्हणजे ?

सरस्वती–अग, सासूबाईला मी विचारून केव्हांची या-

मला निघालें होतें; पण खुर्च्या टाकून वाटेवरच्या दिवाणखान्याच्या खिडकींतच, वासुदेव भाऊजी, बरोबर बोलत बसले होते. ते असतांना आंगावरून येऊं तरी कशी? अर्धी भाऊजींना थट्टा करायला नको! मग इकडे येतांना मला पाहिली असती, म्हणजे अगदीं माझी फजीतीच करून टाकिली असती.

रमा०—असें काय? तुझ्या येथें आतां भाऊजी बरोबर बोलत बसायचें झालेंना? मग झालें—निश्चिती झाली. घरीं लवकर यायची आज आठवण कुठली होते आहे! पाहून ठेव. यायला आज प्रहर रात्र होईल.

सरस्वती—केव्हां कां येईनात. तुला ग काय करायचें आहे आतां त्यांच्याशीं?

रमा०—हेंग काय! रात्रीं फराळाला किती मंडळी यायची, काय यायची, हें समजायला नको का? किती पानें होणार म्हणून त्या आचाऱ्यानें समजावें तरी!

सरस्वती—त्याचेंग काय मेलें येवढें? नेहमींच्या अदमासानें त्याला कर म्हणून सांग म्हणजे झालें.

रमा०—तसें त्याला सांगून ठेविलें आहे; पण तुला आपली एक गोष्ट सांगितली नाहीं. अजून न्हाणा, बाया कशा येत नाहींत पण? गजे, सगळ्यांच्या घरीं बोलवायला गेली होतीस ना?

गजी—हें काय इचारता बाईसाब? समद्यांच्या घरीं गेलें व्हतें. हतून त ततवर संमदी घर टिपली. याकबी वगाळल न्हाई. येतीला संमद्याजनी इवल्यामेदी.

रमा०—बघतें आतां येतात का त्या. जर सगळ्या नाहीं आल्या, तर मग सटवे, काढतें तझें कांडात.

गडी–( बाहेर जाऊन ) आल्या व आल्या बाईसाब. त्या पहा; तकडून खालीकडून समद्याजनी येत्यात. लई, लांब हायता अजून ती बगा. समद्याच्या म्होरल्ली आपल्या दामुंदर भटाची बायकू. सुंदराबाई. लगालगा हात हालवीत येतीया. संग आपली ल्येक आनली, सून आनली, आन् काकत याक पोरबी आनलया. ती तकडल्या आंगाला ज्वागळकराची लछिंबाई हाय. झालच, किस्नाबाई हाय. आपल्या पाटन्कराच्या येनू अक्काबायता, पारोतीबाई हाय–अनीक.

रमा०–अग सटवे, बायकांची नांवनिशी काय सांगत बसलीस ! जा आंत लवकर; आणखी गणेशपंताच्या बायकोला म्हण, कीं हळदकुंकाचें साहित्य आण. जा लवकर. त्या बाया आल्या देखील. बघ. सरस्वती, मी ओट्या भरते; तूं हळदकुंकू दे; आणि बाकीचें गणेशपंताची बायको करील.

( सर्व बाया येतात आणि हळदकुंकवाची आणि ओट्या भरण्याची सुरवात होते ).

लक्ष्मीबाई–( गौरीपुढें इतर बायांजवळ जाऊन ) अग आई ! काय ही हंड्यांची आणि झुंबरांची गर्दी ! किती हीं तऱ्हेतऱ्हेचीं चित्रें आणखी फळें ! रुप्याचीं ताटें, तबकें तर फराळाच्या जिनसांनीं गच्च भरून ठेविलीं आहेत. याला म्हणावें हौशी. काय आरास केली आहे पण, ज्याचें नांव ! ( पार्वतीकडे पाहून ) अहो, हें कारंजें पाहिलें का पार्वतीबाई ! किती उंच उडतें आहे तें !

पार्वती०–अग बाई ! खरेंच. फारच उंच उडतें. फडक्यां-

च्या वाड्यांत परवां गौर झाली. तेथेंही त्यांनीं असें केलें होतें; पण बाई, इतकें कांहीं तें उंच उडत नवतें.

लक्ष्मी०—इश्श ! कसलें मेलें तें ! गुडघ्याइतकें देखील उंच उडत नवतें. मधेंच मेलें किती वेळां तें बंद पडे. एक घटकाभरच पहात उभ्या होतोंना ? तर सतरांदा आला पाण्याचा तोटा. तें कोणीकडे, हें कोणीकडे ! पाहिलेंसना थेट सुरूचें झाडच. कसे टप्, टप्, टप्, टप् वरून थेंब पडतात पण ! मोत्यांचा जसा पाऊस ! हीं शेतें तरी किती हिरवींगार, आणखी टवटवीत आहेत पाहिलीं ना ? अग बाई ! हें पहा, कारंज्याच्या हौदांत काय केलें आहे तें ! काय बाई ! हें बघूं का तें बघूं असें झालें आहे— हीं बदकें बरें. पाहिलींना, कशीं इकडून तिकडे, तिकडून इकडे मजेनें पोहत आहेत तीं !

कृष्णाबाई—अहो, बदकांकडेच काय पहात बसलां लक्ष्मुबाई ? ही भोरड्यांची तर मौज पहा. हा पहा शेतकरी. हातांत गोफण घेऊन कसा माळ्यावर उभा आहे !

लक्ष्मी०—अग बाई ! इकडे माझी दृष्टच गेली नाहीं. कृष्णाबाई तऱ्हा तऱ्हा केली आहे तरी ! (पार्वतीकडे पाहून) अहो ह्या पहा गोफण मारतांच कशा भर्कन् भोरड्या उडून गेल्या !

पार्वती०—खरेंच. मोठें नवल आहे बाई. कायहो लक्ष्मुबाई, हा शेतकरी गोफण मारतो कशी, ह्या भोरड्या उडून जातात कशा, आणखी पुन्हा शेतावर येऊन बसतात तरी कशा ?

लक्ष्मी०—माझी कांहीं बाई येथें मति चालत नाहीं. तुह्मांला ठाऊक आहे का कृष्णाबाई, हें कसें काय केलें आहे तें? काय बाई गौडबंगाल हें! बरें पण ही सगळी आरास केली कोणीं?

वेणूआक्का—यांच्यायेथें गणेशपंत कारकून आहेत कीं नाहीं, त्यांनीं केली.

लक्ष्मी०—अग बाई! त्यांनीं का केली? किती तरी सुगर आहेत हो ते! हे रांगोळीचे गालिचे सुद्धां त्यांनींच का काढिले?

वेणू०—झाडून एकून एक त्यांनीं केलें.

लक्ष्मी०—शाबास बाई त्यांची! मी परवांचे दिशीं आपल्या-येथें हळदकुंकू करीन असें ह्मणतें. त्यांना बोलावलें तर येऊन अशी आरास करून देतील का?

वेणू०—काय लक्ष्मुबाई? ह्मणतां काय? तुह्मांला वेड तर लागलें नाहीं? ते कोठें जात नाहींत आणि येत नाहींत. पटवर्धनांच्या वाड्यांत मात्र जातात. तुह्मी असल्या खटपटींत पडतां कशाला?

लक्ष्मी—मला बाई, असली आरास करण्याची मोठी हौस आहे.

वेणू०—तें सगळें खरें. पण असली आरास तुमच्यानें होईल तरी का? आपल्या येथें नाहीं गडी, नाहीं माणूस, नाहींत दागदागिने. बरें, घरचीं माणसें पाहिलीं तर तीं एका प्रकारचीं. ह्यांची गोष्ट कोणीकडे, आपली कोणीकडे? असा थाट करायला ह्मटलें ह्मणजे आधीं घरचीं माणसें सुधीं पाहिजेत. या दोघांची एकमेकांवर प्रीत कोण, श्रीमंत तसेच, आणखी हौशी तसेच. आपल्यासारखें का त्यांचें आहे? अशा थाटमा-

टाचें हळदकुंकू करावें-असें मला नाहीं का बाई वाटत? पण उपयोग काय? असें करूं का, ह्मणून गोष्ट काढूं-द्या कीं,-पडल्याच कपाळाला सतरा हजार आठ्या!

लक्ष्मी०-खरेंच बाई-असें असलें ह्मणजे कसली हौस आणि कसलें काय?

वेणू०-ह्मणूनच तुह्मांला सांगतें, असल्या नादीं कांहीं लागूं नका. शेजार पाजारच्या चार चौघी आया बायांना एक दिवस बोलवावें, आणि द्यावें हळदकुंकू; ह्मणजे झाली आपली गौर.

पार्व०-चला बाई आतां लक्ष्मुबाई. पुरे हें पहाणें. सकाळवेरीं पहात उभ्या राहिलों तरी कांहीं पुरेसें व्हायचें नाहीं. चला आतां. माझें मूल पाळण्यांत रडत असेल.

लक्ष्मी० व वेणू०-खरेंच. चला आतां. फार उशीर झाला. ( सगळ्या रमाबाईकडे जाऊन ) येतों बरें रमाबाई.

रमा०-सगळ्या जणींनीं हळदकुंकू घेतलें ना?

सगळ्या-हो. घेतलें बरें. येतों आतां. उशीर झाला.
( सगळ्या जाऊं लागतात. )

रमा०-या बरें.

सरस्वती-अग बाई! भाऊजी आले! ती बघ गाडी. आले न आले कीं अधीं इकडे येतील. मला जायचें आहे रास्त्यांच्या वाड्यांत हळदकुंकाला. गजे, भुयांना मागच्या दारीं मेणा न्यायला सांग.

रमा०-अग मग? इतकी जायची गडबड कां?

सर०-मी नाहीं बाई येथें उभी रहायची. मी आपली जातें. ( हंसत ) दोघांमध्यें आडकाठी कशाला उगीच.
( सरस्वती जाते. )

( राहिलेल्या बायका हळदकुंकू घेऊन जातात. )

वासुदेवराव.-( आंगरख्याचे बंद सोडीत ) व: शान थाट केला आहे बोवा ! ( रमाकडे पाहून ) कां, झालीना हौस पूर्ण ?

रमा०—मनांत असल्यावर काय नाहीं होणार ? हा थाट पाहून सगळ्या बायकांनीं मानाच डोलविल्या.

वासु०—केलाच आहे गणेशपंतांनीं थाट तसा. अशी जवळ ये पाहूं. दोघांनीं उभे राहून जोड्यानें ही मौज पाहूं.

रमा०—( गालांत हंसत ) अहाहा ! कांहीं नको. तेथूनच पहावें ह्मणजे सगळें दिसतें. जोड्यानें पहाण्यांत काय अधिक आहे ?

वासु०-त्यांतच आह्मांला अधिक वाटत असेल तर. (असें ह्मणत रमास जवळ घेतो.)

रमा०—( तोंड किंचित् गोरेंमोरें करून ) काय हें ? ताळच सोडला अगदीं ! कोणी पाहिलें तर काय ह्मणेल.

वासु०—अं: ! कोणी आतां येत नाहीं आणि पहात नाहीं. आपण असल्यावर या दिवाणखान्यांत तिसरें येतें कोण ? ( असें ह्मणत रमाच्या गळ्यांत हात घालून ) अरे ! किती घामाघूम झालीस ही ! सगळी पैठणी घामानें कशी चिंब भिजली आहे ! हें पहा नाक, गाल, कसे लाल होऊन गेलें आहेत ! तरी मी सांगून ठेविलें होतें कीं आज फार श्रम करूं नको; नाजुक प्रकृति; सोसणार नाहीं. पण आमचें ऐकतें कोण ? झाली. आठ चार दिवसांची आतां बेगमी झाली ! आई आई करीत पडशील तेव्हां कळेल मग.

रमा०—अहाहा !. इतकी मी नाजुक नाहीं कांहीं ! एखा-

द्याला हरभऱ्याच्या झाडावर कसें, तेव्हांच चढवितां येतें ! श्रम झाले नाहींत आणि कांहीं नाहीं. पांचपन्नास बायकांच्या ओंट्या भरल्यानें का श्रम होतात ?

वासु०—छेः ! भलत्याचें भलतेंच ! स्वस्थ बसल्यानें श्रम होतात ! नाजुक आहेस, असें ह्मणेल कोण तुला ? येवढें मात्र—थोडे श्रम झाले ह्मणजे चार चार दिवस जागेवरून उठण्याची कांहीं शक्ति रहात नाहीं. केवढी बळकट तूं !

रमा०—असूं; आह्मी आपल्या कशाही असूं. (अमळ रुसल्याची मुद्रा करून एकीकडे होते).

वासु०—बरें हें असो. मंडळी फराळाला बोलाविली आहे. सर्व तयारी आहेना !

रमा०—हें काय ! इतकें लवकर काय ह्मणून विचारायचें झालें ? दोनप्रहर रात्रीं येऊन विचारिलें असतें, ह्मणजे वेळेवर झालें तरी असतें !

वासु०—हं—उपसलें आमच्यावर हत्यार ! जरा कोठें यायला उशीर लागला, कीं, मारलाच टोमणा ! कठीण बोवा ! बायकांबरोबर पुरुषांचा टिकाव लागणें फार कठीण !

रमा०—अहाहा ! ऐकेल एखादें कोणी ! वेळेवारीं सांगायला काय झालें होतें तर मग ?

वासु०—लवकर सांगणार होतों; परंतु गोपाळरावजींबरोबर बोलत बसलों तो बसलोंच. झालें. त्यांतून येवढें मला अगदीं ठाऊक होतें कीं, जरी मीं सांगितलें नाहीं तरी तूं सर्व तयारी करून ठेवशीलच. कारण धूर्तच तूं तशी आहेस.

रमा०—बोलणें कसें तेव्हांच सुचतें ! गोड गोड, गोड

गोड, बोलून काम साधून घेण्याचा मात्र धूर्तपणा अंगांत भरला आहे. बरें. इतका वेळ, आज भाऊजी-जवळ कसलें बोलणें चाललें होतें?

वासु०—बोलणें कसलें? पुण्यास जाण्याचा बेत ठरला. पुढच्या आदितवारींच निघायाचें.

रमा०—(ओठाला बोट लावून) अग बाई! या येत्या आदितवारीं का जायचें ठरलें; अगदीं जवळच येऊन ठेपलें ह्मणायचें. नानासाहेबांनीं आणि आईनीं, त्यांना भाऊजी एकुलते एक असून, बरी पण जायला परवानगी दिली?

वासु०—दिली झालें. माझा आणि गोपाळरावजीचा आग्रह पडला, तेव्हां त्यांचा निरुपाय झाला.

रमा०—एकच नाद लागला ह्मणजे लागला. भाऊजी काय आणि कोणी काय. खरेंच. इतकें काय पुण्यास जायचें तटलें आहे? एक परीक्षा तर उतरली. आणखी जास्ती शिकून काय करायचें आहे? घरदार सोडून, परदेशांत, इतकें लांब जायचें तें कशाला? देवाच्या दयेनें कोणच्या गोष्टीचें कांहीं कमी का आहे?

वासु०—कमी आहे ह्मणून का जायचें? बायकांची वेडी समजूत ती हीच. पुरुषांना पैशापेक्षां विद्या असणें हेंच भूषण आहे.

रमा०—विद्या करून लौकिक मिळवायचा ना? तर जसा लौकिक असावा आणि चारचौघांत मान मिळावा तसा आज मिळतच आहे.

वासु०—तें सगळें खरें. पण गोपाळरावजी आपले स्नेही,

त्यांचें मन मोडतां येत नाहीं. तेव्हां जो बेत झाला तो झाला.

रमा०–माझें कोण ऐकतें ह्मणा–पण आपली उगीच वेडी ह्मणून बोललें. बरें. बरोबर कोण कोण जायचें ठरलें?

वासु०–( किंचित् हंसून ) मी तर कोणाला नेत नाहींच. गोपाळरावजी मात्र वहिनीला नेतील. तूं माहेरीं जा. येथील सर्व व्यवस्था गणेशपंत करतीलच.

रमा–हळू, हळू. कोणी बाहेर ऐकेल एखादें! कायतें आणखी एकदां ह्मणायचें होतें पाहूं? "मी तर कोणाला नेतच नाहीं" काय?

वासु०–यांत संशय काहि कीं काय?

रमा०–मी नसलें तर करमेल का तेथें?

वासु०–हो. न करमायला काय झालें?

रमा०–मग कशाला, मुद्दाम बोलावणें पाठवून माहेराहून मला इतकी लवकर आणविली; चार महिने राहीन या बेतानें गेलें होतें. पण पुरता एक महिना देखील लोटूं दिला नाहीं, इतकी मोठी घाई कसली झाली होती?

वासु०–( हंसून ) बरें; हें असो. आतां मंडळी येईल. पाट रांगोळ्यांची वगैरे सर्व तयारी, गणेशपंतांकडून करीव. मी अंमळ बाहेरच बसतों.

रमा०–होय. पण कसा काय बेत झाला आहे तो एकदां आंत येऊन पाहून तरी जायचें होतें.

वासु०–बरें. चल तर. ( रमा व वासुदेवराव जातात. )

# अंक पहिला.

## प्रवेश. दुसरा.

स्थल—सोलापूर.—पटवर्धनांचा वाडा.

(गोपाळरावांचे वडील येतात.)

गोपाळरावांचे वडील—शिवरामपंत, अहो शिवरामपंत,—

(गो० वडील दोन हाका मारून क्षणभर थांबतात, इतक्यांत शिवरामपंत दारांतून बाहेर डोकावतो.)

गो० व०—आंतून शिवलिखिताची पोथी घ्या बरें इकडे. (शि० पोथी आणून देतो ती घेऊन) आज बुधवार. ठीक आहे. अमृत—चार; चक्र आठ—चार आणि आठ बारा—अमृत—दोन—बारा आणि दोन चवदा—शून्य चार—चवदा आणि चार अठरा, आणि माहेंद्र आठ—अठरा आणि आठ सव्वीस—सव्वीस घटका—आठ अडचें वीस, आणि सहा सव्वीस—दोन वाजून तर गेले; आणखी सहा घटका—उत्तम वेळ आहे. ठीक आहे.—माहेंद्रे तु जयो नित्यं; आणि तोंपर्यंत गाडीची वेळही होते. खासा. नामी योग जमला. (शिवरामपंताकडे पाहून) शिवरामपंत, वासुदेवराव वगैरे आलेच आहेत; पण सर्वांची निघण्याची तयारी झाली किंवा नाहीं तें पहा बरें आंत जाऊन.

(शिव० जातो—व आपा, मामा हे येतात; त्यांना पाहून).

गो० व०—यावें आपा. मामा यावें. बसावें. (लोडाकडे हात करून) असें यावें.

आपा व मामा—बसतों, बसतों. नानासाहेब, आपण बसावें.

गो० व०—नाहीं आपण बसावें. (सर्व बसतात).

आपा—आपले चिरंजीव आणि वासुदेवरावजी लेले, पुढें

विद्याभ्यास करण्यासाठीं पुण्यास जाणार ह्मणून ऐकलें?

**गो० त्र०**—होय. आजच जाणार—अगदीं निघण्याची तयारी आहे. आतांच्याच गाडीला निघणार.

**मामा**—तें सर्व ठीक आहे. नानासाहेब, परंतु गोपाळरावजी गेल्यावर आपणाला करमेल कसें? ते ह्मटलें ह्मणजे आपले पंचप्राण आहेत.

**गो० त्र०**—करतां कसें मामा. त्याचा मनोदय कालीज्यांत जाऊन विद्याभ्यास करण्याचा. त्यामध्यें व्यत्यय आणणें हें या कालमानाला अनुसरून नाहीं. काढावे दिवस कसे तरी, झालें.

**मामा**—एक परीक्षा तर दोघांची उतरली. मग उगीच पुढें शिकून काय करायचें? आपल्या आणि रावसाहेब लेल्यांच्या पुण्याईनें दोघांचें यथास्थित आहे. चाकरी न लागली तर कसें होईल ही काळजी त्यांना तर काय, परंतु त्यांच्या पुत्रपौत्रांस देखील करावयास नको.

**आपा**—आपण ह्मणतां तें सर्व खरें. परंतु पैशाची कांहीं शाश्वती आहे? पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें क्षणभंगुर. राजाचा रंक आणि रंकाचा राजा होण्यास एक क्षण देखील लागत नाहीं. विद्येचें असें नाहीं. विद्याधनाची प्राप्ति करून घेण्यास पराकाष्ठेचे परिश्रम करावे लागतात हें खरें आहे; परंतु ते करून विद्याधनानें एकदां भांडार भरून ठेविलें ह्मणजे यावज्जीव तें नष्ट होत नाहीं. ह्मटलें आहे—पूर्वापार, विद्येला जो मान मिळत आहे तो पैशाला नाहीं. कसाही दुर्धर प्रसंग मनुष्यावर येवो; खरा विद्वान् जर आहे तर तो कधींही डगमगणार नाहीं.

**मामा**–आपासाहेब, ही इंग्रजी विद्या शिकल्यानें नफा-नुकसान काय आहे हें सर्व मला कळतें. ( नानासाहेबाकडे वळून ) माझ्या बोलण्याचा मुद्दा मिळून इतकाच कीं, आपला झाला आहे आतां वृद्धापकाळ. तेंव्हां अशा वयांत गोपाळरावजींनीं आपणांजवळच असून सर्व कारभार त्यांनीं पहावा–यांतच आपणांस सौख्य व त्यांना भूषण आहे.

**गो॰ व॰**–हा विचार माझे देखील मनांत आला. परंतु असा बेत कां केला याचें कारण मिळून हेंच कीं गोपाळाचें दूर जाणें ह्मणजे काय–चार पांच वर्षांची सारी कथा मामा. त्यांतून सुध्दा मिळतात त्या अर्थीं वर्षांतून एक दोन वेळां येऊन भेटेलच. जातील दिवस निघून–मोहपाशांत गुंतून त्याला यावेळेस जाऊं न द्यावा तर त्यामध्यें त्याचा हिरमोड होईल. इतकेंच नव्हे, परंतु अकल्याण देखील होणारें आहे–आणि पुत्राचें ज्यांत अकल्याण आहे तें करणें पितृधर्म नव्हे. बरें आपण बसावें. मी आंत जाऊन येतों. बायकांचा कारभार. मी गेल्याशिवाय त्यांची निघण्याची तयारी होणार नाहीं. ( उठून जातां जातां ) तीं तिकडे ओसरीवर बुदबळें पडलीं आहेत–मी येईपर्यंत, झाल्यास होऊंद्या एक डाव मामा.

**आपा व मामा**–ठीक आहे. (ओसरीवर खेळावयास जातात).

**गो॰ व॰**–( आंत जाऊन ) गोपाळ, अरे गोपाळ, वासुदेवराव; चला आटपा. आतां वेळ फार उरला नाहीं. जा सर्व. देवाला नमस्कार करून तिला विचारून लवकर या. रमा आणि सरस्वती कोठें आहेत ? ( त्यांना

पाहून ) कायग मुलींनो—चला लवकर, आटपा. रामचंद्र आटप लवकर. गाडी गेल्यावर का तुह्मी निघणार? ( असें ह्मणून घरांत जातात. )

( गोपाळराव व गोपाळरावाची मातोश्री प्रवेश करतात. )

गोपाळराव-(देवांना नमस्कार करून)आई नमस्कार करतों. ( ओणव्यानें हात जोडून जमिनीवर डोकें टेंकतो ).

गो० आई-शतायुक्ष हो. ( डोळे पाण्यानें भरून येतात. ) गोपाळ जाणारच ना मला सोडून? नाहींना माझें ऐकत तूं? मजकडे पाहून अजून तरी नकोरे जाण्याचा बेत करूं. सांग, गोपाळ, सांग बरें मला तूं. तू गेल्यावर या ह्मातारीनें कसे दिवस कंठावे बरें? काय तो एकुलता एक आह्मांला तूं. तुझा काय तो आह्माला आधार. या वयांत तुझें काय तें आह्माला सुख. आतां गेलास ह्मणजे महिनेचे महिने मला दिसणार नाहींस, तेव्हां गोपाळा—कसेंरे मला होईल? गोपाळा तुझ्याच गळ्याची शपत एक घटकाभर देखील, तूं गेलास ह्मणजे मला चैन पडायाचें नाहीं. नको जाऊं; गोपाळा, नको; नको जाण्याचा हट्ट धरूं. निघण्याची सगळी तयारी झाली खरी, पण रहातों असें ह्मणशील तर या घटकेस सांगून सगळा बेत रहित करतें. कसें मग रहातोस ना?

गोपा०—( आपल्याशींच ) अहाहा! आईची ममता काहीं विलक्षण! आईसारखी अमोल वस्तु खरोखर, जन्मजन्मांतरींही मिळणें नाहीं. खरें प्रेम काय तें इथ्या ठिकाणीं. ( उघड ) आई, काय हे? आतां मात्र तुह्मी शर्थ झाली. नको अशी रडूं. आई, हें काय बरें? ( आईचे डोळे पुसतात ).

गो० आई—(गोपाळरावास मिठी मारून) नको, नको गोपाळा नकोरे जाऊं. नाहीं मी तुला जाऊं देणार.

गो०—आई, एक वेळ तूंच जा ह्मणून सांगितलें ह्मणून येवढी तयारी केली. आणि आतां आयत्या वेळीं रहा ह्मणतेस ? नानासाहेब काय ह्मणतील ? मी का कोठें लांब जात आहें ? हवें तेव्हां तुजजवळ सुट्टींत येईन. चार किंवा पांच वर्षांची सगळी गोष्ट ! तेवढीं हं हं ह्मणतां निघून जातील. मग नेहेमीं तुजजवळ आहेंच. फार उशीर झाला आई. हें काय उगीच. का बरें कष्टी होतेस ? ( पुनः आईचे डोळे पुसतात. ) आई, येऊंना आतां ?

गो० आई—" जा तूं " अशीं अक्षरें कांहीं माझ्या तोंडांतून निघत नाहींत, त्याला, गोपाळा, मी काय करूं ? खरें ह्मणशील तर मला कांहीं एक सुचत नाहीं. कांहीं असो; गोपाळा, जाऊं नकोस मला सोडून.

( गोपाळरावाचे वडील येतात. )

गो० व०—( रागें भरून ) काय शहाणपण हें ? पुरे आतां ही ममता. पहिल्यानेंच त्याला नको जाऊं ह्मणून ह्मणावयाचें होतें. एकदां त्याला जा ह्मणून सांगितलें; सगळी तयारी झाली; बाहेर आपा, मामा, बसले आहेत, त्यांना देखील हे सर्व जाणार ह्मणून समजलें; आणि आतां नको जाऊं ह्मणून ह्मणतां ?—वः ! काय पोरखेळ हा ! द्या सर्वांना निरोप. हें काय हें ? चला. आटपा. बाहेर जाऊन मी गाड्या तयार करवितों.

( गोपाळरावाचे वडील जातात. )

गो० आई—गोपाळा, ये बरें, इट्टच घेऊन बसलास त्या-

पुढें इलाज नाहीं. आतां आह्माला सोडून जात आहेस परदेशांत. नीट संभाळून मात्र रहा. प्रकृतीला नेहेमीं जपत जा. रात्रीं फार जागत जाऊं नको. तुला जागरणें सोसायचीं नाहींत. चार चार दिवसांनीं खुशाल असल्याचीं पत्रें पाठवीत जा. पत्रें पाठविण्याला अगदीं आळस करूं नको. पुष्कळ सुट्या मिळतात ह्मणून ऐकतें. दर सुटीला आह्माला येऊन भेटत जा. वासुदेवराव, मी काय बोललें तें ऐकलेंना ?. गोपाळ आणि तुह्मी, दोघे एकविचारानें असा. आणि खुशाल असा ह्मणजे झालें. परदेशांत तुह्मांला तो आणि त्याला तुह्मी आहां. बरोबर रमाला आणि सरस्वतीला नेत आहां. त्यांच्यावर रागाऊं विगाऊं नका बरें का? बायकांना आपले डोळ्याच्या धाकांत ठेवाव्या. ऐकलेंसना गोपाळ. त्या अजून पोरी आहेत. कांहीं तुमचें करायासवरायला चुकल्या तर त्यांना वरचेवर नीट समजावून सांगत जा. मोठमोठ्या बायका देखील चुकतात; ह्या तर काय मुली आहेत. त्यांना संभाळून घेणे तुह्माकडे आहे. ( सरस्वती व रमा येतात त्यांना पाहून ) मुली इकडे ये. रमा, मी काय सांगतें तें ऐक.-तूं आमच्या सरस्वतीपेक्षां थोडी पोक्त आहेस, पुण्यास गेल्यावर दोघीजणी, येथल्याप्रमाणेंच, मिळून मिसळून आनंदानें असा. आपापल्या नवऱ्याच्या आज्ञेंत रहा. रमा, तुझी सासू नाहीं, सासरा नाहीं ह्मणून मी सांगतें. वासुदेवरावांचें अगदीं मन दुखवूं नको. ऐकलेंस ना सरस्वती ? ( सरस्वती रडूं लागते.) ये अशी. रडूं नको. गोपाळ, संभाळ बरें हिला.

गो०—आई, कांहीं काळजी करूं नकोस. येतों आतां; नमस्कार करतों.( ओणव्यानें दोन्ही हात जोडून जमिनीवर डोकें टेंकतात. )

गो० आई—शतायुक्ष व्हा. गोपाळ, मी सांगितलें त्याप्रमाणें वागशील ना ? बाळा, हा सर्व जीव तुजपाशीं टांगला आहे. तुजवांचून आतां कसें चैन पडेल ? जे आई, कुळस्वामिणी, गोपाळाला आणि या वासुदेवरावाला खुशाल ठेव. ( रडूं लागते. )

गो०—( गहिंवरून डोळे भरून येतात.) आई, पुरे आतां—माझ्यानें बोलवत नाहीं. नको दुःख करूं. आई, येतों बरें आतां. (गो० आई नुस्तीच या ह्मणून मान डोलविते. सर्व नमस्कार करून जातात, व ओसरीवर गोपाळरावाचे वडील उभे आहेत तेथें येतात. )

गो० व०—आलां एकदाचे सर्व बाहेर ? किती वेळ लागला ? वासुदेवराव, इकडे या. गोपाळ, बैस. वासुदेवराव, विद्याभ्यास करण्याकरितां दोघे चाललां आहां. जो हेतु मनांत धरला आहे तो शेवटास न्या. गोपाळ आह्मांला सोडून जातो ह्मणून मला अतिशय वाईट वाटतें. परंतु मन घट्ट करून त्याला पाठविण्याचा बेत केला. त्याचें पुढें हित व्हावें ह्मणून येवढा सर्व खटाटोप. तुह्मी दोघे तेथें आमच्या वाड्यांत एकविचारानें रहा. आपल्या योग्यतेप्रमाणें आपली वागणूक ठेवा. दुष्ट आणि हलकट लोकांच्या संगतीस लागूं नका. कोणाचाही स्नेह करण्याचें झाल्यास, तो मनुष्य कसा आहे, काय आहे, त्याचें आचरण कसें आहे, या गोष्टीचा चांगला शोध करून नंतर स्नेह करा. कोणतेंही काम एकाए-

कीं अविचारानें करूं नका; परंतु विचारपूर्वक एखादी गोष्ट हातीं धरली तर ती तडीस नेल्याशिवाय कधीं राहूं नका. भलभलतींच कृत्यें करूं नका. खाण्यापिण्याला, वस्त्रपात्राला जितका पैसा लागेल तितका खुशाल खर्च करा. त्याविषयीं हाल करून घेऊं नका. उसनवार ह्मणून कोणाला एक पै देखील देऊं नका, व त्याप्रमाणेंच तुह्मीं कोणाजवळून घेऊं नका. कारण असें करण्याचा प्रसंग तुह्मांला आपल्या स्नेह्यांशींच येणार. तेव्हां असें केल्यानें होतें काय, कीं पैशापरी पैसा जातो आणि बरोबरच स्नेहही घेऊन जातो. विद्याभ्यास लवकर व्हावा ह्मणून रात्रीं फार जागत बसूं नका. पांचाचे ठिकाणीं दोन अधिक वर्षें लागलीं तरी चिंता नाहीं. परंतु नेहमीं जागरणें व अतिशय मेहेनत करून शरीरप्रकृतीची हानि करून घेऊं नका. वासुदेवराव, माझा आणि तुमच्या वडिलांचा स्नेह फार होता ह्मणून, आणि मी सांगतों त्याप्रमाणें तुह्मी वागाल अशी माझी पूर्ण खात्री आहे ह्मणून, हे दोन बरे वाईट शब्द सांगितले. गोपाळ, मी आतां काय बोललों तें तूं ऐकलें आहेच. त्याप्रमाणें आपलें आचरण ठेव, ह्मणजे तुझें त्यामध्यें कल्याण होईल, व मला संतोष वाटेल. जीं पत्रें पाठविशील त्यांत सर्व गोष्टींविषयीं मजकूर लिहीत जा. जातांक्षणीं खुशाल पोहोंचल्याचें एक पत्र पाठीव.

मामा—नानासाहेब, साडेतीन वाजून गेले. गाडी निघण्यास अवकाश अगदीं थोडा उरला बरें.

गो० व०—अरे हो. खरेंच. हं; वासुदेवराव, गोपाळ, चला आतां. गोपाळ सांगितल्याप्रमाणें वाग बरें.

गो०—( गुहिंवरून नुसतीं होय ह्मणून मान डोलवितात.) नानासाहेब नमस्कार करतों. ( लवून पायांवर डोकें ठेवितात. )

गो० व०—आयुष्मन् भव. संभाळून जा बरें. श्रीकुलस्वामिणीच्या कृपेनें तुह्मांला यश येवो ह्मणजे झालें. या अं. ( गो० व० गोपाळरावाच्या पाठीवरून हात फिरवितात. )

गो० व वासु०—आपासाहेब, मामासाहेब, नमस्कार करतों—येतों.

आपा—या बरें—चांगला अभ्यास करून यश आणि लौकिक मिळवा ह्मणजे झालें. नानासाहेबांचा उपदेश लक्षांत ठेवून त्याप्रमाणें वागा आणि वृद्धापकाळीं त्यांना सुख द्या, येवढेंच तुह्मांला आमचें वारंवार सांगणें आहे. चला आतां.—

गो० व०—चला लौकर. रमा, सरस्वती आणि रामचंद्र कोठें आहेत—बाहेर आहेत वाटतें. चला, मंडईपर्यंत तरी मी येतों.

आपा व मामा—आह्मीही तेथपर्यंत येतों. नानासाहेब, चलावें.

( जातात ).

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

### स्थल–पुणें.––पर्वती.

( गोपाळराव व वासुदेवराव प्रवेश करतात. )

गो०—वासुदेवराव, येथून या शहराची शोभा मोठी चमत्कारिक दिसते, नाहीं? ही शोभा पाहून या शहराचा एकंदर इतिहास कसा, चित्रासारखा डोळ्यापुढें दिसतो, व मनांत एका प्रकारचा उल्हास वाटून, मोठे चमत्कारिक तरंग येतात–असें वाटतें कीं, हें येवढें दाट व अफाट शहर पुष्कळ वर्षांपूर्वीं एक यःकश्चित् लहानशी वाडी होती, त्या वेळीं, हीच वाडी पुढें इतक्या महत्वास येईल, आणि तरवार बहादर मराठ्यांच्या अमलांत साऱ्या हिंदुस्थान देशाचें नाक होऊन बसेल, असें कोणाच्या स्वमांतही आलें असेल काय? यावरूनच मनुष्याच्या स्थितीविषयींही मोठा चमत्कार वाटतो. परंतु हा खेळ कोणाचा? एका कालांतराचा. पहा—कालांतरानें, वासुदेवराव, या जगांत काय, पण साऱ्या विश्वांतच ह्मणाना, काय काय घडामोडी होतात, याची व्हावी तशी कल्पना होणें देखील अशक्य आहे. खेड्याचें शहर, शहराचें खेडें, रावाचा रंक, रंकाचा राव, हा प्रकार एकसारखा चालला आहे.

वासु०—खरें आहे. वः! ह्या ठिकाणीं उभें राहिल्यानें तुह्मी ह्मणतां असल्या विचारांनीं तर खरेंच, परंतु त्याप्रमाणेंच या आपल्या सभोंवारच्या सृष्टिसौंदर्यानें देखील मनाला फारच आल्हाद होतो. नाहीं बरें? हे

पहा, आपल्या चारी बाजूला किती मनोहर देखावे दिसतात ते !

गो०–खरोखर. पहातांच आनंदानें आणि विस्मयानें मन कसें थक्क होऊन जातें. हा पहा पूर्वदिशेकडील प्रदेश–जिकडे तिकडे धुकेंच धुकें–पाला धुकें तरी कसें ह्मणावें–कोणालाही वाटेल कीं हें धुकें नव्हे, पण एक विस्तीर्ण समुद्रच पसरलेला आहे. व: काय चमत्कारिक देखावा तरी हा !

ना०–तसेंच इकडे ईशान्येकडे किंचित् लक्ष देऊन पाहिलें का गोपाळराव ? हें पहा अवघें शहर कसें झाडींत आणि धुरांत अगदीं लपून गेलें आहे तें ? ही रम्य नगरी शालूच नेसली आहे असें वाटतें. ते पहा मोठमोठाले वाडे. त्यांची शोभा कांहीं निराळ्याच प्रकारची दिसते. असें वाटतें कीं त्या दाट झाडींतून, ते, आपापलीं डोकीं वर काढीत आहेत. जणो, प्रातःकाळीं उठून [ देवळाकडे हात करून ] या शंकर-पार्वतीचें दर्शन घेण्याकरितांच त्यांच्या उड्यांवर उड्या पडताहेत ! जिकडे तिकडे जात्यांची घरघर खेरीज करून या वेळेस सर्व जग कसें,–अगदीं सामसूम असल्याकारणानें, सूर्यनारायणाच्या दर्शनाकरितां एखाद्या महंताप्रमाणें अगदीं ध्यानमग्न बसलें आहे, असें वाटतें. सूर्योदय अमळशानें झाला कीं ही सामसूम आणि ही शांति, उद्यां हा वेळ पावेतों, पुनः दिसणार नाहीं.

गो०–जितकी कल्पना करावी तितकी थोडीच. या ठिकाणची ही सामसूम, ही गार वाऱ्याची झुळूक आणि हा

निरनिराळ्या पुष्पवाटिकांतून येणारा सुगंध किती पण मनाला आनंद देत आहे?

वासु०—हीं पहा वानवडी आणि खडकी. त्यांमधून रस्ते गेले आहेत, ते किती बारीक दिसत आहेत? कोणी ह्मणेल, हे रस्ते नव्हत, तर एकाद्या कुशल चितान्यानें वेलीच काढिल्या आहेत कीं काय कोण जाणे!

गो०—तशींच हीं नानाप्रकारच्या धान्यांचीं शेतें, पहा कशीं चित्रविचित्र आणि सुरेख दिसत आहेत तीं! आपण इतके उंचावर आहोंत व तीं इतकीं खालीं आहेत कीं, एकसारखीं त्यांकडे टक लावून पाहिल्यानें त्या ठिकाणीं चित्रविचित्र अनेक रंगाचे लहानमोठे गालीचेच पसरले आहेत कीं काय, असा क्षणभर भास होतो.

वासु०—अबबबब! केवढा तेजःपुंज लाल गोळा हा! पहा, पहा इकडे गोपाळराव. काय त्या शेतांकडे पहात बसलां? तो पहा मित्रोदय होत आहे. आपल्या पूर्वभागीं मित्रोदय पाहून कोणत्या सहृदय व उदात्त मनाच्या पुरुषास आल्हाद होणार नाहीं? मित्राचे मित्र पद्मगुच्छ तर ते पहा—त्यां पलीकडच्या सरोवरांतील पद्मगुच्छ आपल्या मित्राचा उदय पाहून आनंदानें प्रफुल्ल होऊन विकास पावत आहेत! हा आपला मित्र तर खराच, परंतु याचें नांव अर्क देखील आहे. व तें मोठें सार्थ आहे असें मला वाटतें; कारण क्षितिजद्वारांतून इकडे हा फार चोरचोरूनच पावलें कां टाकीत येत आहे? मला तर वाटतें कीं याची पत्नी ह्मटली ह्मणजे सृष्टि—तर चंद्ररूपानें रात्रीशीं मी रत झालों होतों हें हिला कळून सवतीमत्सर होईल ते

होऊं नये, ह्मणूनच स्वारीची ही योजना असावी ! तें कांहीं असो. परंतु, या विश्वांत जेवढे ह्मणून तेजोमय असे मित्र आहेत, त्या सर्वांचें तेज या मित्रतेजापुढें खचीत फिकें पडेल. अहाहा ! कोण देदीप्यमान् कांति ही ! पाहिलेंना गोपाळरावजी ? या अर्काची आपल्या वल्लभेवर प्रेम दाखविण्याची खुबी किती विलक्षण आहे? स्वारी आली न आली, तोंच सृष्टि कशी एकदम प्रफुल्ल, टवटवीत आणि मनोहारिणी करून टाकिली आहे ! गोपाळरावजी, या वेळेस, त्या मोठमोठ्या वृक्षांची, देवळांची आणि वाड्यांची तर फारच अपूर्व शोभा दिसत आहे ! असें वाटतें, या स्वारीनें सृष्टिमुख पाहून फार सुप्रसन्न होऊन, आपल्या तेजोमय बावनकशी सुवर्णानें खचित केलेलें असें पीत वस्त्र अर्पण केलें, तेंच ती नेसली आहे; अशी कल्पना होण्यास कारण तरी आपल्या या मित्राचाच प्रताप !

गो०—अहाहा ! पहाण्यासारखा चमत्कार यांत संशय नाहीं. शहराकडे थोडें लक्ष द्या वासुदेवराव. तिकडून मनुष्यांचा बोलण्याचा ध्वनि—गाई, ह्मशी, वगैरे पाळींव गुरांचे शब्द, आणि नानाप्रकारच्या पक्ष्यांचा किलकिलाट दुरून कानीं येत आहे, त्या योगानें असें वाटतें कीं, सर्व नागरिकजन आपापल्या कामधंद्यास मोठ्या उत्सुकतेनें लागले आहेत. ही गडबड आणि हा किलकिलाट कानाला किती गोड लागत आहे, पाहिलें ना ?

वा०—खरोखर. फारच आनंद वाटतो. हीं लहान लहान टेंगणीं आणि चक्राकार आंब्यांचीं व इतर झाडें

सारख्या अंतरानें लाविलेलीं आहेत, त्यांची किती चमत्कारिक मौज दिसत आहे, पाहिली नां? त्या झाडांच्या फांद्या जमीनीसरशा आलेल्या पाहून असें वाटतें कीं हीं-आपली ममताळू मातोश्री जी पृथ्वी, हिला आह्मी आतां गगनयात्रेस जातों तर आह्माला आई तूं निरोप दे-ह्मणून जातांना मोठ्या प्रेमानें आणि आदरानें नमस्कारच करीत आहेत!

गो०—फार योग्य कल्पना. अहाहा! आज आपण येथें आल्यानें मनाला फारच आनंद झाला. परमेश्वरा, धन्य आहे तुझी! मजसारख्या यःकश्चित् पामरानें तुझ्या अलौकिक कर्तृत्वाचें काय वर्णन करावें! संतमालेंतलि महान् महान् प्रेमळ भक्तांनीं देखील हात टेंकले, त्या-पुढें आमचा पाड किती? वासुदेवराव, चला आतां. उशीर झाला. येथें कितीही उभे राहिलों तरी डोळ्यां-ची ह्मणून तृप्ति होणेंच नाहीं. एक दिवसाआड दोन दिवसाआड इकडेच फिरावयाला येत जाऊं ह्मणजे झालें.

वासु०—माझ्याही मनांतून तेंच आहे. इकडे आल्यानें फारच करमणूक होईल यांत संशय नाहीं. आतां येऊं तेव्हां बरोबर कृष्णरावासही घेऊन येऊं.

गो०—वासुदेवराव, कृष्णरावाशीं नका इतकी सलगी ठेवूं. याविषयीं तुह्मांला मीं मागेंही पुष्कळ सांगितलें, आणि आतांही सांगतों. तो मनुष्य चांगल्या स्वभावाचा असेल असें अद्यापि देखिल मला वाटत नाहीं.

वासु०—मोठी चूक करतां गोपाळराव तुह्मी. फारच उत्तम मनुष्य आहे तो. तो कालेजांत आपल्या वर्गांत असतांना नेहमीं पहात नव्हतां तुह्मी? किती मोकळ्या

मनानें तो आपल्याशीं वागत असे? मोठा आनंदी प्राणी! स्नेह करण्यास योग्य.

गो०—नुसत्या गोड बोलण्यावर नका जाऊं वासुदेवराव. असले कृष्णराव गोडबोल्यासारखेच गोड बोलणारे केसानें गळा कापणारे असतात, असें माझ्या अनुभवास पुष्कळदां आलें आहे.

वासु०—असतील तसले मानभावी गृहस्थ पुष्कळ. परंतु हा कांहीं तसा नाहीं हें खास. घरचा चांगला आहे. शिवाय नुकीच त्याला शंभर रुपयांची नोकरी लागली आहे. मग आह्मांजवळ कोणत्याही प्रकारची प्रतारणा काय ह्मणून करील? छेः, भलतीच शंका!

गोपा०—कदाचित् माझी चुकी असेल, परंतु, तो तुह्मी ह्मणतां तसा चांगला जरी असला, तरी मित्रत्वाचें झाड आक्रोडाचें ह्मणून लावावें हें फार चांगलें असें माझ्या होऱ्यांत येतें—ह्मणून त्यांच्याशीं बरेच सावधपणानें वागत चला ह्मणजे झालें. असो. चला आतां फार उशीर झाला.

वासु०—चला.

(जातात.)

---

## अंक दुसरा.

### प्रवेश दुसरा.

स्थल-पुणें—कृष्णरावाच्या घराची माडी.

(कृष्णराव प्रवेश करतो).

कृष्णराव—[स्वगत] बस. इतके दिवस प्रयत्न केल्यासारखें वासुदेवरावांना एकदांचें प्यायला लावलें. परस्परांचें

सख्य उत्तरोत्तर वृद्धिंगत होईल किंवा नाहीं; याविषयीं आतां शंका नकोच. एकदां सख्य चांगलें झालें ह्मणजे मग त्यांना फसविण्याला किती उशीर? अरे हो! त्या सुंदरीची प्रतिमा अद्यापि मी पाहिली नाहीं! केवढा मी मूर्ख! नोकरानें ती तर केव्हांच आणून दिली आहे; [असें ह्मणत खिशांतून तसबीर काढतो आणि ती हातांत घेऊन] अहाहा! काय अप्रतिम लावण्य हें! आजपर्यंत मी कांहीं नाहीं तरी पांचचारशे सुंदर स्त्रिया पाहिल्या असतील, परंतु इच्या समान रूपवती खरोखर माझ्या पहाण्यांत आलीच नाहीं. यच्चयावत् नक्षत्रांना लाजविणारी खरी! सर्व ब्रह्मांडांतील अमोल्य रत्नें एकत्र करून या सुंदर रमणीला मोठ्या कौशल्यानें निर्माण केली असावी, असा भास होतो. या वासुदेवरावाची पुण्याई सबळ यांत संशय नाहीं! असंख्य वर्षें पूर्वजन्मीं तपश्चर्या केली असेल तेव्हां ही भाग्यशाली त्यांना प्राप्त झाली! वा, रे, वाः! सर्व अवयव जेथल्यातेथें रेखलेले! या मनोहर स्वरूपाला नांवें ठेवण्याला तिळभर देखील जागा नाहीं! [ तसबीर डोळ्याजवळ धरून ] हे सुंदरी! हे मनमोहिनी! तुझें मुखावलोकन करतांच परपुरुषाचें मन चंचल झाल्यावांचून राहील तरी कसें? शुकासारखा महान् योगी जरी असला तरी त्याचें मन तुझी किंचित् दृष्टादृष्ट होतांच लटपटून जाईल, मग माझी अशी अवस्था झाली यांत नवल काय? ज्यांनीं तुझें मुखावलोकन केलें नाहीं, ज्यांनीं तुझी आजपर्यंत प्रतिमा देखील पाहिली नाहीं, त्यांच्या जन्माला धिःकार असो. मी भाग्यवान् ह्मणून

मला त्या तसबिरी काढणारापासून ही तुझी प्रतिछाया प्राप्त झाली.

[ इतक्यांत बळवंतराव येतो. ]

कृष्णराव का बळवंतराव, कोणीकडून आलां ?

बळवंतराव–असाच लायब्ररीकडून.

कृ०–आज नवलविशेष काय वर्तमान आहे ? लिट्ल्गोच्या परीक्षेचा निकाल समजला वाटतें !

बळ०–तेंच सांगण्याकरितां तुह्मांकडे आलों. येथल्या कालेजांतून फक्त दोघे पास झाले. गोपाळराव सोलापुरकर आणि येथल्या फडक्यांचा मुलगा. आपण त्यांच्या बरोबर यंदां गेलों असतों, तर कदाचित् पास झालों असतों.

कृ०–अं:, त्यांत काय हो ! पुढल्या वर्षी व्हाल. झाल्याशिवाय कांहीं तुह्मी रहात नाहीं.

बळ०–होय, तुमचें ठीकच आहे. नशीबानें शंभर रुपयांची नोकरी लागली तेव्हां दुसऱ्याचें तिकडे आतां कांहीं का होईना ? [ असें बोलतां बोलतां टेबलावरचें पत्र घेऊन ] हें पत्र हो कोणाचें ?

कृ०–वासुदेवरावांच्या कुटुंबाचें.

बळ०–असें काय ? बरें हें तुह्मांकडे कसें आलें ?

कृ०–सहज एक दिवस वासुदेवरावांच्या येथें बसलों होतों, तेव्हां ते ह्मणाले, हें अक्षर पहा. पत्र पहाण्याकरितां घेतलें तें तसेंच बोलण्याच्या नादांत खिशांत टाकलें. मग पत्राचें त्यांचेही ध्यानांत राहिलें नाहीं, आणि ह्मणून तें खिशांतल्या खिशांतच राहून गेलें झालें.

बळ०–वा: ! छान अक्षर आहे बोवा ! बायकोची जात असून किती उत्तम लिहिते हो !

कृ०—अहो? एक लिहितेच का उत्तम? सर्व गोष्टींनीं ती सुंदरी तशीच आहे. बरें हें असो. [असें ह्मणत त्यांचे हातांतील पत्र घेऊन खिशांत ठेवितो.] तुह्मांला एक आनंदाची गोष्ट सांगावयाची विसरलोंच. परवां वासुदेवरावांना मीं शुद्ध केलें.

बळ०—काय ह्मणतां, काय? आपल्या वासुदेवरावांना? सोलापुरच्या?

कृ०—हो हो त्यांनाच. [हंसतो.]

बळ०—कृष्णराव, तुमची धन्य आहे बोवा! त्यांना ऋषिमंडळांत ओढलें तर खरेंच. परंतु तसें करण्यापूर्वी, नीट विचार केलाना? हो, आपलें उगाच विचारतों. नाहीं तर करायला जाल एक, आणि होईल भलतेंच. परवां पाहिलें नाहीं त्या गोविंदरावांचें काय झालें तें? सर्व बाहेर फुटलें!

कृ०—गोविंदराव मूर्ख आणि अविचारी. ह्मणून त्या थराला गोष्ट आली. त्यांना पक्कें ठाऊक कीं नारायणराव ह्मणजे अमक्या तऱ्हेचा मनुष्य आहे; असें असून त्याला लागले आपल्यामध्यें घ्यायला. मग कां बरें बाहेर नाहीं फुटणार?

बळ०—तें खरें; पण माझ्या ह्मणण्याचा भाव इतकाच कीं, हें प्रकरण आपण जास्त वाढवूं नये. वाढल्यानें काय होतें तुह्मी समजलां नाहीं—पैशापरी पैसा जाऊन लोकांत दुर्लौकिक आणि बभ्रा मात्र होतो.

कृ०—अं:, त्याविषयीं बेफिकिर असा.

बळ०—काय हो! त्यांनीं पहिल्यानेंच घ्यावयाला कांहीं कांकूं नाहीं केलें?

कृ०—काय झालें तें मी तुह्मांला मुळापासून सांगतों. एक दिवस आह्मी गेलों सहज फिरावयाला. अतिशय उन्हाळा असल्याकारणानें वासुदेवरावांना लागली तहान. आतां मौज काय झाली कीं ओळखीचें असें ब्राह्मणाचें जवळ कांहीं घर नव्हतें; आणि वासुदेवरावांना पाण्याचा तर असा शोष लागला कीं, त्यांच्यानें एक पाऊल देखील पुढें टाकवेना. तेव्हां ते ह्मणाले, "कां हो बोवा, आतां कसें करावें?" मी मनांत ह्मटलें, आपला थोडा तरी कार्यभाग साधून घेण्याची शान संधि आली आहे. असा विचार मनांत येतांच मीं त्यांना सांगितलें कांहीं घाबरूं नका. येथून दुकान कांहीं दूर नाहीं. तेथें जातांच एक लेमोनेडची बाटली घेऊन प्या ह्मणजे झालें. त्यांनीं प्रथम पुष्कळ नडी आणल्या. प्राण गेला तरी चिंता नाहीं, मी तें कधीं पिणार नाहीं असें ह्मणाले. परंतु मी अनेक तऱ्हांनीं त्यांचें मन वळवून त्यांना एकदाचें प्यायला लावलें. नंतर आह्मी घरीं यावयास निघालों. आणि वाटेनें बराच वेळ या विषयावर आमचें संभाषण चाललें होतें. सांगायचें ह्मणून इतकेंच कीं, माझ्या सयुक्तिक भाषणानें त्यांचा धर्मभोळेपणा ते दिवशीं बराच कमी झाला. आणि पुढें थोडे दिवसांनींच थोरलें प्रकर्ण प्यायला लावलें. आतां त्यामध्यें इतके प्रवीण झाले आहेत कीं तें घेतल्याशिवाय त्यांचा एक दिवस देखील सुनका जात नाहीं.

बळ०—शाबास बोवा कृष्णराव तुमची—कमाल केलीत एकून! परंतु एवढें मात्र लक्षांत ठेवा कीं, ही गोष्ट गोपाळरावांच्या कानावर मात्र जातां कामा नये. कारण,

वासुदेवराव त्यांचे वाड्यांत रहातात. आणि त्यांतून ते एकाच गांवचे आहेत. तेव्हां कधींना कधीं तरी त्यांस हा प्रकार कळल्यावांचून रहाणार नाहीं.

कृ०—वासुदेवराव थोड्या दिवसांतच तो वाडा ते सोडणार आहेत, तेव्हां गोपाळरावाची इतकी भीति बाळगावयाला नको.

बळ०—तें खरें. पण असा वाडा उत्तम असून तो वासुदेवराव काय ह्मणून सोडतात बरें ?

कृ०—हें तुमचें कसलें विचारणें हो ? काय ह्मणून सोडतात ह्मणजे ? अहो, त्यांना कांहीं कमी आहे ? त्या वाड्याप्रमाणें पन्नास वाडे घेण्याचें त्यांचे आंगीं आज सामर्थ्य आहे. मग विनाकारण आपल्या जिवाला त्रास करून दुसऱ्याचे घरीं कशाला रहातील ? वास्तविक ह्मणाल तर, वासुदेवरावांना अलीकडे आला आहे अभ्यासाचा कंटाळा, आणि इकडे गोपाळरावांची विनाकारण त्यांना जाचणूक ! अभ्यास करा, कसरत करा, फावल्या वेळीं गहन विषयावर विचार करा, सभेला नेमानें जात जा, हे एकसारखें गोपाळरावाचें वाक्पांडित्य चालत असतें. तें वासुदेवरावांना सोसत नाहीं. शिवाय वासुदेवराव पडले मंडळीचे शौकी. त्यांना मंडळींत बोलायचालायला मनापासून आवडतें. तें गोपाळरावांना खपत नाहीं. बरें. हें असो. तुह्मांला इतकी या गोपाळरावांची भीति कां ?

बळ०—भीति कशाची ? ते माझें चालवीत आहेत थोडेंच ! सद्गुणी आणि संभावित आहेत ह्मणून थोडें भ्यायचें !

कृ०—हं ! हं ! तुह्मी त्यांना आपल्यापेक्षां जास्ती समजतां एकूण !

ब०—यांत काय संशय ? सर्व गोष्टींमध्यें ते आपल्यापेक्षां अधिकच आहेत. इंग्रजी, संस्कृत, मराठी या तिन्ही भाषा त्यांना आपल्यापेक्षां अधिक येतात, हें तुह्मी देखील कबूल कराल. त्यांना जितकीं वर्षें कालेजांत जाऊन झालीं तितकींच तुह्मांला, मला आणि लेव्यांना झालीं, पण उपयोग काय? लेक्चरें ऐकून कालेजांतलीं बाकें देखील निदान तुह्मा आह्मापेक्षां अधिक शिकलीं असतील. कारण, अजून एकाद्या विषयावर पुरतीं दोन मिनिटें सुद्धां आह्माला बोलतां येत नाहीं, किंवा दोन ओळी लिहितां येत नाहींत. आणि तुह्मी विचारतां आह्मी कमी आहों कीं काय? तेव्हां आश्चर्यच नाहीं! -अहो! ते गोपाळराव कोणत्याही विषयावर एक एक, दोन दोन तास, एकसारखे, चुकी न करतां अस्खलित बोलतात, हें आपण कालेजांत व सभांतून नेहमीं पहातों. विद्वत्तेमध्यें तो संपन्न आहे, इतकें नव्हे, परंतु इतर सर्व गोष्टींमध्यें तो पुरुषसिंह तसाच आहे. अशा सत्पुरुषाची संगति असणें माझ्या मतें तर नशिबींच असलें पाहिजे. वासुदेवराव तो वाडा सोडतात हा त्यांचा शुद्ध वेडेपणा आहे, असें माझ्या बुद्धिला वाटतें.

कृ०—बळवंतराव, असल्या गोष्टींची वाटाघाट करण्यामध्यें आपल्याला काडीचा तरी लाभ आहे का ? त्यांना वाटेल तसें ते करितात. आपलें बोलणें चाललें आहे कशाबद्दल आणि तुह्मी काढून बसलां आहां तिसरेंच. कोणी विद्वान् असो किंवा कसाही असो. आपल्याला

काय करायचें आहे? बरें इतका वेळ झाला, अद्यापि वासुदेवराव कां येत नाहींत, कांहीं समजत नाहीं.

बळ०—कां; त्यांनीं येतों ह्मणून सांगितलें आहे कीं काय?

कृ०—तर! दिवस मावळतांच येतों ह्मणून सांगून पाठविलें. खरेंच बळवंतराव, अशा मनुष्याचा बोवा, मला मोठा राग येतो. येतों ह्मणून ह्मटल्यावर आपलें झट्कर यावें. नाहीं तर साफ येत नाहीं ह्मणून सांगावें. ह्मणजे कोणालाच त्रास नाहीं.

बळ०—तुह्मी वेडे आहां कृष्णराव. आतां ते कसले येतात? आतां येण्याची का वेळ आहे? तुह्मी ह्मणतां तें उद्यां कां होईना? आजच झालें पाहिजे असेंच कांहीं आहे कीं काय?

कृ०—आजच झालें असतें ह्मणजे बरें झालें असतें. ह्मटलें आज शनवार आहे, तेव्हां चार घटका चैनीनें बोलत बसायला तरी सांपडेल. पण तसा रंग कांहीं दिसत नाहीं.

बळ०—अहो, रोजची चैन ही चाललीच आहे. उद्यांचाच बेत करा ह्मणजे झालें. बरें, आतां मी जातों. घरीं आई काय ह्मणत असेल?

कृ०—होय. जा पण थोडें घेऊन नाहींका जात?

बळ०—छे:, बोवा! माझी प्रकृति बरोबर नाहीं.

कृ०—घ्या हो. येवढेंसें घेतल्यानें काय होणार आहे?

बळ०—आतां नकोच. माझ्या नावाचें ठेऊन द्या. मी आपला उद्यां घेईन.

कृ०—बळवंतराव, पहा बरें. सौभाग्यवतीनें हळदकुंकाला नाहीं ह्मणूं नये.

बळ०—तें तुह्मांसारखें ज्यांचें सौभाग्य अखंड आहे, त्यांनांच लागूं पडतें.

कृ०—असें काय?—आलीकडे बऱ्याच कोट्या करूं लागलांत हो? बरें तर, मीही तुमच्या बरोबर येतों.

बळ०—कोठें?

कृ०—असेंच एकीकडे जायचें आहे.

बळ०—पण त्या एकीकडचें कांहीं नांव गांव?

कृ०—असेंच एका स्नेह्याकडे.

बळ०—हं समजलों-कृष्णराव काय हें! नुकेच त्या दुखण्यांतून बरे झालां ना?

कृ०—अं:! चाललेंच आहे. अशीं शंभरदां दुखणीं आलीं आणि शंभरदां गेलीं. तें सर्व माझ्या आंगवळणीं पडलें आहे. अहो, रोज मरे त्याला कोण रडे?

बळ०—जा काय पाहिजे तें करा. आह्मांला थोडेंच भोगावें लागणें!

कृ०—बरें बरें; असें टोंचून काय बोलतां? जो चढेल तो पडेल.

[ जातात. ]

---

## अंक दुसरा.

## प्रवेश तिसरा.

### स्थल—पटवर्धनांच्या वाड्यांतील माजघर.

( सरस्वती बूक वाचीत बसली असतां रमा येते. )

रमा०—सरस्वती, काय करतेस?

सरस्वती—[ लाजून ओच्यांत पुस्तक लपविते ] कांहीं नाहीं. उगीच बसलें आहें.

रमा०–पुरे, काय तरी सांग! आतां रिकामी का बसली होतीस? कायसेंसें वाचीत होतीस, हें मी आपल्या डोळ्यांनीं पाहिलें हो.

सर०–कांहीं तरी आपलें बोलतेस झालें. मला वाचतां तरी येतें का?

रमा०–वाचीत नव्हतीस तर मी येतांच ओच्यांत गे काय दडवून ठेविलेंस? [ असें ह्मणून सरस्वतीच्या ओच्यांतून पुस्तक काढिते आणि किंचित् हंसून ] सरस्वती, कांहीं करीत नव्हतीस ना? मग हें दुसरें बुक गे कशाला घेतलें होतेंस?

सर०–[ गालांत हंसून ] आपलें सहज घेतलें होतें.

रमा०–तें खरें; पण आतां उगीच चोरूं नको गडे. तूं सांपडलीस खरी. मग आतां उगीच लपंडाव कां? सांगनास आतां तुला कोण शिकवतें तें. गोपाळ भाऊजी का?

सर०–[ लाजून ] दुसरें कोण तर मग?

रमा०–अग मग असें सांग. माझ्याजवळ त्याची लाज ग कसची? मी तुझी सासू कीं?

सर०–अग सासू नसलीस ह्मणून काय झालें? मला असलें सांगायची बाई मोठी लाज वाटते; काय असेल तें असो.

रमा०–पहिल्या पहिल्यानें आहे तोंपर्यंत असेंच होईल; पुढें लाज वाटायची नाहीं आणि फाज वाटायची नाहीं. आमच्या सगळ्यांच्या देखत भाऊजीजवळ गोष्टी सांगत बसशील. बरें कितवा धडा शिकतेस तो?

सर०–अग कितवा कसचा घेऊन बसलीस? आत्तांशीं

कोठें पहिलें बूक होऊन दुसऱ्याला लागलें आहें. तुझ्यासारखें मला लहानपणीं थोडेंच कोणीं शिकविलें आहे! सासरीं आल्यावर तर आनंदच. मुली बुकें घेऊन वाचीत बसतात त्याचा मामंजींना येतो राग. मग सासरीं तरी कोण शिकविणार? आणि तेव्हां खरेंच कीं नाहीं मला शिकायची हौसही नसे. बरें. तूं बुकें घडाघडा वाचतेस, तशीं मला कधीं वाचतां येतील सांग गडे.

रमा०—लागतील दोन वर्षें.

सर०—अग बाई! दोन का लागतील?

रमा०—अग, दोन पाहिजेतच. तें देखील मनापासून शिकलें तर हो. नाहीं तर मग तीन काय आणि चार काय!

सर०—मनापासून शिकलेंच पाहिजे. [ गालांत हंसून ] तुला एक ठाऊक नाहीं पण.

रमा०—तें काय?

सर०—रोज एक धडा घालून द्यायचा होतो. तो जर नाहीं झाला, तर कांहीं खपायचें नाहीं. काम ना धाम, नित्य एक धडा करायला काय झालें, असें रागानें ह्मणणें होतें.

रमा०—मग दोन नाहीं दीड देखील वर्षें पुरे हो. भाऊजी येथें कोणासारखे असतें ह्मणजे मात्र तुला फारच लवकर आलें असतें!

सर०—तें कसें?

रमा०—अग मी किती दिवस जास्ती शिकवावें ह्मणून एकसारखी पाठीस लागलें होतें. रोज शिकवीन ह्मणायचें.

रात्रीं बूक घेऊन जवळ गेलें ह्मणजे कपाळाला आठ्या घालायच्या. आणि कसली ही रोजच्यारोज किटकिट लावतेस ह्मणून माझ्या हातांतून बूक घेऊन आपलें भिरकून कोणीकडे तरी भिरकावून द्यायचें, ह्मणजे झालें. अशानें बरें कसें येईल? ह्मणून मी आपलें तुला थट्टेनें ह्मणालें.

सर०–माझें तर मग असें नाहीं गडे. इतके दिवस शिकायला लागून झाले ना? पण अजून बाई कोणी कंटाळलें नाहीं. मग बाई पुढचें कोणी सांगावें?

रमा०–त्याची काळजी करायला नको. कसें ह्मणशील तर गोपाळभाऊजींनीं कोणतेंही काम एकदां हातीं धरलें कीं नाहीं ह्मणजे त्यांचा आपला स्वभावच. शेवटास नेल्यावांचून कधीं रहायचे नाहींत. तसें आमच्या येथें नाहीं. हें आलीकडे हो पण. एखादें कांहीं करायचें झालें कीं नाहीं ह्मणजे शंभरदां शंभर बेत व्हावचे. अगदीं ह्मणजे अगदीं बुद्धि स्थिर नाहींशी झाली आहे. असें बाई पहिलें नव्हतें.

सर०–एक एक ऐकावें तें नवलच. वासुदेवभाऊजींचें ह्मणजे असें होईल हें माझ्या ध्यानींमनीं देखील नव्हतें. बरें. हें असें कां झालें हें तुला तरी कांहीं समजलें का?

रमा०–अगे हो. समजलें आहे, पण काय करायचें? हें कीं नाहीं, त्या कृष्णरावाशीं मैत्री झाल्यानें झालें आहे. त्याची संगत लागल्यापासून पहिल्यासारखें कांहीं येथें कोणाचें शिकणें होत नाहीं. आतांशीं घरीं यायला आपले रात्रीचे आठ आठ, नऊ नऊ वाज-

तात.—आचारी स्वयंपाक करितो आणि तिष्ठत चुलीचें डोकें धरून बसतो. विचारा काय करील? मागें पोट लागलें आहे ना?

सर०—खरेंच बाई, बसलें पाहिजे. बरें कृष्णराव ह्मणतेस तो कोण?

रमा०—अग, तो नाहीं का आतांशा आमच्या येथें येत? तोच.

सर०—मला नाहीं बाई ठाऊक कोणचा तो.

रमा०—तूं त्याला पुष्कळ वेळां पाहिला असशील. पण आतां तुझ्या नाहीं ध्यानांत. आहे एक असाच. नेहमीं मेला आपल्या तोऱ्यांतच असतो. त्याला वाटतें मीच काय तो रूपवान्. त्याचा बाई मला मोठा राग येतो. मेल्याचा दुसऱ्यांच्या बायकांवर डोळा. त्याला पाहिलें ह्मणजे कीं नाहीं पायाची आग मस्तकाला जाते. त्याच मेल्यानें इकडे जशी कांहीं भुरळ घातली आहे. एक दिवसाड दोन दिवसाड मेला बाटल्या घेऊन येतो, आणखी तो, आणि आमच्या येथें खोलीचें दार लावून पुष्कळ वेळ आपले आंत बसलेले असतात. इश्श! खोलींत गेलें ह्मणजे कायग बाई त्या बाटल्यांची घाण सुटत असते!

सर०—असें त्या बाटल्यांत असतें तरी काय?

रमा०—असायचें काय? दारूचें पाणी बरें का!

सर०—[आश्चर्यानें तोंडाला हात लावून] आतां बाई ह्या कर्माला काय ह्मणावें? वासुदेव भाऊजींनीं असा कसा ग अगदीं ताळ सोडला?

रमा०—आतां तूंच पहा ह्मणजे झालें.

सर०—बरें. इतके दिवस हें चाललें असून तूं मजजवळ अगदीं बोलली नाहींस कशी ?

रमा०—अगे, बोलूं तरी कशी ? आपलेच दांत आणि आपलेच ओंठ. आपली डोळ्यावर कातडें ओढून गप्प बसलें होतें झालें. आतांशीं खोलींतून बाहेर यायचें न यायचें झालें, कीं आपलें वेड्या वेड्यासारखें करायचें होतें. पुरतें जेवण सुद्धां जात नाहीं. झालेंच सारी रात्र धुंदींत असायचें. तेव्हां मनांत ह्मटलें आतां स्वस्थ बसून उपयोग नाहीं. स्वस्थ बसलें तर कांयीचें बायी होऊन एखादेवेळेस जिवाला फटकन् अपाय व्हायचा ! ह्मणून आज तुजजवळ ही कर्मकथा सांगायला आलें. तुझ्या सांगण्यानें त्या मेल्याचा कांहीं तरी भाऊजी बंदोबस्त करतील.

सर०—हें येथें अजून कसें समजलें नाहीं पण ?

रमा०—अग, त्यांना कसें समजेल ? त्या चांडाळाला पक्कें ठाऊक कीं, भाऊजी अमक्या वेळेस शास्त्र्याकडे शिकायला जातात, तेवढी संधि साधून मेला येतो. आणि ते परत येतात न येतात तों सगळें आटोपून करतो मेला काळें झालें.

सर०—[ अंग कांपवून ] बरें वासुदेव भाऊजींना यायला नेहमीं उशीर होतो ह्मणतेस तर रात्रीचे गे काय बाहेर करतात ?

रमा०—हें बाई कुणाला ठाऊक ? आणि येथें विचारावें कोणीं ? परवां यायला झाला उशीर, रोज होतोच, पण परवां फारच झाला. " इतका उशीर कां झाला " अशीं मी तोंडावाटे अक्षरें काढलीं मात्र, तों कुठलं

काय-आणि कुठलं काय! मर्जी गेली! रागावून मजवर एक एक येवढाला [ हातानें करून दाखविते ] डोळा केला. आणि हवें तसें बोलबोलून घेतलें. इतकें झालें पण मी चकार शब्द सुद्धां काढला नाहीं बरें का? कोठून हें विचारायला गेलें, असें मला झालें, आणि तोंडांत मारल्यासारखी आपली गप्प बसलें.

सर०—हें काय बाई तरी? बरें तेवढ्यानें तरी राग शांत झाला का?

रमा०—कोठला? "पान वाढून ब्राह्मण वाट पहात आहे उठायचें ना?" ह्मणून मी कांहीं वेळानें भीत भीत ह्मटलें, तर आपलें "मला जेवायचें नाहीं" ह्मणून साफ सांगणें झालें. मी सातदां पाया पडून "चुकलें ह्मटलें, नाक घासलें, पदर पसरला, आणि पुष्कळ तऱ्हेनें मनधरणी केली, पण ज्याचें नांव तें! मनाला एवढा देखील द्रव आला नाहीं बरें का! खरेंच बाई, पुरुषांचें मन कठोर. एक नाहीं, दोन नाहीं आपले लाल डोळे करून मुक्याचें व्रत धरलें होतें. शेवटीं मी येवढेंसें तोंड करून मुकाट्यानें उठलें, आणि आचाऱ्याला जेव ह्मणून सांगितलें. त्या रात्रीं आह्मांला आपला दोघांनाही उपास.

सर०—दुसरे दिवशीं तरी तुझ्याशीं बोलले का?

रमा०—कुठलें? अग तीन दिवस झाले. माझ्याशीं आपलें बोलणेंच सोडून दिलें आहे.

सर०—एक एक ऐकावें तें बाई अधिकच!

रमा०—अगे, तें कांहीं विचारूं नको. या कृष्णरावाच्या संगतीनें काय होईल आणि काय नाहीं हें कांहीं बाई

मला समजत नाहीं. सरस्वती, तीन दिवस मजबरोबर कोणी बोलत नाहीं तर असें वाटतें कीं मला रानांत टाकून दिली आहे कीं काय ? आणि रात्रंदिवस आपली जिवाला हुरहूर वाटते. रात्रीं अंमळ डोळा लागला न लागला कीं मेलीं कसलीं कसलीं वाईट स्वप्नें पडतात, आणि कितीदां झोपेंतून दचकून उठतें. असेंच रागानें बोलणें मुळींच सोडून दिलें तर सरस्वती, मी काय बरें करूं? [ डोळ्याला पदर लावून रडूं लागते. ]

सर०—रडूं नको ग, तुला अशी पाहिली ह्मणजे माझ्या पोटांत कसें भडभडून येतें. कालेजांतून यायचें झालें कीं नाहीं ह्मणजे हें सगळें सांगतें ह्मणजे कांहीं तरी भाऊजींना सांगणें होईल. ( रडूं लागते. )

रमा०—सांग बरें का पण. विसरूं नको.

सर०—नाहीं गे. विसरेन कशी?

रमा०—बरें येतें तर. [ डोळे पुशीत पुशीत जाते. ]

---

# अंक दुसरा.

## प्रवेश चवथा.

स्थळ—गोपाळराव पटवर्धनांचा पुण्यांतील वाडा.

( गोपाळराव प्रवेश करतो. )

गो०—[ स्वगत ] हं:! काय चमत्कार! एक एक ऐकावें तें विलक्षणच. हे असें करतील असें माझ्या स्वप्नीं देखील नाहीं! हल्लीं यांचें चित्त अभ्यासावर नाहीं येवढेंच काय तें मला ठाऊक. हें भयंकर प्रकरण आतांच

हिनें सांगितलें. पूर्वींच समजलें असतें तर बरें झालें असतें.. हिला तरी काय माहीत ? वहिनींनीं सांगितल्यावरून मजजवळ बोलली. हंः! विद्वान् व समंजस लोक असलीं भयंकर कृत्यें करण्यास प्रवृत्त होतात तर मूर्खांना कां हंसावें ?

( इतक्यांत रमाबाई येते व गडबडीनें ).

रमा०—भाऊजी, लवकर चला. उठा. तें पहा, पहा तर खरें, खालीं काय चाललें आहे तें. उठा उठा, लवकर चला.

गो०-[ आश्चर्यानें ] येतों; पण असें चाललें आहे तरी काय ?

रमा०—काय चाललें आहे आणि काय नाहीं, तें सगळें आल्यावर दृष्टीस पडेल. येथें कांहीं माझ्यानें सांगवत नाहीं.

गो०—हं—हं! चला, हा पहा उठलोंच. ( असें ह्मणून रमाबाई व गोपाळराव जातात. )

( वासुदेवराव व कृष्णराव चिरूट पीत खुर्च्योवर बसले आहेत. रमा व गोपाळराव, वासुदेवराव व कृष्णराव बसले आहेत त्या खोलीजवळ येतात.)

रमा०—[ हळूच ] भाऊजी, तें खोलीचें दार लावलें आहे तें. तेथें जा; ह्मणजे सगळें बाहेरून समजेल. [ असें ह्मणून रमाबाई वरांत जाते. ]

[ गोपाळराव खोलीचे दाराजवळ जाऊन भुकाटयानें आंत काय बोलणें चाललें आहे तें ऐकतात. ]

वासु०—[ हळूच ] कृष्णराव, केवढ्यानें बोलतां ? कोणी ऐकलें तर काय ह्मणतील ?

कृ०—[ गुंगींत ] कोण ऐकतें हो ? मग गोपाळराव शा-

त्याकडे गेलेले आपण पाहिलेंच. आणखी दोन तास कांहीं ते परत येत नाहींत. मग कोण ऐकतो?

वासु०–गोपाळराव जरी नाहींत, तरी दुसरीं मनुष्यें थोडीं आहेत का येथें? थोडें हळू बोला ह्मणजे झालें.

कृ०–शर्थ केलीत वासुदेवराव. आपण कोठें, चाकरमाणसें कोठें? त्यांना इतकें लांब ऐकायला जाईल तरी कसें? खरेंच; तुह्मी तरी बोवा फार भितां! समजा, त्यांनीं यदाकदाचित् ऐकलें तरी त्यांच्या हातून आमचें होणार काय? ते कोण ह्मणून त्यांना इतकें भ्यायचें? धडधडीत ते तुमचे चाकर.

वासु०–तें खरें; पण झांकली मूठ सव्वा लाखाची. जोंपर्यंत कोणाच्याच कानावर ही गोष्ट गेली नाहीं, तोंपर्यंत बरें.

कृ०–याकरतांच तुह्मांला ह्मणतों कीं हा वाडा सोडा. मग कोणाची भीति नाहीं आणि फीति नाहीं. खुशाल चैनीनें हवें तें करायला कांहीं हरकत आहे? वाडा पाहून देण्याचें काम मजकडे लागलें. हजार खटपटी करीन; पण वाडा असा उत्तम पाहून देईन कीं लोक पहातच रहातील.

गो०–(मनांत) वः खाशी तोड!

वासु०–वाडा पाहून तर ठेवाच. कितीही पैसे लागले तरी चिंता नाहीं. प्रारंभीं एके ठिकाणीं राहिलों हाच मी वेडेपणा केला.

कृ०–हें असो. [आठवल्यासारखें करून] बरी आठवण झाली. त्या गृहस्थानें अजून रुपये परत केले नाहींत, वासुदेवराव.

वासु०—कोणीं ?
कृ०—कोणी ? तुमच्या देखत तर त्याला दिले.
वासु०—माझ्या देखत ? मला नाहीं बोवा आठवत.
कृ०—हो; हो; खरें. त्यावेळेस तुह्मी नव्हतां.
वा०—बरें मग त्याचें काय झालें ?
कृ०—व्हावयाचें काय ? आठ दिवसांनीं परत देईन ह्मणून घेऊन गेला. त्याचा अद्यापि ठिकाण नाहीं. पहा ह्मणजे झालें. एखाद्यावर उपकार करायाला ह्मणून जावें तर असें होतें !
वासु०—त्याला असे रुपये दिलेत तरी किती ?
कृ०—तें कांहीं विचारूं नका. जे दिले ते दिले.
वासु०—तरी पण ?
कृ०—अहो, एकाला दिले ह्मणून सांगूं का दोघांना दिले ह्मणून सांगूं ? पुष्कळांनीं याप्रमाणें मला बुडविलें. आतां बोलूं नये आणि चालूं नये, चुरमुरे खात स्वस्थ बसावें झालें.
वासु०—अशा पाजी मनुष्यांना काय ह्मणून तुह्मी पैसे देतां ?
कृ०—पाजी आहेत हें आतां समजलें. पूर्वीं ठाऊक असतें तर असा मूर्खपणा मीं केलाच नसता. हं: ! काय मात्रागम्नी लोक तरी ? आपलें काम साधायाचें असलें ह्मणजे इतकी गरीबी आणि इतका सालसपणा दाखवितात कीं त्यानें शहाण्या मनुष्याची देखील अक्कल गुंग होऊन जाते. थोडे थोडके नाहीं; शंभर रुपये मला मिळतात ना ? पण वास्तविक विचाराल तर वासुदेवराव, या घटकेस दहा रुपये देखील मजजवळ शिलक नाहींत ! तुह्मी मागें पांचशें रुपये दिले ते

असेच गेले ! आतां या माझ्या भिडस्त स्वभावाला काय ह्मणावें ? घरचा खर्च पाहिला तर मी, आई, आणि दोन गडी—झालें. खरेंच दुसऱ्याला जर हें सांगितलें तर खोटें वाटेल. माझा स्वभाव तुह्मांला ठाऊक ह्मणूनच तुह्माजवळ इतकें बोललों. असो. आतां बडबड करून काय उपयोग ? [ मोठा सुस्कारा टाकतो ].

वासु०—गरीबगुरीबांपासून तों अगदीं गर्भश्रीमंतांपर्यंत संसारांत पैशाच्या नडी ह्या यावयाच्याच. मग उगीच असे कष्टी झाल्यासारखे कां होतां ?

कृ०—तुमचे रुपये देण्याची मुदत तर संपली—आणि जवळ तर पैसा नाहीं—या काळजींत मी रात्रंदिवस आहें—दुसरें कांहीं नाहीं.

गो०—भली पैसे बुडविण्याची युक्ति लढविली. किती भोळे वासुदेवराव—आणि हा उत्तम स्नेही ?

वासु०—येवढेंच ना ? आणि त्यांतून माझेच रुपये ना ? मग त्याची येवढी काळजी ती कशाला ? तुह्मांला मी पैशाबद्दल तगादा का लावला आहे ?

कृ०—नाहीं ह्मणून काय झालें ? ज्याचे घेतले—मग ते कोणाचे कां असेनात—त्याला बोलल्या बोलाप्रमाणें परत दिले ह्मणजे बरें.

गो०—हं: केवढा परत करणार ?

वासु०—तें खरें. पण तुह्मी अजून का देत नाहीं ? हें पहा—जेव्हां लोकांकडून तुमचें येणें येईल आणि जेव्हां तुमच्या सोईस येईल, तेव्हां सावकाश मला परत द्या. अहो—पैसा ह्मणजे काय पदार्थ आहे ?—स्नेहापेक्षां का

अधिक आहे ? कृष्णराव, तुह्मांला मी सांगून ठेवतों— एकदा मी ज्याला स्नेही ह्मटलें, त्याबद्दल दुसरें तर काय, पण प्रसंगीं मी आपला प्राण देखील देईन.

कृ०—वासुदेवराव, किती उदार स्वभाव हा! हे उपकार केव्हां फिटतील ते फिटोत!

वासु०—ह्यांत उपकार कसचे ? प्रसंगीं एकमेकांनीं एकमेकांच्या उपयोगीं पडलेंच पाहिजे. बरें. तुह्मांला एक विचारायचें विसरलोंच. आह्मांला एक स्वयंपाकी ब्राह्मण पाहून द्या. हल्लीं आहे, त्याला ही पुण्याची हवा अगदीं मानत नाहींशी झाली आहे. एक दिवसाड दोन दिवसाड बिचाऱ्याला कांहीं ना कांहीं तरी होतच असतें. तेव्हां लवकर त्याला गांवीं पाठवून दिला पाहिजे.

कृ०—[ बराच वेळ विचार केलासें करून ] ब्राह्मणच पाहिजे का बाई असली तरी चालेल ?

वासु०—बाई असली तरी चालेल. चांगल्या चालीची असून स्वयंपाक करण्यांत सुग्रण असली ह्मणजे झालें.

कृ०—त्याविषयीं तिळभर देखील शंका नको. अमकें पक्वान्न तिला, आणि येत नाहीं—असें नाहीं. एवढें मात्र. दरमाहा आठ रुपये घेईल. शिवाय जेवण—झालें—तुमच्यायेथें निजणार नाहीं, कारण तिचें येथें घर आहे.

वासु०—सगळें घरांतील तिचें कामकाज आटोपल्यावर, रात्रीची जाईना बिचारी घरीं ? दरमाहा आठ रुपये कांहीं फार नाहींत. दोन चार दिसांतच पाठवून द्या.

कृ०—हो. हो. दोन तीन दिवसांच्या आंतच.

वासु०—हें एक मोठेंच काम झालें. ( हंसून ) कृष्णराव, मला आणखी कांहीं तुह्मांला विचारावयाचें आहे.

कृ०—विचारा.

वासु०—तुह्मीं दुसरें लग्न करावें अशी माझी मनापासून इच्छा आहे. जी मदत लागेल ती मी देण्याला तयार आहें; आणि ती माझें देणें आहे ह्मणून घेण्याला संकोच करूं नका.

कृ०—छेः, छेः, छेः; वासुदेवराव, आतां मजजवळ लग्नाचें नांव देखील काढूं नका.

वासु०—तुह्मी खुळे आहां कृष्णराव! अहो, एक वाईट चालीची निघाली ह्मणून सगळ्याच का तशा असतात? भलतेंच वेड धरून बसूं नका. माझें ऐका.

कृ०—एवढें खेरीज करून तुह्मी सांगाल तें मी ऐकेन. खरेंच पुसाल तर त्या सटवीच्या भयंकर कृत्याविषयीं बालंबाल खात्री झाल्यापासून बायकांविषयीं माझें मन कसें, अगदीं विटून गेलें आहे. त्या रांडेची आठवण होतांच माझ्या आंगाची लाही होऊन जाते आणि कांहीं सुचेनासें होतें! तर असली गोष्ट पुन्हा काढूंच नका, एवढें मी तुमचेजवळ मागून घेतों.

वासु०—बरें बोवा राहिलें. तुमची मर्जी. (कांहीं वेळ डोकें धरून) मस्तक फिरायाला लागलें कृष्णराव, फार झाली वाटतें; छेः—आतां काय करावें?

कृ०—फार कसची? मला तर घेतल्यासारखें वाटत देखील नाहीं. परवां आमच्या येथें जशी मजा झाली त्याप्रमाणें झाली पाहिजे!

वासु०—परवां आपण घेतलेंच मनस्वी!

कृ०—मनस्वी? छेः; तेवढें पाहिजेच. त्याशिवाय मौज नाहीं. उगाच येवढेंसें शास्त्राला का घ्यायचें? जिवाला कांहीं

आनंद झाला तर त्या घेण्याचें कांहीं चीज. नाहीं तर घेतलें आणि न घेतलें सारखेंच.

वासु०--पाहिजे तर तुह्मी आणखी घ्या. तें ग्लास आणि ती बाटली.

कृ०—मी एकटा नाहीं घेणार. तुह्मीही घेतलें पाहिजे.

वासु०—हें काय वरें ? मी मघा घेतलें तेंच फार झालें.

कृ०—भलतेंच. भरलेल्या गाड्याला सूप का जड ? घ्या. हे. तेवढ्यानें काय कात होणार ?

वासु०—नको नको. मला वांति होत आहे वाटतें. हो आलीच.

[ असें ह्मणून गडबडीनें खोलीचें द्वार उघडून बाहेर जातात आणि ही संधी मिळतांच गोपाळराव आंत जाऊन कृष्णरावाजवळ बसतात.]

वासु०—[ खोलींत येतां येतां ] आतां साफ झालें. [ गोपाळरावांना पहातांच घाबरून मनांत ] अरे ! या वेळेस गोपाळराव येथें कसे आले ? आतां काय करावें ? ग्लास आणि बाटली तर यांच्यापुढेंच आहे ! आह्मी येथें आहों हें यांना कळलें कसें ? हिनें जाऊन सांगितलें यांत संशय नाहीं. होऊं नये तें झालें खरें; आतां काय होईल तें होवो.

गोपा०—कां, वासुदेवराव ? बसा. या वेळेस वमन होण्याचें कारण काय वरें ?

वासु०—कांहीं समजत नाहीं.

गोपा०—बरें, ही बाटली कशाची ? आणि या ग्लासांत हा काय आहे ?

वासु०—औषध आहे. मस्तक विलक्षण दुखायला लागलें

ह्मणून आतांच हें डाक्तराकडून आणिलें. इतका त्याला उग्र आणि आंबट वास येत आहे कीं माझ्यानें तें कांहीं केल्या घेववत नाहीं.

गो०—औषध खरेंच.—हंः! वासुदेवराव काय हें? विनाकारण खोटें कां बोलतां? जें तुमचें बोलणें चाललें होतें तें सर्व मी दाराबाहेरून ऐकलें. आज शास्त्रीबोवांची घरीं गांठ पडली नाहीं हें फार चांगलें झालें. नाहीं तर हा प्रकार कितीएक दिवस माझ्या दृष्टोत्पत्तीस आला नसता. वासुदेवराव, काय तुह्मी आरंभिलें हें? छे; छे; छे; वाईट हो वाईट. असलें आचरण धर्मभ्रष्ट आहे इतकेंच नव्हे, परंतु यापासून केवढाले भयंकर परिणाम होतात याकडे लक्ष द्या. आपण कोण, कोणाच्या उदरीं जन्मलों, करतों काय, सवरतों काय, आपल्या वाडवडिलांचें आचरण कसें होतें, त्यांनीं लोकांत कीर्ति कशी संपादन केली, आपण कोणता उद्देश धरून एथें आलों, या सर्व गोष्टींचा पूर्वीं विचार करायचा होता. येतेवेळीं नानासाहेबांनीं उपदेश केला, त्याची, वासुदेवराव, तुह्माला विस्मृति पडलीना? शिव! शिव! ज्या व्यसनासारखें दुष्ट व्यसन कोणतेंच नाहीं तेंच तुह्माला कसें जडलें! अजूनही सावध न व्हाल तर सर्वस्वीं आपली हानि मात्र करून घ्याल. एकदां मनुष्याला हें व्यसन लागलें, एकदां तो या व्यसनाच्या तडाक्यांत सांपडला, ह्मणजे बेफाम होऊन त्याचें त्यालाच, आपण काय करीत आहों याचें भान रहात नाहीं. दुष्ट कपटी आणि घातकी अशा लोकांची संगति लागून तो नानाप्रकारच्या कुमार्गांचें अव-

लंबन करण्यास प्रवृत्त होतो. या व्यसनाच्या पायीं कितीएक मनुष्य, मोठे धनवान् असतांही अन्न अन्न करीत लोकांचे दारोदार फिरूं लागले. कितीकांनीं तर लज्जेस्तव देशत्याग करून आपल्या कुलीन मातापितरांच्या तोंडाला काळिमा आणिली, आणि बिचाऱ्यांना वृद्धापकाळीं प्रचंड दुःखाब्धींत लोटून दिलें. ज्या कृत्यांचा मुखावाटे उच्चार करतांच आंगावर रोमांच उभे राहतात अशीं अनन्वित कृत्यें करतां करतां कित्येक अकालींच भयंकर मृत्यूच्या जबड्यांत सांपडले. हर ! हर ! हर ! केवढा मनुष्याचा वेडेपणा हा ! आतां या वेडेपणाला कांहीं सीमा राहिली का ? यापासून येवढाले दुःखकर परिणाम होत असून आणि ते तुह्मी नित्य आपल्या डोळ्यांनीं धडधडीत पहात असून या मार्गाला लागलां हें आश्चर्य नव्हे काय ? वासुदेवराव, आतां तुह्मांला माझें येवढेंच सांगणें आहे. होऊं नये ती तुमच्या हातून गोष्ट झाली त्याला उपाय नाहीं; परंतु आतां मात्र नीट खबरदारीनें असा. तुमच्या तीर्थरूपांनीं द्रव्य संपादन करून ठेविलें आहे त्याचा अशा नीच कृत्यांत अपव्यय न करितां तें चांगल्या कामीं लावाल तर त्यांतच तुमचें कल्याण आहे. [ कृष्णरावाकडे वळून ] हेच का आपण वासुदेवरावांचे स्नेही ! काय आपली योग्यता सांगावी !— अहो, उत्तम गुणांची प्राप्ति करून घेण्याचें एकीकडेच टाकून दुर्व्यसनाचा स्वीकार केलात याला ह्मणावें तरी काय ? बरें, आपण स्वतः करितां तें करितां, आणि दुसऱ्यांना त्याप्रमाणें करायला लावितां

हें चांगलें का ? कोणी कुमार्गाचें अवलंबन करीत असला तर त्याला दोन हिताच्या गोष्टी सांगून त्याला सन्मार्गाला लावणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य-कर्म आहे. असें असून हें कर्म वासुदेवरावांना करायला लावून मित्राला काळिमा आणणारे दुसरे राहूच झा-लांत अं ? वासुदेवरावांस या दुःखद स्थितीस आण-ल्याचें अपेश तुमच्यावरच देतों याचें कारण असें आहे कीं, लहानपणापासून तों आपला सत्संग होईपर्यंत—

[ गोपाळरावांचें बोलणें पुरें होण्यापूर्वींच कृष्णराव अगदीं लाल होऊन ह्मणतो. ]

कृ०—गोपाळराव, माझ्यापुढें या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी नकोत. मी असे वरकांतीं ब्रह्मज्ञान सांगणारे पुष्कळ हरि-भक्त पाहिले आहेत. वासुदेवरावांना अमुक कृत्य करा किंवा अमुक नका करूं असें मी हो कशाला सां-गायला जाऊं ? मला येवढी उठाठेव पाहिजे कशाला? वासुदेवराव कांहीं बोळ्यानें दूध पीत नाहींत समज-लांत ? त्यांना मीं बिघडविलें अशीं मात्र पुन्हा तोंडा-वाटे अक्षरें काढूं नका. काढाल तर माझ्यासारखा वाईट मनुष्य कोणी नाहीं.

गो०—असें रागावण्यांत काय अर्थ आहे हो ? वासुदेवरावांना मी हें कृत्य करायला लावलें नाहीं असें ह्मणायला तुह्मांला कांहीं लाज वाटत नाहीं ? हें पहा—तुह्मी कोणतेंही वाईट केलें तर त्यापासून थोडेंच माझें अन-हित व्हायचें आहे. परंतु तुह्मी वाईट मार्गाला लागूं नये ही माझी इच्छा याबद्दल तुह्मी कितीही

रागावलां तरी मला जें बोलायचें तें मी बोलल्याशिवाय कधींही रहाणार नाहीं.

कृ०-तुह्मांला जें बोलायचें तें वासुदेवरावांना खुशाल बोला. मला तुमचा उपदेश नको आणि कांहीं नको. माझें मला सर्व समजतें. माझा मी मुखत्यार आहें. लोकांनीं कितीही सांगितलें तरी माझ्या इच्छेस जसें येईल त्याप्रमाणेंच मी करीन.

गो०-मग माझें कांहीं बोलणेंच नाहीं. परंतु येवढी मात्र मजवर कृपा करा कीं, या वाड्यांत पुन्हा पाऊल टाकूं नका. पाऊल टाकाल तर विनाकारण उभयतांमध्यें कलह होण्याचा प्रसंग येईल. तसा प्रसंग येऊं नये ह्मणून मी ही तुह्मांला एकवार सूचना करितों.

कृ०-हं:-येथें आल्यावांचून कोणाचें अडलें आहे! हा चाललों पहा.

[ रागानें चडफडत निघून जातो. ]

गो०-वासुदेवराव,—

वा०-आतां या वेळेस तर माझ्याशीं बोवा कांहीं बोलूं नका. माझी प्रकृति बरोबर नाहीं.-तेव्हां चार घटका मला स्वस्थ निजूं द्या.

गो०-चिंता नाहीं. या वेळेस स्वस्थ निजा-मला दोन शब्द बोलायाचे आहेत ते मी उद्यां किंवा केव्हां तरी सावकाश बोलेन.

[ निघून जातात. ]

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

### स्थळ—पुणें—रस्ता.

कृष्णराव—[ त्वेषानें स्वतःशींच ] या वाड्यांत पाऊल टाकूं नका अँ ? अरे वा: ! अरे मी कृष्णराव, आणि माझा असा अपमान ? भगवद्भक्ता, वासुदेवरावासारखाच मी भोळा असेन असें समजलास काय ? सभ्यपणाचा डौल घालून ते दिवशीं मोठ्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगूं लागलास तेव्हां तुला कांहीं लाज वाटली नाहीं ? कांहीं भीति वाटली नाहीं ? मोठा शहाणा ह्मणवितोस; विद्वत्तेचा बाणा मिरवितोस, मग कोणाशीं कसें बोलावें, कसें वागावें हें कसें तुझ्या लक्षांत आलें नाहीं ? किती मूर्ख, किती अप्रबुद्ध आणि किती अविचारी तूं ? अरे, किती झालास तरी तूं सोलापुऱ्या. तुझी योग्यता तराजूच धरण्याची. विद्वत्तेची घमेंड बाणी बकालांपुढें किंवा घरांतल्या बायकांपुढें दाखविलीस तरच तुझी शोभा. तुला वाटलें असेल, कृष्णराव ह्मणजे कःपदार्थ; त्याला कांहीं जरी बोललास; कशीही त्याची निर्भर्त्सना केलीस; कशीही अप्रतिष्ठा केलीस तरी तो निमूटपणें सोसून घेईल.मी वास्तविक कसा आहें; मजमध्यें सामर्थ्य किती आहे—याविषयीं अद्यापि तूं अजाण आहेस. आजपर्यंत मोठे कुरे ह्मणत आले तर त्यांची डाळ या कृष्णरावानें शिजूं दिली नाहीं. तूं तर कोठल्या झाडाचा पाला. तुझी काय प्रतिष्ठा ? अरे तुझी काय बिशात ? ज्यांनीं ज्यांनीं माझें मन दुखविलें

त्यांना दे माय धरणी ठाय या गृहस्थानें करायला लावलें हें तुला ठाऊक नाहीं. सर्पावर पाग देऊं नये, तो तूं दिलास. आतां मात्र नीट खबरदारीनें ऐस. [ मिशांवर ताव देऊन ] हा कृष्णराव थोड्याच दिवसांत तुझी कशी वे करून टाकतो ती पहात रहा. असें बोलत आपले घरांत येतो व सावित्रीबाईस पाहून ) कां, सावित्रीबाई ? या वेळेस आपली स्वारी इकडे कोणीकडे ?

सावित्रीबाई—[ लाजल्यासारखें करून खालीं पहाते. ]

कृ०—कां, बोलत कां नाहीं ?

सा०—बाजारचा दिवस—कांहीं मिळेल ह्मणून आलें.

कृ०—हं, तेवढ्याबद्दल तुह्मी मोठ्या सावध. महिना भरण्याचा मात्र अवकाश. भरला कीं एक घटका आलीकडे किंवा पलीकडे झटली तर व्हायची नाहीं.

सा०—काय करावें रावसाहेब ? गरीबी मोठी कठीण आहे.

कृ०—ही तुमची रोजचीच रड आहे. काय झालें हो तुह्माला ? मजपासून च तुह्माला कांहीं नाहीं तरी महिन्याच्या कांठीं सात आठ रुपये मिळतात. आणखी कोणी हरीचे लाल असतीलच त्यांच्याकडूनही मिळत असेलच. झालेंच. लोकांना औषधपाणी करून देतां त्यावरही कांहीं मिळतें. पोर ना बाळ. मग इतके पैसे हो काय करतां ?

सा०—रावसाहेब, आपल्याला वाटतें मला दुसरीकडून पुष्कळ मिळतें; पण सगळा हा भ्रमाचा भोपळा आहे. खरें पुसाल तर आपल्यासारखे गुलहौशी, आतां कोणी नाहींत बरें का ? जो तो आपण बरा कीं आपली

बायको वरी. दुसरा तिसरा विचार करायचा तो कांहीं कोणी करीत नाहींत. तेव्हां माझ्यासारखीचा चरितार्थ कसा लागावा बरें ?

कृ०—हें सगळें तुमचें ढोंग आहे. यांत मला तर कांहीं तथ्य दिसत नाहीं.

सा०—आमच्यासारख्या गरीबांनीं कितीही जीव तोडून खरें सांगितलें, मान जरी कापून ठेविली, तरी, रावसाहेब, आपल्याला खरें ह्मणून वाटायचेंच नाहीं. खरेंच बाई, गरिबाचा त्राता कोणी नाहीं.

कृ०—सावित्रीबाई, आतां असें उपयोगाचें नाहीं. तुमच्या पाठीमागची ही दगदग मी मुळींच काढून टाकतों. इकडे पहा. तुह्माला कोठें स्वयंपाक करण्याची चाकरी दिली तर पतकराल कीं नाहीं ? महिना आठ रुपये मिळतील. शिवाय जेवण—झालेंच—कामकाज झाल्यावर तुह्मी आपल्या मोकळ्या त्या मोकळ्या.

सा०—असली चाकरी करण्याला मी तर एका पायावर तयार आहें. एखादी लावून द्यावी ह्मणून मागेंच मी आपल्या कानावर घालून ठेविलें आहे.

कृ०—बरें तर; उद्यां या; ह्मणजे मी आपल्या चाकराला तुमच्या बरोबर देतों. तो तुह्मांला त्या गृहस्थाचा वाडा दाखवील. ते माझे मोठे मित्र आहेत. आणि तुह्मांविषयीं मी त्यांची हवी तशी खात्री करून दिली आहे. तेथें तुह्मी अशा रीतीनें वागा कीं कोणालाही तुमच्या चालचलणुकीविषयीं येवढा देखील संशय येऊं नये.

सा०—तें काम माझें—मजविषयीं कोणाला संशय आला तर मग मी सावित्री कशाची ?

कृ०—बरें; परवां मी एक कामगिरी सांगितली होती त्याचें कसें काय झालें ?

सा०—[ गालांत हंसून ] व्हायचें काय रावसाहेब—मी असल्यावर का काम फत्ते व्हायचें राहील ?

कृ०—[ हर्षानें ] काय ह्मणतां काय ?

सा०—ह्मणायचें काय—कबूल झाली.

कृ०—आणि इतक्यांत ?

सा०—हो न व्हायला काय झालें रावसाहेब ? मोठ्या, नाकानें वांगीं सोलणाऱ्या त्यांना देखील या सावित्रीनें हं हं ह्मणतां फसविलें. मग हिची हो काय कथा ?

कृ०—सावित्रीबाई, तुमची शर्थ आहे बोवा. शाबास. बरें मग कधीं ?

सा०—उद्यांचाच दिवस मध्यें.

कृ०—छेः उद्यांचा दिवस दम कोणी धरावा ? अहो—शिजेपर्यंत दम धरवतो—निवेपर्यंत कांहीं धरवत नाहीं. तेव्हां आजच जमेल तर पहा.

सा०—सगळीच घाई. आजच बरें कसें जमेल ? माझ्या विऱ्हाडीं येण्याला चांगली संधी तर मिळाली पाहिजे ? ही रावसाहेब बाजारची भाजी नव्हे—कीं आपलें गेलें आणि चटकर घेऊन आलें. असलीं कामें मोठ्या युक्तियुक्तीनें करावीं लागतात—आणखी खटपट करावी लागते ती निराळीच—ती आपली आमची आह्मालाच ठाऊक. तिच्या नवऱ्यानें उद्यांच गांवाला जाण्याचा बेत केला आहे. तेथें त्याला चार सहा दिवस तरी लागतील. तो गेल्यावर मग, रावसाहेब आपलेंच राज्य - काय हवें तें करावें.

कृ०—तोंपर्यंत वेळ कसा जाईल तो जावो. असो. पण सावित्रीबाई—तुह्मी नुकतेंच केलेल्या कामाच्या पासंगाला देखील लागायचें नाहीं असें आणखी एक काम तुह्मांकडून करवायचें आहे. आणि तुह्मांशिवाय तें कांहीं होणें नाहीं.

सा०—पासंगाला देखील न लागणारें असें आहे तरी काय?

कृ०—मोठें नाजुक आहे. थोड्या आलीकडे या ह्मणजे सांगतों.

सा०—अग बाई! इतकें नाजुक तें काय? [ असें ह्मणत ह्मणत जवळ जाते. ]

कृ०—[ हळू ] तुह्मी ज्यांच्या घरीं उद्यांपासून चाकरीस रहाल त्यांची—

सा०—[ गालांत हंसून कृष्णरावाचें बोलणें संपण्याच्या पूर्वीं मध्येंच ] हं; हं; समजलें समजलें—येवढ्याकरिताच वाटतें मला तेथें लावून देणार?

कृ०—छे: हो, येवढ्याकरितांच असें कांहीं नाहीं. पण काय सांगूं सावित्रीबाई! तिला नुसती पाहिली मात्र. तेव्हांपासून मला असें कांहीं झालें आहे कीं तें माझें मला सांगतां सुद्धां येत नाहीं! तेव्हांपासून एक घटकाभर ह्मणजे मला निवांत झोंप लागली आहे असें कांहीं झालें नाहीं. जागा असतांना काय, स्वप्नांत काय, जेव्हां पहावें तेव्हां त्या रमणीची मूर्ति प्रत्यक्ष डोळ्यापुढें उभी!! एक क्षणभर देखील तिचा विसर पडत नाहीं!! तेव्हां याला करावें तरी काय?

सा०—रावसाहेब, येवढेंचना? आतां आपण अगदीं निश्चित असा. नांवाची मी सावित्री आहें. एकदां तेथें जाऊन

कांहीं दिवस मला राहूं तर द्या, ह्मणजे पहा तिला कशी मी फाशांत पाडतें ती.

कु०-अं, हं, हं, हः सावित्रीबाई, तसें नव्हे बरें. एकाएकीं भलतेंच करायला जाल तर फसाल-आणि माझ्या तोंडाला काळें लागेल तें निराळेंच. ती इतर गावगुंड बायकांसारखी नाहीं बरें. इतर बायकांना फसवितां तशी ती कधीं फसणार नाहीं. तिची प्राप्ति करून घेण्याची आहे तर मोठा दूरवर विचार करून चांगलीच युक्ति योजिली पाहिजे.

सा०-अं:, तें मला सांगायाला नको. तरी आपणही एखादी चांगली युक्ति सांगितली, तर तसें करण्यास मी कांहीं कसर करणार नाहीं.

कु०-त्याच मी विचारांत आहें; पण तूर्त तुह्मी येवढें लक्षांत ठेवा कीं तेथें जाऊन तुह्मी कांहीं दिवसपर्यंत मोठ्या गरीबीनें आणि साळसूदपणानें राहिलें पाहिजे. आतां तिला आपल्या हस्तगत करून कशी घ्यावयाची तें मी पुढें कधीं समक्ष सांगेन किंवा लिहून पाठवीन. तुह्मांला लिहितांवाचतां येतेंच.-मात्र मोठ्या खबरदारीनें काम केलें पाहिजे. कामगिरी बजाविल्यानंतर बक्षीस देण्याचें काम माझें. त्याविषयीं तुह्मी अगदीं बेफिकिर असा. असें बक्षीस देईन कीं तुह्मी ह्मणाल, वः!

सा०-बक्षिसीचें काय. सर्वस्वी माझा भार आपल्यावरच आहे.

कु०-बरें सावित्रीबाई बरी आठवण झाली. काय हो. तुह्मी आपल्या गांवाहून पळून येऊन येथें दडून राहिलां हें तिकडे कोणाला आतां समजणार नाहींना?

सा०–[ घाबरून ] रावसाहेब, पायां पडतें. अम्मळ हळू बोला.

कृ०–छे, छे, अगदीं भिऊं नका. या वेळेस येथें कोणी येत नाहीं.

सा०–आपल्याला माझी काळजी आहेच; पण ह्मणतात नाहीं कीं भिंतीला देखील कान असतात. [ हळू ] तिकडे समजणार कोठून? मी येथें दडून राहिलें आहें हें आपल्यावांचून रावसाहेब कोणाला ठाऊक नाहीं.

कृ०–तें खरें. पण आपला उगाच विचारतों. कारण हें प्रकरण जेव्हां तुमच्या गांवीं मला कळलें, अर्थात्, तेथल्या लोकांनीं जेव्हां मला सांगितलें तेव्हांच ते तुमच्या बारीक शोधांत होते. तेव्हां सांगायचें ह्मणून इतकेंच. नीट खबरदारीनें असा ह्मणजे झालें.

सा०–मी आपल्याकडून रावसाहेब पुष्कळ जपून आहें. माझा जीव मला नको आहे का? आपण मात्र कोठें कोठें बोलूं नये. सर्वस्वीं मी आपली आहें. माझें बरेंवाईट करणें आपल्या हातीं आहे.

कृ०–त्याची कांहीं चिंता करूं नका. बरें पण, काय हो सावित्रीबाई, मजजवळ मागें जी पूड ह्मणून ठेवायाला दिलीस त्या पुडीनेंच तो गृहस्थ मेला काय ?

सा०–[ घाबरल्यासारखी होऊन सुस्कारा टाकते व स्वस्थ बसते. ]

कृ०–हं, सांगाना परत्या. मजजवळ सांगायाला उगीच अनमान कां करितां ? झालें, गेलें, सर्व झालें–आतां काय त्याचें? पोलीस कांहीं तुमच्या मागें आणून ठेविलें नाहीं.

सा०—रावसाहेब, आपल्याला या तोंडानें सांगूं तरी काय ? त्या बिचाऱ्याचा जीव घेण्याची कांहीं तरी या हड-ळीला गरज होती का ? माझी पापवासना पुरविली नाहीं ह्मणून आणि मला जारिणी ह्मणाला येवढ्याच गोष्टीवरून त्याची मी वैरीण होऊन त्याच्या जिवावर उदार व्हावें काय ? रावसाहेब, केवढी मी चांडाळीण ! ब्राह्मणाच्या पोटीं आल्यें खरी पण खाटिकाच्या का-ळिजाहून माझें काळीज कठोर झालें ! तेव्हां केवढी घोर पापिणी मी ! धडधडीत मी तशी असून मला जारिणी ह्मणाला यांत मला राग तो कां यावा ? आणि असल्या क्षुल्लक गोष्टीबद्दल त्याला मी ही पूड दिली हें काय ? बरें. ही पूड दिल्यावर तरी शुद्धीवर येऊन त्यावर उतारा द्यावा कीं नाहीं ? उतारा माहीत असून देखील तो द्यावयाची मला औदसेला बुद्धि झाली नाहीं ! देवा, या अनिवार पातकापासून मी आतां मुक्त कशी होऊं ?—नको—हा देह नको—हा जीव नको ! ! आतां मात्र रावसाहेब या जिवाचा खरोखर कंटाळा आला !—[ सुस्कार टाकते. ]

कृ०—सावित्रीबाई, इतक्या कष्टी कां होतां ? अहो, कर्ता करविता सर्व ईश्वर आहे. आह्मी मनुष्यें काय करणार ? चलनवलन करविणारा सर्व तो. त्याच्या इच्छेनुरूप या सृष्टीची रहाटी चालली आहे. तेव्हां त्यांत पुण्य आणि पातक तें कोणतें ? जें झालें तें त्याच्याच सं-केतानें झालें. तुह्माला निमित्त मात्र करून तो अलि-प्त आहे येवढेंच. तेव्हां त्याचा तुह्माकडे काडीभर दे-खील दोष नाहीं, समजलांत ? उगीच वेड्यासारख्या

भलभलत्या कल्पना मनांत आणून आत. आपल्या जिवाला कांहीं त्रास करून घेऊं नका. हे पांच रुपये. जा आणि स्वस्थ मनानें आपल्या उद्योगाला लागा.

[सावित्री जाते आणि इतक्यांत कृष्णरावांचा गडी धांवत येतो.]

कृ०—कां रे ? असा धांवत कां आलास ?

गडी—रावसाहेब—ज्वागळकराच्या इतला त्यो बामन हाय, न्हाई सरकार गुमास्ता, गुमास्ता म्हनत्याती त्याला—त्यो आल्यावानी वाटतुया, सरकार. कालबी आला व्हता, परवाबी आला व्हता, तीन चार दिस एकसारख हेलपाट घालतुया; पन त्येची आन् आपली गाठ पडत न्हाई सरकार.

कृ०—[ लगबगीनें ] अरे तो आहे कोठें ?

गडी—आपल्या घराच्या पछ्याल त्ये इटूबाच देवाळ हाय न्हाई सरकार, तत येका बामनासंग ग्वाष्टी करतोया. हत इकल्यामंदी आलाच बगा.

कृ०—अरे तर जा लवकर—निघ, निघ—हें पहा, मी घरीं नाहीं म्हणून सांग जा—जा लवकर—नाहीं तर एकदम तो येईल.

गडी—बर हाय सरकार. [ जातो. ]

( इतक्यांत गुमास्ता दाराजवळ येऊन गड्यास पाहून .)

गु०—कां रे, घरांत आहेत कीं नाहींत ?

गडी—अं ? हंग असच डोकशाला मुंडास घालून गेल, आन तुमची वाटमंदी गाठ न्हाई पडली ?

गु०—शाबास ! आजही घरांत नाहींत ! ठीक. चांगला रोजगार ! आतां मी यजमानास जाऊन सांगूं तरी काय ? बरें, गेले कोणीकडून ?

गडी—आन तुमी कुनीकंड आला?

गु०—हा असा देवळाकडून.

गडी—ह्येवी तकडूनच गेल आन् तुमची गाठ पडली न्हायी ह्ये कस व्हर?

गु०—[ त्रासून ] बरें, येतील तरी केव्हां?

गडी—आन् मस्नी काय ठाव?

गु०—अरे तर, भल्या माणसा, विचारून तरी ठेवायचें होतें कीं नाहीं? मी रोज खेपा घालतों तुला ठाऊक नाहीं?

गडी—अव—तुमी म्हंगता त्ये संमद खर. पन कुनी त्येकान त्यास्नी इचारायला जाव? रागावल बिगावल ह्यंजी इनाकारन म्हंगत्यात न्हायी?

गु०—अरे विनाकारण काय? विचारलेंस ह्मणून ते तुला मारताहेत थोडेच!

गडी—भल तुमींबी. उग इचारल आन् चाकरीवर धोंड येऊनशानी गुदरली भंजी मंग? मंग आपल सवास्त घरामंदी फाकेस्त मारीत बसाव न्हायी? लई खासा रोजगार. तुमास्नी काय? गरिबाच कायबी व्हइना तकड!

गुमास्ता—ही तुझी बडबड पुरे. येतांक्षणीं वाड्यांत बोलाविलें आहे येवढें तरी त्यांना सांगशील कीं नाहीं?

गडी—हं, हं, त्ये माझ काम. वाजवी ग्वाष्टीला काय?

गु०—जातों तर आतां. सांगायाला विसरूं नको बरें?

गडी—बर हाय. रामराम.

गु०—रामराम. [ जातो. ]

कृ०—[ स्वगत ] चाकर असावा तर असा असावा. शाबा-

स बरें! ह्या जोगळेकराला वेड तर लागलें नाहीं? ह्या गुमास्त्याला रोज मजकडे पाठवितो, हें काय ह्मणून? मजपासून त्याला मिळणार काय? रुपये घेतल्याबद्दल त्याच्याजवळ थोडाच माझा रोखा गुंतला आहे! झालेंच. घेतले त्यावेळेस कोणीही जवळ नव्हता, मग ते परत मिळण्याची व्यर्थ कशाला आशा करतो कोणास ठाऊक! अं:; करीना विचारा, आपलें काय गेलें? अरे हो. बरी आठवण झाली. वाडा विकत घेतला त्याची किंमत पाठवून देण्याबद्दल वासुदेवरावांना लिहिलें पाहिजे. आतां स्वतः जावें तर वेळ नाहीं. बोटभर चिठ्ठीच पाठवावी ह्मणजे झालें. [ लिहितो. ] जयाजी—

( जयाजी येतो. )

गडी—जी सरकार.

कृ०—ही चिठ्ठी घे आणि वासुदेवरावांना नेऊन दे. त्यांना एकीकडे बोलावून मात्र दे हो.

गडी—जी सरकार. [ जातो. ]

कृ०—आतां आपण जेवून घ्यावें. ( जातो. )

---

# अंक तिसरा.

## प्रवेश दुसरा.

### स्थल—गोपाळराव पटवर्धनांचा वाडा.

रमा०—[ भीत भीत ] आज सकाळीं पत्र आलें तें कोणाचें?

वासु०—[ रागांत ] कां बरें!

रमा०—नाहीं, आपलें सहज विचारलें. मेली विचारायची देखील का चोरी?

वासु०—आलें होतें एकाकडून मग?

रमा०—पत्र आल्यावर इतके घाईघाईनें कोणीकडे जायचें झालें?

वासु०—तुह्माला काय सांगायचें? गेलों होतों असाच.

रमा०—मी जें विचारीन त्याला आपलीं वांकडीं उत्तरें द्यायचा अगदीं नेमच केला आहेना?

वासु०—यांत वांकडें उत्तर तें काय दिलें? बाहेर गेलों होतों ह्मणून सांगितलें. आतां कोठें गेलों होतों, कोठें बसलों होतों, काय बोलत होतों, काय करीत होतों, हें सर्व सांगायचें मात्र विसरलों! येवढी माझ्या हातून चूक झाली खरी! पदरांत घ्यावी!

रमा०—हातून चूक झाली ह्मणून मी या वाचेनें ह्मटलं तरी का? आपलें आपल्यालाच बोलून घेतल्यावर मग बाई तेथें दुसऱ्यानें काय बोलावें?

वासु०—कां बरें? मनास वाटेल तें बोलावें. कां असें बोललां, असें ह्मणण्याची थोडीच आमची प्राज्ञा आहे? बोलून चालून आह्मी मूर्ख! तेव्हां आपल्यासारख्या पोक्त आणि विचारी बायकांपुढें आमची काय प्रतिष्ठा?

रमा०—[ मनांत फार दुःखी होऊन सद्गदित कंठानें ] असें भलभलतेंच-नाहीं नाहीं तें आपलें आपल्यालाच बोलून घ्यायचें कां होतें? आतांशा मजवर इतका राग कां? खरेंच अशा बोलण्यानें माझें काळीज करपून जातें! मीं असा अन्याय तरी काय केला? जसें जसें सांगायचें होतें तशी तशीच वागतें. आजपर्यंत वांकडें उत्तर

एक तरी केलें आहे का, सांगायचें होतें. असें असतां मजवर इतकी गैरमर्जी कां? इतका माझा वीट कां आला? आह्मा बायकांना पुरुषांचा कायतो आधार. त्यांनीं जर आमचा तिरस्कार केला, त्यांनींच आह्माला हिडिस फिडिस केलें तर बरें आह्मीं काय करावें? आई सोडली, बाप सोडला, भाऊ सोडले, बहिणी सोडल्या आणि या पायांपाशीं आलें. आतां जर याच पायांनीं मला झुगारून दिलें तर मी जावें कोठें? मजकडून एखादा अन्याय झाला असला तर तो पोटांत घालावा. पदर पसरतें. [ असें ह्मणून पदर पुढें पसरते. ]

वासु०—जाणूनवुजून, अन्याय केला नाहीं असें ह्मणायला कांहीं लाज वाटत नाहीं?

रमा०—या पायांचीच शपथ, मला कांहीं आठवत नाहीं.

वासु०—काय शपथ!—मी आणि कृष्णराव त्या खोलींत बसलों होतों तें त्या दिवशीं गोपाळरावजींला कोणी जाऊन सांगितलें? त्यांना स्वप्न पडलें असेल नाहीं?

रमा०—तेवढें सांगितलें खरें, आतांशा जागरणें होऊन वरचेवर येथें कांहीं तरी होतें, आणखी हें समजल्यावर लोकांत नांवें ठेवतील, ह्मणून सांगितलें.

वासु०—व: फार चांगलें केलें! काय आपली गोष्ट सांगावी! गोपाळराव आणि आपण आहांत ह्मणून इतके दिवस तरी माझा निभाव लागला, नाहीं तर कधींच मला गाशा गुंडाळून पळून जावें लागलें असतें! बरें—एक दोन दिवसांत मी दुसरीकडे रहायला जाणार अर्थात् दुसरा वाडा परवां खरेदी केला आहे तेथें—आपण तेथें याल कीं नाहीं?

रमा०—आतां असें बोलणें पुरे करायचें होतें. येशील कीं नाहीं म्हणून काय बरें विचारायचें? मला काय जिकडे न्यायचें होईल तिकडे या घटकेला यायला तयार आहे.

वासु०—तें सगळें खरें. पण तिकडे गेल्यावर गोपाळरावांजवळ आमचीं गाऱ्हाणीं सांगायला सवड कशी होईल?

रमा०—चुकी झाली. पाहिजे तर माझ्या दोन तोंडांत माराव्या; पुन्हा असें कधीं कधीं सांगणार नाहीं.

वासु०—खुशाल सांगा—एकदां सोडून दहादां—आमच्याकडून अगदीं ना नाहीं. [असें म्हणून अंगरखा पागोटें घालून बाहेर जाण्यास निघतात.]

रमा०—परत यायचें केव्हां होईल?

वासु०—येईन तेव्हां. (जातात.)

रमा०—(फार खिन्न होऊन स्वगत) आतां इतक्या रात्रीं बाहेर जाण्याची कांहीं गरज होती? घरीं स्वस्थ निजायचें असतें तर झालें नसतें! पण चैन कोठलें पडायला! त्या मेल्या कृष्णरावानें बोलावलें असेल म्हणून जायचें. झालें. देवा! आतां या कृष्णरावाची संगत पुरे! झालें पुष्कळ झालें! आतां यापेक्षां अधिक तें आणखी काय तुझ्या मनांत करायचें आहे! मेल्यानें पैशापरी पैशाला बुडवून, नाहीं नाहीं तें चांडाळ शिकवायला लागला आहे! ह्या रोजच्या जागरणानें सोन्यासारख्या शरीराचें मातेरें बरीक होत चाललें आहे—आज काय डोकें दुखलें; काल काय ताप आला होता; परवां उष्ण झालें; हें एकसारखें आतांशा चाललें आहे! डाक्तरांकडून कसलीं कसलीं घाणेरडीं औषधें आणल्या-

वांचून एक देखील दिवस जात नाहीं. कांहीं तरी औषधाची गरज होती ? औषध कसें असतें तें या मागें माहीत देखील नव्हतें ! देवा ! शरीराची कांति तरी काय होती ! जसें पिकलेलें लिंबू. मला रूपानें इतकी चांगली ह्मणतात पण त्या रूपावरून मला ओंवाळून टाकावी असें होतें ! कोणी रेखून पाहिलें तर पाहणाराची दृष्टच लागावी ! बरें स्वभावाला नांवें ठेवायला येवढी तरी जागा होती का ? अमकें करणें ह्मणजे वाईट असें कोणी तरी ह्मणत होतें का ? ममताळू स्वभाव ह्मणजे कोण ? अमळ मला कांहीं झालें तर आंत बाहेर शंभरदां खेपा व्हायच्या ! रागावणें तर कसें तें ठाऊकच नव्हतें ! आणि मन तरी किती मोकळें ! पहिली तीच ना मी.! पण आतां रागावल्यावांचून एक दिवस सुद्धां जात नाहीं ! पहिलें मजबरोबर किती प्रेमानें आणि किती लडिवानें बोलायचें ! कांहीं करणें झालें तर मला विचारल्यावांचून कधीं केलेंच नाहीं. जिनें यावें तिनें ह्मणावें, काय बाई, असा अमोलिक जोडा कुठें पाहिलाच नाहीं ! देवा ! मागली आठवण झाली ह्मणजे हा जीव देखील नकोसा होतो, आणि कांहीं सुचत नाहीं असें होतें! आतां मी काय करूं ?—नको—नको या पुण्यांत रहाणें नको ! इथें येणें झालें नसतें तर बरें झालें असतें—आचार नाहीं विचार नाहीं, कांहीं नाहीं ! फुकट भाऊजींनीं इकडे आणण्याचा आग्रह केला ! त्यांना तरी पुढलें काय ठाऊक ? आमचें चांगलें व्हावें, आमचें कल्याण व्हावें ह्मणून त्यांनीं तरी एवढी खटपट केली. आमचें नशीब

असें त्याला ते तरी काय करितील ? त्या मेल्या कृष्णरावाचें आणि माझें कांहीं मागल्या जन्मींचें वैर होतें तें घेतो आहे साधून झालें ! इतकें जरी झालें तरी भाऊजी जवळ असल्यानें आजपर्यंत कांहीं तरी दाब होता; त्या मेल्याचें येथें येण्याचें तरी बंद झालें होतें. आतां काय दुसरीकडे रहायचें झालें ह्मणजे कोणी बोलणार ना सवरणार. नाहीं नाहीं तें तो करायला सांगेल आणि इकडे ऐकायचें होईल. काय मेल्यानें जशी भुरळ घातली आहे ? काय चमत्कार ! घटकाभर जर त्याची गांठ पडली नाहीं तर कांहीं येथें चैन पडत नाहीं ! मेल्यानें कांहीं नाहीं तरी दहा पांच हजार रुपयांना खार लावला असेल, पण अजून डोळे उघडत नाहींत याला ह्मणावें तरी काय ? भाऊजींशीं सख्य ह्मणजे किती होतें ! त्यांनीं आतां कांहीं चांगलें जरी सांगितलें तरी तें कडू वाटतें, आणि तो बोलेल ती पूर्व दिशा ! इतका मागें भाऊजींनीं उपदेश केला, पण पालथ्या घागरीवर पाणी ! देवा ! येवढा स्वभाव चांगला असतां असें कसें केलेंस ? असेंच तुझ्या मनांत होतें तर मला आधींच कां नाहीं बोलावणें पाठविलेंस ? भलभलतें करण्याची बुद्धि कां देतोस ? अज्ञानें परिणाम कसा लागेल ? आतां तरी दया कर आणि चांगली बुद्धि दे–एवढें माझें पदर पसरून तुला मागणें आहे. देवा ! कसें रे करूं !

[ असें ह्मणून फार विव्हल होऊन पलंगावर पडते. ]

सावित्री–[ खोलीच्या दारांतून डोकावते ] बाईसाहेब, बाईसाहेब,–

रमा०—[ पलंगावरून गडबडीनें उठून ] कोण आहे ?

सावि०—मी आहें बाईसाहेब.

रमा०—[ पलंगावरून खालीं उतरते ] आलें हो. काय बाई आत्तां जागी होतें—आणि इतक्यांतल्या इतक्यांत माझा आपला डोळा लागला !

सावि०—माझा हा पहिलाच दिवस बाईसाहेब. मी आहें गैरमाहीत. तेव्हां झाकापाक कशी काय करायची हें विचारायला आलें.

रमा०—चला. कसें काय करायचें तें मी सांगतें हो.

[ दोघी स्वयंपाकघरांत जातात. ]

---

## अंक तिसरा.

### प्रवेश तिसरा.

#### स्थल—पुणें—कृष्णरावाचें घर.

कृष्णराव—( एका हातांत रमाबाईचें पत्र व दुसऱ्या हातांत बनावट पत्र घेऊन ) आहा ! आतां मात्र हुबेहूब जमलें खरें ! प्रयत्न केल्यासारखें एकदांचें यश मिळालें. प्रयत्नाअंतीं परमेश्वर ही जी ह्मण आहे ती कांहीं खोटी नाहीं. वारे वा:! अगदीं हुबेहूब ! या अक्षरांत आणि यांत अगदीं तिळभर देखील भेद नाहीं ! शाबास माझी ! असें साधणार नाहीं ह्मणून इतके दिवस उगीच वेड्यासारखा स्वस्थ बसलों होतों. त्या सुंदरीचें हें अक्षर नव्हे असें आतां ह्मणेल कोण ? मगदूर काय कोणा लंडीची असें ह्मणण्याची ? मोठा धूर्त जरी कोणी असेल तरी त्याला देखील हें अक्षर बनावट आहे असें ह्मणण्याची मोठी मारामारच पडेल. मग

वासुदेवराव ओळखतील ही भीति कशाला पाहिजे ? किती भोळा आणि किती सरळमार्गी गृहस्थ तो ! त्या विचाऱ्याला आंतलें इंगित असें आहे, हें उमगणार कोठून ! आतां ते मजकडे येण्याचा मात्र अवकाश, आले कीं हें दाखविलेंच. आणि दाखविलें न दाखविलें तों माझा संकेत सिद्धीस गेलाच ! ( असें बोलत दोन्ही पत्रें टेबलांत ठेवितो आणि कांहीं वेळ विचार केल्यासारखें करून ) जयाजी— जयाजी—

ज०—( येतो ) जी सरकार.

कृ०—कायरे जयाजी ? वासुदेवरावांच्या नोकरांपैकीं काल ज्वरानें कोणरे मेला ?

ज०—ग्यानू सरकार.

कृ०—ग्यानू, काय ? अरे रे ! वाईट गोष्ट झाली ! मोठा गरिब मनुष्य होता नाहीं !

ज०—( किंचित् हसून) लई गरीब सरकार.

कृ०—हं: जा, तूं.(तो जातो व इतक्यांत वासुदेवराव येतात.) कोण वासुदेवरावजी ? अरे वा: या बसा. (खुर्ची देतो ) किती दिवस मुंबईत दडी मारलीत ही ?

वा०—फार दिवस लागले खरे.

कृ०—कशी काय लिट्लगोच्या परीक्षेची हालहवाल ? यंदां तरी पास व्हाल कीं नाहीं ?

वा०—नाहीं बोवा; यंदां देखील पास होण्याचें कांहीं चिन्ह दिसत नाहीं.

कृ०—पुढल्या वर्षी आणखी जाल तर मग ?

वा०—कोण मी? छे: आतां पुढल्या वर्षी नाहीं आणि कधींच नाहीं. आतां कालेज सोडतों आणि स्वस्थ घरीं बसतों.

कोण बेटा या परीक्षेचा जिवाभोंवतीं त्रास ! तीन खेप झाल्या तरीं आपलें येरे माझ्या मागल्या !

कृ०—त्रास तर खराच, द्या कालेज सोडून झालें. काय तुह्माला एफ्. ए. आणि बी. ए. होऊन करायचें आहे ?

त्रा०—तसेंच करतों आतां.

कृ०—बरें येथें आलांत कधीं ?

वा०—परवांच आलों.

कृ०—तुमचा म्यानू गडी तुह्मी आल्यावर वारला काय ?

त्रा०—होय बोवा—मी आलों ते दिवशीं दिवसभर किंहो चांगला होता ! बिचाऱ्याला ते दिवशींच रात्रीं ताप आला, आणि उपाय करितां करितां, काल एकाएकीं वायु होऊन पार मसलत !

कृ०—हं: ! कांहीं या देहाचा भरंवसा नाहीं !

वा०—कसचा भरंवसा आणि कसचें काय ! काय मनुष्य होता तुह्मांला सांगूं कृष्णराव ! तुह्माला ठाऊक आहेच. खरोखर नोकर लोकांत एक रत्न होतें ! त्याला केव्हां कोणतेंहीं काम सांगा, बिचारा आपला तयार. त्यानें ह्मणजे तोंड वाईट केलें आहे असें कधीं झालेंच नाहीं. सदा बिचारा आनंदांत ! ( सुस्कारा टाकून ) असा चाकर आतां मिळणें कठीण !

कृ०—कठीण खरेंच. काय हो वासुदेवराव, परीक्षा संपल्यावर इतके दिवस मुंबईत काय करीत होतां ?

वा०—कांहीं नाहीं. संपतांच इकडे येणार होतों; परंतु जे दिवशीं इकडे निघून येणार त्याच दिवशीं पडलों ज्वरानें आजारी. इतका ज्वर आला होता कीं येथून

इतकें ( काठीनें दाबून ) चालण्याची देखील माझ्या आंगीं शक्ति राहिली नव्हती.

कृ०—इतका ज्वर आला होता अं!

वा०—तें कांहीं विचारूं नका.

कृ०—इतके आजारी होतां मग मागून रमा वहिनींना कां नेल्या नाहीं?

वा०—नेण्याची कांहीं फारशी गरज पडली नाहीं.

कृ०—तें खरें, पण आपलें मनुष्य आपल्याजवळ असलें ह्मणजे बरें. या पुण्यासारख्या शहरांत एकट्या बायकोला इतके दिवस ठेवून जाणें ह्मणजे थोडें अप्रशस्तच.

वा०—कांहीं नाहीं; अप्रशस्त कसलें?

कृ०—अप्रशस्त कसलें? हं: हें काय बोवा आपलें मत आहे. तुह्माला नसेल अप्रशस्त वाटत. असो. त्याचें काय? बरें पण तुह्माला एक विचारायचें राहिलेंच. नव्या वाड्यांत येऊन राहिलां तेव्हांच विचारणार होतों; पण तुह्मी मुंबईस गेल्यामुळें तें तसेंच राहिलें.

वा०—तें काय?

कृ०—येवढेंच विचारायचें होतें कीं स्वयंपाकीणबाई कशी काय आहे?

वा०—खरोखर फारच चांगली आहे. स्वयंपाक नामी करिते. स्वभावानें अगदीं भोळसट व साळसूद दिसते. आणखी यापेक्षां अधिक काय पाहिजे?

कृ०—मग चिंता नाहीं. येवढेंच तुमच्या तोंडांतून मला ऐकायचें होतें. बरें, या वाड्यांत आल्यापासून गोपाळराव तुह्मांकडे येतात का कधीं?

वा०—हो. एक दोन दिवसांनीं, एक दोन दिवसांनीं येत असतात.

कृ०—आल्यावर त्यांचीं उपदेशपर भाषणें होत असतीलच!

वा०—हो. तीं ऐकायचींच. आपल्याला काय, सांगतील तसें हो हो ह्मणावें आणि या कानानें ऐकून त्या कानानें सोडून द्यावें झालें. अरे हो. बरी आठवण झाली— आपल्या गोपाळरावजींला काल पोलीस इन्स्पेक्टरची जागा मिळाली.

कृ०—[ आश्चर्यानें ] गोपाळरावांला? एकदम एवढी मोठी आणि विशेष जबाबदारीची जागा? हंः! आश्चर्य आहे. बरें ही जागा मिळायला त्यांना वशिला कोणाचा?

वा०—आपल्या कालेजांत प्रिन्सिपाल साहेब आहेत त्यांचा. त्यांचें आणि पोलिस इन्स्पेक्टर जनरल साहेबांचें अगदीं जिवस्य कंठस्य आहे. प्रिन्सिपाल साहेबांची गोपाळरावजींवर पूर्ण मर्जी हें तुह्मांला ठाऊकच आहे—

कृ०—हो. ते यांचे वडील आणि हे त्यांचे चिरंजीव. तेव्हां झालें हें ठीकच झालें.

वा०—शिवाय गोपाळरावांची बी. ए. ची परीक्षा होऊन एम. ए. चीही झाल्या कारणानें ही जागा त्यांना मिळाली; इतकेंच नव्हे त्या जागेला आवश्यक अशा ज्या कांहीं आणखी गोष्टी असाव्या लागतात त्या देखील त्यांच्या अंगीं आहेतः—शरीराचा बळकटपणा, धूर्तपणा, घोड्यावर उत्तम बसतां येणें, तरवार खेळणें, गोळी घालणें, वगैरे गोष्टींचा त्यांना बाळपणापासूनच नाद असे, आणि आजपर्यंत त्यांत श्रम देखील त्यांनीं तसेच केले—

कृ०—आणि या कामावर पूर्वी होता त्याचें काय झालें?

वासु०—त्याला कमी हुद्याची जागा दिली असें ऐकतों. याचें कारण असें कीं हल्लीं या शहरांत दरोडेखोर लोकांच्या दोन चार टोळ्या आल्यानें. येथील लोकांस विलक्षण त्रास झाला आहे हें तुह्मांला ठाऊकच आहे.

कृ०—हो, मग?

वासु०—त्यांनीं दोन चार ठिकाणीं दरोडे घालून बऱ्याच मनुष्यांचे खून केले आणि अतिशय नासाडी केली. इतकी भालेरावी चालत असून, ते लोक आले कोठून, आहेत कोठें व किती आहेत वगैरे गोष्टींचा अद्यापि कांहीं देखील त्यांना थांग लागला नाहीं. याकरितां त्या हुद्याला अगदीं नालायक ठरला ह्मणून यांची त्यांच्या योग्यतेनुरूप नेमणूक झाली.

कृ०—असें काय? आतां हे राव काय ध्वज लावणार?

वासु०—काय होईल तें दिसेलच.

कृ०—काय व्हायचें काय? व्हायचें तें दिसत आहेच. (विचार केल्यासारखें करून) तुह्मांला आतांच मी काय ह्मणणार होतों पहा—हो. गोपाळराव तुमच्या वाड्यांत नेहमीं येतात अं?

वासु०—हो. नेहमीं येत असतात ह्मटलें तरी चालेल.

कृ०—हंः! वासुदेवराव, जरी तुह्मी त्यांचे बाळमित्र अहां तरी इतकें संघट्टण त्यांच्याशीं न ठेवाल तर बरें.

वासु०—कां बरें? येईनात बिचारे. आले ह्मणून माझें कोणतें नुकसान आहे? वाड्यांत नको येऊं ह्मणून त्यांना सांगावें तरी कसें?

कृ०—कां बरें? अशा मनुष्याला सांगायला काय हरकत आहे?

वासु०—हरकत कसली? पण जो गृहस्थ मोठा सुशील, मोठा विद्वान् आणि जो आपला बाळमित्र अशाला तुह्मी ह्मणतां असें स्पष्टपणें सांगायाचें कठीणच.

कृ०—( गंभीरपणानें ) नका सांगूं. माझें कांहीं जात नाहीं. हें पहा, गोपाळराव कांहीं माझे वैरी नाहींत. मग मी तरी तुह्मांला इतका कशाला आग्रह करूं? पण सांगून ठेवतों—जितकें त्यांच्यापासून दूर दूर रहाल तितकें बरें. असें करण्याचें कारण काय ह्मणून कदाचित् तुह्मी विचाराल तर तें तुह्मांजवळ सांगावें किंवा न सांगावें याची मनांत मोठी शंका येते. हं: ! काय दुष्ट लोक तरी ! पोटांत एक बाहेर एक—कांहीं असल्या लोकांचा अंत लागायचा नाहीं !

वासु०—कृष्णराव, या तुमच्या बोलण्याचा झोंक कांहीं ध्यानांत येत नाहीं.

कृ०—बरोबर. तुह्मांला ध्यानांत आणतां कसें येईल? प्रत्यक्ष जेव्हां पहाल तेव्हांच तुमचे डोळे उघडतील. [ सुस्कारा टाकून ] शिव ! शिव ! शिव ! देवा ! केवढें धाडस हें ! या धाडसाला कांहीं सीमा आहे ! हं: !

वा०—[ आश्चर्यानें ] कृष्णराव, असें झालें तरी काय?

कृ०—काय वासुदेवराव, मी आपलें कपाळ सांगूं? हें प्रकरण तुह्मांजवळ सांगुन काय उपयोग? वासुदेवराव तुमचेसारखा मात्र दुर्दैवी प्राणी या जगतांत कोणीही नसेल. असो. तुह्मी या गोष्टीला काय कराल? तुह्मांकडे काय दोष आहे?

वा०—असें अर्धं अर्धं काय बरें बोलतां?

कृ०—वासुदेवराव, गोपाळराव आणि तह्मी स्नेही ना? परम

स्नेही ना? आणि पुन्हा एका ठिकाणचे! छे:, कांहीं आतां विचार राहिला नाहीं.

वा०—आणखी आपलेंच. काय तें मला सगळें सांगाना पण?

कृ०—राम! राम! काय सांगूं तरी काय? मुखावाटे उच्चार करण्याला सुद्धां माझें मन घेत नाहीं. देवा! केवढें धारिष्ट हें!

वा०—मला असा विस्मयांत नका पाडूं. सांगा. काय झालें तें चट्कर सांगून टाका.

कृ०—नाहीं बोवा माझ्यानें कांहीं सांगवत नाहीं! सांगाच असा आग्रह आतां नका करूं. सांगणार होतों पण सांगितलें नाहीं हा खरोखर मी शहाणपणा केला. गोपाळरावाशीं मात्र यापुढें बेतानें वागा एवढेंच तुह्मांला माझें,हात जोडून सांगणें आहे. मग ऐकणें किंवा न ऐकणें हा तुमचा अधिकार आहे. [मोठा सुस्कारा टाकून] ईश्वरा! अशा मित्रद्रोह करणाऱ्या घातकी दुष्टांना तूं काय ह्मणून निर्माण करितोस? असे घातकी प्राणी या भूमंडळावर नसते तर पृथ्वी ओस पडली असती काय?

वा०—कृष्णराव हेंच का तुह्मी स्नेही! तुमचें माझें इतकें सख्य असून सांगायला मागें पुढें पाहतां अं?

कृ०—हें पहा. गोपाळराव आणि तुह्मी स्नेही. आणि ते तर आतां इन्स्पेक्टर झाले. कसें झालें तरी लहानपणापासून ते तुह्मांबरोबर खेळलेले सवरलेले. एकमेकांला एकमेकांचा स्वभाव माहीत. आह्मी काय दोन दिवसांचे तेव्हां न जाणो. आह्मीं कांहीं सांगितलें आणि तुह्मांला

तें खरें वाटलें नाहीं तर त्या सांगण्याचा काय उप- योग ? मग त्या सांगण्याची काय बूज ? मग आम्हीच लबाड ठरणार कीं नाहीं ? तेवढें पाहिजे कशाला ? हो. बुढ्या चिखलांत दगड टाकून शिंतोडे घ्यावे कोणी ? सांगायची बुद्धि झाली नाहीं हें फार चांगलें झालें.

वा०—कृष्णराव तुम्ही कांहीं सांगितलें, आणि तें मला खरें वाटलें नाहीं, असें कधीं तरी झालें आहे का ?

कृ०—तें सर्व खरें. परंतु अशी नाजुक गोष्ट उघडकीस आणण्याचें कठिणच; आणि त्यांतून ती तुम्हांजवळ.

वा०—(रागावून) तुमची मर्जी. इतके दिवस समजत होतों कीं जसा मी तुमच्याशीं निष्कपटपणें वागतों तसेच तुम्हीही मजबरोबर वागतां; परंतु ही माझी चुकी होती असें मला स्पष्ट दिसून आलें. तें गूढ सांगा अ- सा पुन्हा उच्चार करीन तर शपथ !

कृ०—तुमच्याशीं मी कपट करितों असें जर तुम्हांला वाट- त असेल तर माझा ना इलाज आहे. मी तुमच्याशीं कोणत्या भावानें वागतों हें माझ्या अंत:करणालाच ठाऊक.

वा०—( रागांत ) खरें आहे ! (असें म्हणून जाऊं लागतात)

कृ०—[ वासुदेवरावांना कांहीं पावलें जाऊं दिल्यावर त्यांचा हात धरून ] वासुदेवराव, हें काय ? कोठें, चाललांत कोठें ? असें वेड्यासारखे रागावतां काय ? या इकडे— हं, हें काय बरें ? येऊन बसाल तर खरें ?

वा०—कशाला ? मी आपला जाणार. हें सोडा—विनाका- रण बसण्यामध्यें काय अर्थ आहे ?

कृ०—याहो.

वा०—हें काय बरें? आतां उगाच आग्रह कां? समजलें, समजलें किंपत तुमचा स्नेह आहे हें समजलें. पक्की खात्री झाली. मीच मूर्ख ह्मणून तुह्मांकडे वरचेवर येतों. पुन्हा या घरांत पाय टाकीन तर कानाला खडा!

कृ०—वासुदेवराव कोण राग हा? कांहीं सारासार विचार नाहीं ह्मणजे काय?

वा०—सारासार विचार करण्याची अक्कल असती तर तुमच्याशीं मी स्नेह जोडला असता कशाला, आणि या ठिकाणीं आलों असतों तरी कशाला? ती नाहीं ह्मणून तर इतकें. हं. सोडा. विनाकारण माझी कटकट पाहिजे कशाला? [ सुटण्याचा प्रयत्न करितात. ]

कृ०—असें काय करितां वासुदेवराव? या आतां पुष्कळ झालें! काय झालें तें मी सांगतों मग तर झालें कीं नाहीं?

वा०—कशाला? कांहीं नको. सांगण्याचें इतकें संकट पडतें मग सांगतां तरी कशाला? कांहीं गरज नाहीं.

कृ०—बरें. पुरे आतां हा राग. [ ह्मणून वासुदेवरावांस खुर्चीवर बसवितो. ] तुह्मी इतके रागावाल असें मला वाटत नव्हतें. [ हंसत ] घेतांना कांहीं अधिक उणें तर आज घेतलें नव्हतें ना?

[ कांहींएक उत्तर न देतां वासुदेवराव स्वस्थ बसतात. ]

कृ०—वासुदेवराव, सांगूंच तर आतां?

वा०—हं—[ इतकेंच ह्मणून स्वस्थ बसतात. ]

कृ०—सांगतों तर अं? न सांगण्याचें कारण इतकेंच—तुह्मी अलीकडे ज्वरानें झालां आहां फार अशक्त. आणि तुह्मांला जर हें भयंकर वर्तमान कळविलें तर पट्कन

तुमचें पित्त भडकून भलत्याचें भलतेंच कांहीं तरी व्हायचें. असें असून सांगाच ह्मणत असाल तर माझ्या कडून ना नाहीं.

वासु०—ना नाहीं तर सांगाच. अशक्त झालों ह्मणून काय झालें? मनांतून सांगायचें नाहीं ह्मणून कांहीं तरी आपलें सांगतां, झालें.

कृ०—पहा बरें वासुदेवराव. दूरवर विचार करा. मी जें आतां सांगणार त्यापासून तुमच्या जिवाला विलक्षण संताप होऊन रागाच्या सपाट्यांत कांहीं तरी अघटित कर्म कराल ह्मणून मी भितों. कांहीं भलतेंच करण्याला उद्युक्त व्हाल तर तसें मी कधींही करूं देणार नाहीं. झालें, जसें मी सांगेन त्याप्रमाणें ऐकलें पाहिजे. हें सर्व जर पत्करत असेल तर मी सांगतों. नसेल पत्करत तर खुशाल आपले घरीं चालते व्हा. जें आहे तें मीं सांगितलें. मग याचा तुह्मांला राग येवो किंवा लोभ येवो.

वासु०—सांगाल त्याप्रमाणें ऐकेन मग तर झालें कीं नाहीं.

कृ०—मग चिंता नाहीं.

वासु०—हं, सांगा तर लवकर, हं, आटपा.

कृ०—[ सुस्कारा टाकून ] शिव! शिव! शिव! वासुदेवराव, तुमच्याशीं असा कृतघ्नपणा या दुष्टानें करावा कायहो? आपल्याला मोठा सद्गुणी ह्मणवितो ना? धिःकार असो त्याचे विद्येला! धिःकार असो त्याच्या जिण्याला! मी बरेच दिवस समजत होतों कीं, हा मात्रागमनी जसा वरआंगीं सभ्यपणाचा डौल मिरवितो तसाच अंतरंगींही असेल. परंतु आतां त्या

लुच्चाच्या सभ्यपणाविषयीं माझी चालंबाल खात्री झाली. अरेरे ! केवढा भयंकर मनुष्य हा ! बरें, हा कितीही वाईट असला, कितीही अविचारी असला ह्मणून वहिनींनीं असें दुर्धर कर्म करावें ! असें कर्म करण्याची त्यांना कांहीं गरज ? कोणत्या तरी गोष्टीची त्यांना उणीव आहे ? तुह्मासारखा सुस्वरूप, ममताळू आणि धनाढ्य भ्रतार असून अशी भिकार वासना त्यांना व्हावी? त्यांना सोडून एक महिनाभर देखील तुह्मी बाहेर राहिलां नाहीं तर ही दशा; मग एक एक. दोन दोन. वर्षें त्यांचा तुमचा वियोग झाला तर ह्या काय करतील कोण जाणे ! हर ! हर ! अशा बायका केव्हां केसानें गळा कापतील याचा नेम नाहीं ! " स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः "!

[ सुस्कारा टाकून स्वस्थ बसतो. ]

वा०—[ संतापून ] काय ? काय ? त्या सटवीनें काय कृत्य केलें तें स्पष्टपणें कळू द्या. सांगा लौकर.

कृ०--काय, सांगू तरी काय ? तुह्मी मुंबईस गेल्यावर एके दिवशीं सहज फिरण्याकरितां ह्मणून संध्याकाळचे सुमारें चार वाजतां पर्वतीवर गेलों होतों. परत येतांना तुमच्या वाड्यावरून आलों तों तुमचा थोरला दरवाजा लागलेला दृष्टीस पडला. भलत्याच वेळेस दरवाजा बंद असण्याचें कारण काय ह्मणून पाहायाला गेलों तों कर्मधर्मसंयोगानें माझी नजर दाराच्या फटींतून सहज तुमच्या समोरच्या खोलीकडे गेली आणि आंत पाहिलें तों विलक्षण चमत्कार दृष्टीस पडला. हर ! हर ! केवढें अघोर कृत्य तें ! स्मरण होतांच आंगावर कांटाच उभा राहतो !

वा०–सांगा–काय पाहिलें तें लौकर सांगा.

कृ०–काय सांगूं कपाळ! खोलीच्या दाराच्या आंत रेखून पाहिलें तों तुमचे परम स्नेही गोपाळराव आणि रमावहिनी मुखावाटे उच्चार करण्यास देखील अयोग्य अशा प्रकारची विचकट थट्टामस्करी करीत उभी होती. वारे वाः लंगोटीयार स्नेही खरा. असा मासला पाहूं गेलें तरी मिळणें कठीण. हा प्रकार मी पाहिला मात्र, तों काय सांगूं. वासुदेवराव, माझ्या सर्वांगाची लाही लाही होऊन गेली आणि कांहीं सुचेनासें झालें! असें वाटलें कीं, या मित्रद्रोह करणाऱ्या मांगाचें या वेळेस डोकें उडवावें परंतु तसें वाटून उपयोग काय? दाराची कडी काढण्याकरितां नोकर लोकांना पुष्कळ हाका मारल्या पण ओ देतो कोण? मला वाटतें, त्या चोरानें सर्वांना कांहीं ना कांहीं कामें सांगून त्या वेळेस बाहेर घालविलें असावें. माझी हांक आंत जातांच दोघांनीं खजिल होऊन एकमेकांच्या मिठ्या सोडल्या, आणि खापरासारखीं तोंडें करून दोघें दोहोंकडे दडून राहिलीं!! पुढें काय करावें याचा मला विचार पडला. रागाच्या आवेशांत असें वाटूं लागलें कीं हा प्रकार रस्त्यावरच्या लोकांस कळवून कोणत्याही तऱ्हेनें वाड्यांत शिरावें आणि त्या भामट्याची टर उडवून सोडावी. परंतु मनांत विचार केला कीं असें करणें उपयोगी नाहीं. ह्मटलें, असें केल्यानें तुमच्या अब्रूला धक्का पोंचेल आणि सर्वस्वीं तुमच्या तोंडाला काळिमा येईल. ह्मणून सर्व राग पोटांत गिळून मुकाट्यानें तेथून निघालों, आणि दोघांच्या या अघटित कृत्याचें आश्चर्य करीत घरीं आलों.

वा०—( शंकित मुद्रेनें ) काय कृष्णराव बोलतां. गोपाळराव-जींनीं असें कृत्य केलें ? आमच्या गोपाळरावजींनीं ? नीट-आपल्या डोळ्यांनीं पाहिलेंत ?

कृ०—पाहिलें यांत संशय कीं काय ? वासुदेवराव, गोपाळ-रावांचें नांव ऐकून तुह्मांला आश्चर्य वाटेल यांत नवल नाहीं. कारण हें भयंकर कृत्य करितांना त्यांना मीं धडधडीत आपल्या डोळ्यांनीं पाहिलें असून घरीं परत आल्यावर मी देखील विस्मयांत पडलों, आणि माझी अक्कल गुंग होऊन गेली ! असें वाटूं लागलें कीं येवढे सद्गुणी आणि येवढे विचारी असून, अशी गोष्ट गोपा-ळरावांच्या हातानें होईल तरी कशी ? अशा विलक्षण कल्पना मनांत येऊं लागल्या कीं तुमचा वाडा सम-जून भलत्याच वाड्याकडे तर मी गेलों नसेन ना ? तात्पर्य काय, कीं अशा वेड्या कल्पना मनांत येतां येतां सरत्यांदा असा मनाचा ग्रह झाला कीं हें कृत्य गोपाळ-रावांचें नव्हे. त्या वेळेस मी कांहीं तरी दुसऱ्याच ना-दांत असेन आणि त्या नादांत झालें असेल एक आणि मी समजलों असेन भलतेंच. अशी चित्ताची पूर्ण खात्री झाली आणि मी आपल्यास शतमूर्ख समजून गप्प बसलों. या गोष्टीला तीन चार दिवस झाले नाहींत तोंच दुसरा चमत्कार नजरेस आला. हा प्रकार जर उघडकीस आला नसता तर गोपाळरावांच्या चांगुल-पणाविषयीं मला तिळभर देखील शंका आली नसती, आणि हें दुःखकारक वर्तमान तुह्मांला कळविण्याची गरजही पडली नसती.

वा०—[ मनांतल्या मनांत संताप व आश्चर्य या दोहों वि-

कारांनीं युक्त मुद्रेनें] काय काय? दुसरा काय चमत्कार पाहिलात? एकदां काय तें सर्व कळूं द्या.

कृ०—कळवायचें काय? हें पहा गोपाळरावांच्या नांवचें पत्र! [ असें ह्मणत टेबलांतून बनावट पत्र काढून ] ही पहा रमा वहिनींची सही. वाचा. पहा स्त्रियांचें धाडस कसें विलक्षण असतें तें. तुमच्या ग्यानूची तो तर बिचारा गेलाच—आणि माझी रस्त्यांत गांठ पडली नसती आणि युक्तीनें त्याजजवळून हें घेतलें नसतें तर हें बेंड कितीएक दिवस बाहेर फुटलेंच नसतें. परंतु अघोर पापकर्म हें लपवून किती दिवस लपणार? आज नाहीं उद्यां, उद्यां नाहीं परवां, केव्हां नाहीं केव्हां तरी तें उघडकीस यायचेंच. मघा जी मी एकंदर हकिकत सांगितली तिचा आणि या पत्राचा कसा बरोबर मेळ पडतो पहा.

वा०—[ पत्र वाचून एक मोठा दुःखाचा उसासा टाकून ] हर! हर! ईश्वरा! केवढा मी दुर्दैवी! केवढा अभागी मी! अरे! ज्याच्या सभ्यपणाविषयीं आणि जिच्या पातिव्रत्याविषयीं यावत्कालपर्यंत मला एवढी देखील शंका आली नाहीं, आणि हें पत्र पाहिलें नसतें, तर या पुढेंही आली नसती त्यांनीं माझ्याशीं असें तस्कराप्रमाणें वागावें काय? कृष्णराव, हें पत्र पाहतांच माझें अंतःकरण फाटून गेलें! आतां मात्र त्या मात्रागमन्याच्या आणि त्या कृतघ्न जारिणीच्या दुर्धर कर्माविषयीं माझी खातरी झाली. मघां तुह्मीं जें सांगितलें त्याच्या खरेपणाबद्दल मला संशय आला त्याची मी हात जोडून तुह्मांजवळ क्षमा मागतों. कृष्णराव

राहून राहून वाईट तर वाटतेंच कीं या घटकेपासून ती मला मुकली आणि मी तिला मुकलों, व गोपाळराव मित्र होते ते शत्रु झाले—[ क्षणभर थांबून एकदम संतापानें लाल पडतो व दांत ओंठ खात मोठ्या त्वेषानें ] छेः! छेः! कृष्णराव आतां क्षणभर ह्मणाल तर दम धरवत नाहीं—दाखवा, तो मात्रागमनी या वेळेस कोठें आहे तो दाखवा. त्या कृतघ्न कुलटेकडे मला जाऊं द्या. या दोघांच्या नरड्यांचा घोट घेईन तेव्हांच मी अन्न घेईन. तेव्हांच माझा राग निवेल. [ असें ह्मणत त्वेषानें जावयास लागतात.]

कृ०—[वासुदेवरावांचा हात धरून] हं; हं; वासुदेवराव, काय हें? काय, आरंभिलें काय तुह्मी? विचार करा, नीट विचार करा. इतक्यांत वचन दिलें तें विसरलां काय? भलतीच गोष्ट मनांत आणूं नका. या वेळेस असा अविचार कराल तर त्यांचा सूड उगविण्याचें एकीकडेच राहून आपला जीव मात्र धोक्यांत घालाल, एकदम त्यांचा जीव घेऊन तुह्मांला काय मिळणार? त्यामध्यें अर्थ काय? सूडच घ्यावयाचा आहे तर दुसरे प्रकार पुष्कळ आहेत. आतांच इतके उतावीळ होऊं नका. अम्मळ शांत व्हा. माझें या वेळेस न ऐकाल तर मोठा वाईट परिणाम होणार आहे.

वा०—कृष्णराव, या वेळेस मला कांहीं सुचत नाहीं. त्या कृतघ्नांच्या अपराधांचें कसें शासन करूं तें सांगा; सांगितलें कीं मी येथून निघालोंच. येथून जाईन केव्हां आणि दुष्टांच्या रक्ताचा घोट घेईन केव्हां असें मला झालें आहे. [जाऊं लागतात.]

कृ०—[ वासुदेवरावांचा हात बळकट धरून गळ्यांत एक हात घालून ] शांत व्हा, वासुदेवराव, थोडे शांत व्हा. काय हा वेडेपणा? सूड घेण्याला कोणता उपाय करायचा तें मी पाहतों. तुह्मी बेफिकिर असा. तजवीज केल्यानंतर तुह्मांला कळवीन. चला आंत. चार घटका स्वस्थ पडा.

वा०—हं! अग दुष्टे! या करितांच त्या लुच्चाजवळ जात. आमच्या चहाड्या सांगत होतीस अं? बरें, तुझी [illegible] कशी दशा करून टाकतों ती पहात रहा.

कु०—[illegible] तुमच्या जिवाला कांहीं तरी अपाय होईल. चला आंत. [ असें ह्मणून वासुदेवरावांस आंतल्या खोलींत नेतात. ]

# अंक चवथा.

## प्रवेश पहिला.

### स्थल—गोपाळरावजींचा दिवाणखाना.

[ गोपाळराव जेवण झाल्यावर टेबलावर कांहीं लिहित बसले आहेत. त्या वेळेस सरस्वती येते. ]

सरस्वती०—हें—हा विडा—ऐकलें का? बाई, बाई, बाई, बाई, या कामानें तर भंडावून सोडलें जसें! मनुष्य बोलतें तें सुद्धां का ऐकूं येत नाहीं? हंः?

गो०—( हातांतील कागद आणि पेन ठेवून ) काय, ह्मणतेस काय?

सर०—झालें—मी ह्मणत होतें तसेंच झालें—खरेंच—फारच कांहीं करायाचें! दुसऱ्यांना अशीं कामें नसतील काय? पण ही कांहीं बाई तऱ्हा कुठें यायची नाहीं!

गो०—[ किंचित् हंसून ] काय झालें, काय? मघापासून पिरपिर कशाची लावली आहेस?

सर०—आतां तर मी केव्हांची विडा घेऊन उभी आहें. पण इकडे लक्ष देतं कोण?

गो०—आपण विडा का घेऊन उभ्या आहां? आणा तर मग!

सर०—[ विडा हातांत देतां देतां गोपाळरावाचे हातास झटका देऊन] अहाहाहा! खरेंच. ( इतक्यांत घड्याळांत अकरा वाजतात ) पाहिलें? अकरा वाजले. आतांशी कुठें आमच्या येथलीं जेवणें झालीं!

गो०—बरें मग, आपलें काय ह्मणणें आहे?

सर०—ह्मणायचें काय? येवढा वेळ सरकारी काम करायचें, तेव्हां भुकेनें जीव घाबरा नसेल का होत?

गो०—घाबरा व्हायला काय होतें? मधल्या वेळेस फराळाचें तर रामचंद्र इतकें घेऊन येतो.

सर०—किती झालें तरी तो मेला फराळच. जेवणाची का बरोबरी करील?

गो०—न करायला काय झालें? कांहीं तरी बोलायचें ह्मणून बोलतेस झालें,

सर०—हो; मला अगदीं वेडच लागलें आहे कीं नाहीं? खरेंच—कशाला असली चाकरी पतकरली ही! काय मेलें—दिवसभर काम करकरून रात्रीं देखील मेली जिवाभोंवतीं कटकट? कोणी मेल्यानें खून केला कीं जा त्याच्या चौकशीला. कोणाच्या घराला आग लागली कीं जा ती विझवायला. झालेंच. आज अमकेंच झालें—काल तमकेंच झालें—हें एकसारखें चाललें आहे. असली दगदग करण्याचा कंटाळा नाहीं का येत?

गो०-कंटाळा आला तरी केली पाहिजे. तूं असें हें वेड्यासारखें बोलतेस हेंच आश्चर्य. आपल्याला त्रास होऊन त्यांत लोकांचें हित होत आहे तर त्रास होतो असें समजूं नये. जितकें आपल्या हातून दुसऱ्याचें बरें होईल तितकें करण्याविषयीं मनापासून झटत असावें. तूंच पहा. हे दुष्ट आणि अविचारी लोक कोणत्या वेळेस काय करतील आणि कोणावर कसा भयंकर प्रसंग येईल याचा कांहीं नेम नाहीं; आणि त्यांच्या धास्तीनें येथले लोक अगदीं दीन होऊन गेले आहेत. हें अरिष्ट लवकर टळावें याच हेतूनें ही मी चाकरी पतकरिली. देवानें यांत मला यश दिलें तर तुला, मला आणि सर्वांनाच किती आनंद होईल बरें?

सर०—तें खरें. पण रात्रीचें बाहेर जाणें झालें ह्मणजे मला अगदीं करमत नाहीं. सगळीं चाकरमाणसें द्वाराद्वूर निजतात आणि मग कांहींचें वाहीं मनांत येऊन आ- पलें मला भय वाटायला लागतें.

गो०—काय, भय वाटायला लागतें काय ह्मणतेस?

सर०—असें ह्मटलें ह्मणजे झालें. भय वाटतें कीं नाहीं तें बायकांचें बायकांनाच विचारावें, त्याचें पुरुषांना सांगून काय उपयोग? कितीही जीव तोडून सांगितलें तरी त्यांना ह्मणून कांहीं खरें वाटायचें नाहीं!

गो०—अं: ; ही कुरकुर तुझी रोज चालायचीच. बरें. आतां वासुदेवरावांकडे जावें ह्मणतों. अपरात्र तर झाली आहे तेव्हां जावें किंवा नये जाऊं?

सर०—कशाला तें रोजच्या रोज? परवां नुकेच तर क- लमी आंब्रे खायाला ह्मणून जायचें झालें.

गो०—त्या गोष्टीला तीन चार दिवस होऊन गेले. रोज एक वेळ तरी त्यांच्याकडे जावें असें माझ्या मनांतून असतें; पण या कामामुळें बिलकुल बनत नाहीं.

सर०—कशाला? कांहीं नको जायला. जाऊन करायचें काय तेथें? ते थोडेच सांगितल्याप्रमाणें ऐकतात! त्यांना थोडीच आमची परवा आहे! इकडे आतांशीं ते ढुंकून तरी पहातात का? मग आपण तरी इतकें कशाला करावें? आह्मी ह्मणजे कोठल्या झाडाचा पाला, असें त्यांना आलीकडे वाटूं लागलें आहे. क- चेरींत जायचें झाल्यावर रमाला भेटायला ह्मणून आज सहज गेलें होतें आणि मागल्या चौकांत ती, मी, आणखी त्यांच्या येथें नवीन ठेवलेली

स्वयंपाकीण बाई अशा आह्मी बोलत बसलों होतों. बिचारी रमा, दुसरें कांहीं नाहीं बरें, आपली कर्मकथा सांगत होती. इतक्यांत बाहेरून कुठूनसे वासुदेव भाऊजी आले. आंत येऊन त्यांनीं मला पाहिलें मात्र; तों मला लाल डोळे करून ह्मणतात काय, "कां वहिनी, कसल्या कारस्थानाच्या गोष्टी चालल्या आहेत? घरीं कांहीं उद्योग नाहीं ह्मणून येथें रिकाम्या पंचाइती करायला आलांत वाटतें?" इतकें बोलले तरी मी आपली रमाकडे पाहून गप्प बसलें. मग स्वयंपाकीण बाईला काय ह्मणतात, "कायहो बाई, तुह्मांला येवढा दरमहा देऊन ठेवल्या आहेत त्या गांवांतल्या बायका जमवून त्यांच्याजवळ गोष्टी सांगायला नाहीं? उठा तेथून आणि लागा आपल्या कामाला. खबरदार पुन्हा अशा गोष्टी सांगत बसाल तर." इतकें बोलले आणि पाय आपटीत आपटीत दिवाणखान्यांत चालते झाले? मला तेव्हां असें झालें कीं मी कोठून येथें आलें! तेथून उठलें आणि लागलींच मेण्यांत बसून आपली घरीं आलें.

गो०—हंः! दुष्टसंगतीनें मनुष्याचा स्वभाव किती पालटतो तरी? बरें त्यावेळेस कांहीं रमावहिनीला बोलले कीं काय?

सर०—त्यावेळेस तर कांहीं बोलले नाहींत; पण आलीकडे वासुदेव भाऊजींनीं कसकसा रमाचा छळवाद मांडला आहे, तें कळलें का?

गो०—नाहीं. यासंबंधीं कांहीं एक वार्ता मला ठाऊक नाहीं. परवां आंबे खायला गेलों त्यावेळेस वहिनींना फार

दिवस भेटून झाले ह्मणून भेटणार होतों. परंतु त्या निजल्या आहेत असें कळल्यावरून तसाच घरीं परत आलों. काय, झालें काय? छळवाद कसला मांडला आहे?

सर०—कसचा छळवाद आणि कसचें काय? त्या बिचारीचा वरीक भोग आहे! मला कांहीं तिची गत आतां ठीक दिसत नाहीं! या वाड्यांत होते तेव्हां वासुदेव भाऊजी रमावर किती रागावले तरी केव्हां ना केव्हां तिच्याशीं नीट बोलत. पण आज सात आठ दिवस झाले, तिचें नांवच आपलें त्यांनीं टाकून दिलें आहे! एक शब्द सुद्धां तिच्याशीं बोलत नाहींत! घरांत एखादी बटिक असते कीं नाहीं, तसे तिचे सोहाळे चालले आहेत. निस्त्या शिळ्या अन्नावर विचारीनें आठ दिवस लोटले!!

गो०—[आश्चर्यानें] शिळ्या अन्नावर आठ दिवस काढले अं?

सर०—निस्त्या शिळ्या अन्नावर! "वाळलें साळलेलें जेवढें अन्न उरेल तेवढें तिच्यापुढें नेऊन ठेवावें. हवें तर खाईल, नाहीं तर टाकून देईल. ताजें अन्न मुळींच देऊं नये. त्याबद्दल उपाशी मेली तरी हरकत नाहीं." अशी त्या स्वयंपाकीण बाईला वासुदेव भाऊजींची निक्षून ताकीद झाली आहे! झालेंच; वाटेल तेव्हां तिला तडातडा बोलतात काय, धबाधबा मारीत काय सुटतात! एकेक का तिचे हाल आहेत ह्मणून सांगूं? बिचारी गरीब ह्मणून येवढी जाचणूक सोसून राहिली आहे. दुसरी एखादी असती तर कधींच हातावर तुरी देऊन पळून गेली असती. तिला आलीकडे पाहिली नाहीं कशी झाली आहे ती—अगदीं पालींगत दिसते

जशी? तेज ह्मणून तिच्या आंगावर कसें तें राहिं-
लेंच नाहीं.!!

गो०—काय चमत्कार हं:!! हें सगळें तुजजवळ सांगितलें कोणी? वहिनींनीं कीं काय?

सर०—ती मजजवळ एक अक्षर सुद्धां बोलली नाहीं. मला पाहतांच विचारीनें अनाथासारखी दीन मुद्रा करून कडकडून माझ्या कमरेला मिठी मारिली आणि आपली आक्साबोक्शी रडूं लागली! अशी जेव्हां हंबरडा फोडून रडूं लागली तेव्हां माझ्या पोटां-तून भडभडून आलें आणि मग रमा असें काय—झालें काय तुला—अशी रडतेस कां—असें पुष्कळ प्रकारांनीं तिला विचारलें पण तिचें रडें कांहीं थांबेना! ती त्यांच्या येथली स्वयंपाकीण बाई चांगली आहे—तिला वाईट वाटून अखेरीस तिनें हें सगळें मजजवळ सांगितलें!

गो०—एकाएकीं इतक्या पल्ल्यावर मजल येऊन ठेपण्याचें कारण काय?

सर०—तें कांहीं कोणाला ठाऊक नाहीं. बाईलाही ठाऊ-क नाहीं आणि रमालाही पण ठाऊक नाहीं.

गो०—हं:! काय त्या साध्वीचें नशीब? केवढें दुःख तिला भोगावें लागतें हें? त्यांना दुःख होऊं नये, त्यांच्या कोंवळ्या आणि निर्मळ अंतःकरणाला कोणत्याही प्रकारें धक्का बसूं नये, त्यांनीं सुखांत दिवस घालवावे, ह्मणून मी आपल्याकडून पुष्कळ जपतों; परंतु काय उपयोग? सर्व प्रयत्न निष्फळ होतात! आतां या गोष्टीला करावें तरी काय? यापासून वहिनींचा परि-

णाम मला कांहीं नीट दिसत नाहीं! मी तर सांगसांगून दमलों कीं वासुदेवराव नव्हे हो नव्हे, या कपटी कृष्णरावाच्या संगतीला लागून दुसरा वाडा घेण्याच्या भरींत पडूं नका. तो दुष्ट आहे—तो मोठा घातकी आहे—कोणत्या वेळेस काय करील याचा नेम नाहीं. त्या कृतघ्नाच्या नादीं लागाल तर त्याच्या मायाजाळांत अडकून सर्वस्वीं मुकाल. परंतु माझें ऐकतें कोण? कृष्णराव सांगेल तें प्रमाण! मला वाटतें, या कृष्ण-रावानें यांना आजपर्यंत बरेंच बुडविलें असेल.

सर०—पुष्कळ मेल्यानें बुडविलें. रमानें सगळें मजजवळ सांगितलें. ह्मणाली—लागेल तेव्हां मेला हवें तें घेऊन जातो, पण परत देण्याच्या नांवानें मात्र आंवळ्या ये-वढें पूज्य! परवां कायसें भाऊजींच्या हातांतलें सोन्या-चें कडेंच मेल्यानें नेलें ह्मणाली—पण " कृष्णराव, कडें कां नेतां?" अशीं अक्षरें भाऊजींच्या तोंडांतून कांहीं निघालीं नाहींत!

गो०—हं: असो. या गोष्टीला आपण तरी काय करणार? आणखीं एकवार त्यांना सांगून पहातों. उमजले तर बरेंच झालें; न उमजले तर त्यांची मर्जी! वहिनींच्या जिवाला व्यर्थ ताप होतो व याहून, हाच क्रम पुढें चालल्यास, अधिक होणार येवढ्याबद्दल मात्र अतिशय वाईट वाटतें!

[ इतक्यांत महाराज असा दारावाहेरून शब्द ऐकूं येतो.]

गो०—कोण आहेरे बाहेर?

बाळू—सरकार, मी पहारेकरी बाळू चव्हाण. याक पुलस्ती-मंधला जवान घोड्यावर बसूनशेनी लई लगवगीन

आपल्याकड आलाया म्हून वर्दी द्याया आलो सरकार.

सर०—जा मेलें—यांनीं तर भंडावून सोडलें जसें. बोलवायला यायला मेल्यांना रात्रींच्चि कसें नेहमीं फावतें ह्मणतें ! ह्मटलें बारावर एक वाजला आहे तेव्हां आतां कांहीं कोणी येणार नाहीं. असें मनांत ह्मटलें मात्र, तों मेला आपला दारापुढें दत्त ह्मणून उभाच !

गो०—त्या गरीबावर विनाकारण शस्त्र कां ? तो बिचारा हुकुमाचा ताबेदार. त्याला काय जसें सांगाल त्याप्रमाणें वागणार.

सर०—हं येवढें ह्मटलें ह्मणजे झालें !

गो०—कोण, बाळू ? [ असें ह्मणत दार उघडतात. ] कोठें आहे जवान ? त्याला आंत बोलाव जलदी. [ बाळू तसें करतो.]

[ पोलीसच्या जवानास पाहून. ]

गो०—कायरे, कांहीं नवलविशेष वर्तमान आहे कीं काय ?

पो०—शुक्रिरवार पेठीमंदी दरोडा पडलाया सरकार. संमद चावडीवरचं जवान तकड धावत गेल, आन् मी आपल्यासनी वर्दी द्याया आलो सरकार.

गो०—दरोडा ? शुक्रवार पेठेंत ? पोलीस—सैसाला करड्या घोड्यावर जलदी जीन कसावयाला सांग. बाळू, माझा मंदील आणि तरवार दे. मी परत येई तोंपर्यंत थोरला दरवाजा बंद करून नागव्या तरवारीनें वर पहारा करीत उभा रहा. सर्व नोकर लोकांना जागत बसायाला सांग. खबरदार कोणी निजाल तर.

सर०—संभाळून जायचें होतें बरें का ?

गो०—अः कांहीं घाबरण्याचें कारण नाहीं. आतां त्या बेरडांचा समाचार घेऊन आलोंच समज.

(बाळू रात्रीचा पोषाख व तरवार आणून देतो व गोपाळराव स्वार होऊन घोडा उडवीत जातात.)

---

## अंक चवथा.

## प्रवेश दुसरा.

### स्थल—पुणें—शहरांतील एक मोठा रस्ता.

[विश्वासराव, गणपतरावांची गांठ पडतांच नमस्कार करतो नंतर.]

गणपतराव—नमस्कार, नमस्कार.—कां, विश्वासराव, आतां-शी असतां कोठें? दरोडेखोरांच्या बंदोबस्तांत निमग्न असाल. काय गोपाळरावजींनीं बहार दिली उडवून! एकून या काळच्या ब्राह्मणांत असा प्रतापी सिंह विरळा.

विश्वासराव-अहो तें काय विचारतां? ज्या कामांत आमच्या रावसाहेबांनीं हात घातला त्यांत त्यांना यश आल्यावांचून राहिलेंच नाहीं. मी त्यांच्या पदरचा खरा; परंतु या कामांत काय सांगूं तुह्मांला रावसाहेबांची शिताफी? सर्व मराठे पोलिसलोकांबरोबर मी वासुदेवरावजींच्या वाड्याबाहेर उभा होतों. मराठे लोक जातीनें शूर यांत शंका नाहीं; परंतु त्या हत्यारबंद काळस्वरूपी दरोडेखोर लोकांवर एकाएकीं चाल करून जाण्याची एकाचीही छाती होईना! सगळे जागच्या जागीं घाबरून गेले! परंतु रावसाहेबांचा घोडा फूं फूं करीत भरधांव टाकीत येऊन थडकतांच सर्वत्रांच्या जिवांत जीव आला आणि रावसाहेब वाड्याजवळ येतांच

"भागूबाईसारखे विचार कसला करीत बसलां?—शिरा— आंत एकदम आणि उडवा कत्तल." असें त्वेषानें आह्मां सर्वांस बोलले; आणि ताडकन घोड्यावरून उडी टाकिली, आणि तिळमात्रही जिवाची आशा न धरितां तरवार फिरवीत एकदम वाड्यांत घुसले! त्यांच्या मागोमाग आह्मीही शिरलों. आंत जातांच-बागवानानें सपासप केळी तोडाव्या त्याप्रमाणें जे जे दुष्ट लोक त्यांच्या आंगावर चालून आले, त्या त्या लोकांचे आमच्या पराक्रमी रावसाहेबांनीं तुकडे तुकडे करून टाकले पहा!!

गण०—वाहवा रे वाहवा! यांना ह्मणावें शूर! याला ह्मणावा प्रताप! नाहीं तर तुह्मी आह्मी—तोफेचा आवाज ऐकण्याबरोबर बहिर्दिशेस जाण्याचा प्रसंग येतो!

विश्वा०—खरें ह्मणतां. लांब कशाला? मजवर तर रावसाहेब शस्त्र फेंकीत नव्हते ना? परंतु जेव्हां त्यांनीं त्या दुष्टांचा नाश केला, तेव्हां त्यांच्या हातांतील रक्तपान केलेली ती विद्युल्लतेसारखी तरवार पाहून आणि वीरश्रीनें स्फुरण पावलेले ते नेत्रकटाक्ष आणि त्यांची ती व्याघ्ररूप मुद्रा पाहून माझी तर बोबा पांचावर धारण बसली, आणि डोळे दिपून गेले!

गण०—(हास्यमुख करून) आपण महाप्रतापीच पडलां, तेव्हां अशी आपली अवस्था झाली यांत नवल नाहीं. बरें—काय हो? वासुदेवराव आणि कृष्णराव दुसरे दिवशीं तरी शुद्धीवर आले का? का तसेच वेरळत पडले होते? मी असें ऐकतों कीं, जर गोपाळरावजींला येण्याला आणखी एक पांच मिनिटांचा उशीर

लागला असता, तर हे दोघे राजश्री त्या दुष्टांच्या तावडींत सांपडून प्राणासच मुकले असते !

वि०—मुकले असते यांत संशय आहे कीं काय ? अहो, धडधडीत एका बिछान्यावर बेशुद्ध पडलेले ! मग विचारतां काय ? एकूण त्या प्रसंगीं रावसाहेबांची छाती खरी गणपतराव ! या दोघांवर दोघां दुष्टांचे घाव पडणार न पडणार इतक्यांत त्यांच्या अंगावर रावसाहेब काळासारखे जाऊन पडले, आणि एका घावासरसे दोन तुकडे करून त्या दुष्टांना जमीनदोस्त करून टाकलें ! !

गण०—शाबास ! या उभयतांवर रावसाहेबांचे महदुपकारच समजायचे.

विश्वा०—असें तुह्मीं समजतां. त्या उभयतांच्या तें गांवींही नाहीं ! गांवीं नाहीं येवढेंच नव्हे, परंतु रावसाहेबांना अद्यापि ते शत्रुप्रमाणें लेखतात, हेंच आश्चर्य.

गण०—हो. ते मानतीलच. कारण रावसाहेब त्यांना जारकर्म करूं नका ह्मणतात—सुरापान करूं नका ह्मणतात—तेव्हां असलें कडू भाषण त्यांना कसें रुचेल ? रुचावयाचेंच नाहीं. यांनीं त्यांच्यासारखीं भलभलतीं कृत्यें करावीं—निरपराधी असतां साध्वी स्त्रियांचा छळ करावा—त्यांच्यासारख्या दारूच्या बाटल्यांवर बाटल्या झोंकून फस्त कराव्या—ह्मणजे मात्र रावसाहेब यांचे जिवलग मित्र ! ! अज्ञान आणि अविचारी बेटे ! काय हो यांनीं अगदीं ताळ सोडला ? अहो, हे ब्राह्मणवीर्याचे ना ? शिव ! शिव ! शिव ! कांहीं आलीकडे विचार राहिला नाहीं !

**विश्वा०**—कसला विचार घेऊन बसलां गणपतराव? बोलूं नये आणि चालूं नये. स्वस्थ बसावें झालें. या वासुदेवरावांना जर सारासार विचार असता, तर यांनीं त्या कृष्णरावाची संगत धरली असती कशाला, आणि येथवर मजल येऊन ठेपली तरी कशाला असती? पण ह्मणतात नाहीं कीं—**विनाशकाले विपरीत बुद्धिः**—.

**गण०**—पण, काय हो? त्या चोरट्या लोकांच्या तावडींतून रमाबाई बऱ्या सुटल्या?

**विश्वा०**—त्या माउलीकडे हे लोक जातील कशाला? अगदीं अंधारांत भलतीकडेच एका कोंपऱ्यांत पडलेली! एक फुटक्या कवडीचा दागिना ह्मणाल तर बिचारीच्या आंगावर नव्हता. मग तिच्या वाटेस जातो कोण? त्यांतून रावसाहेबांचें वाड्यांत पाऊल पडतांच त्यांनीं त्या साध्वीच्या संरक्षणार्थ निवडक पोलीस जवानांचा कडेकोट पहारा ठेविला होता—मग तिजकडे, बिशाद काय कोणाची ढुंकून पहाण्याची? [असें बोलत आहेत तों अकरा वाजतात.] कायहो? अकरा वाजले? छेः! फार उशीर झाला. आतां गेलेंच पाहिजे. रावसाहेब कचेरींत आले देखील असतील! त्यांची एकनिष्ठेनें सेवा केली पाहिजे. कारण यांच्यासारखा दयाळू अमलदार मिळणें कठीण गणपतराव.

**गण०**—कायहो? रावसाहेबांना मोठी जागा मिळाली ह्मणून ऐकतों.

**विश्वा०**—हें काय विचारतां? कालच हुकूम आला. या शहरचे पोलीस सुपरीन्टेंडंट झाले. शिवाय एक सुंदर तरवार व रावबहादूर किताबही मिळाला.

गण०—रावसाहेबांची धन्य आहे ! सत्कृति करून लौकिक मिळवावा तो अशा विभूतींनींच ! असो. ईश्वर करो आणि उत्तरोत्तर या सत्पुरुषाच्या सद्गुणांची दिगंतरीं ख्याति होवो ह्मणजे झालें. त्यांतच आह्मांला आनंद आहे !

विश्वा०—यांत काय संशय ? बरें जातों आतां. पुनः कधीं गांठ पडेलच.

गण०—बरें आहे—नमस्कार.

विश्वा०—[ चालूं लागतां लागतां ] नमस्कार.

( निघून जातात. )

---

# अंक पांचवा.

## प्रवेश पहिला.

स्थल–पुणें- वासुदेवरावांच्या वाड्यांतील एक खोली.

सावित्रीबाई–बाईसाहेब, आज बाई रोजच्यापेक्षां फारच मलूल दिसतां? थोडें खातां का? रावसाहेब बाहेर गेले आहेत. येथें दुसरें कोणी नाहीं. थोडें खाल तर आंगांत अम्मळ तकवा तरी येईल. एक वेळ खायचें, आणि तें शिळें! तेव्हां निभावणी तरी कशी लागेल? हळूच कांहीं आणून देऊं का?

रमा०–[ सुस्कारा टाकून ] नका–बाई–नका–कांहीं देऊं नका! उगीच तुह्मी आपला जीव कशाला धोक्यांत घालतां? खाऊन खाऊन तृप्त झालें! कशाची आशा राहिली नाहीं! घोटभर पाणी द्याल तर पहा! घसा सुकून चालला–नारायणा! या यातनेंतून लवकर सोडविशील तर मजवर तुझे उदंड उपकार होतील!

सा०–असें अभद्र काय बोलतां बाईसाहेब? हें घ्या पाणी. उठा घ्या लवकर. [ पाणी आणून देते. ]

रमा०–[ थोडें पाणी पिऊन ] हा–बाई–ईश्वर तुमचें कल्याण करो. या मी हतभागिणीनें हे उपकार कधीं फेडावे? जा आतां. कशाला उभ्या राहतां? इतक्यांत कोणीं पाहिलें तर मला लाथा बसायच्या त्या बसतीलच; पण तुह्मी गरीब बापड्या, अन्नाला मात्र व्यर्थ मुकाल! हुकूम दोनच वेळ पाणी पिण्याचा! तिसऱ्यांदा मागितलें नसतें; पण काय करूं? जीव

फारच कासावीस होऊं लागला. तेव्हां उपाय चालेना. जा आतां नका उभ्या राहूं.

सा०—बाईसाहेब, इतक्या कां भितां? रावसाहेब पुष्कळ मंडळी घेऊन कोठल्याशा बागेंत गेले आहेत. दोन दिवस कांहीं परत यायचे नाहींत, मग अशा भितां कां?

रमा०—दोन दिवस बागेंत? असें काय बाई आहे तेथें?

सा०—तें बाई कोणाला ठाऊक? दोन दिवस येणार नाहीं ह्मणून आतांच सांगून गेले, तेवढें मला ठाऊक. त्यांचें काय? स्वच्छंदी तर आहेत. गेले असतील मंडळी-ला घेऊन कशाला तरी?

रमा०—[ सुस्कारा टाकून ] बरें—जा आतां तुह्मी. मला कांहीं खायाला नको. मी अमळ पडतें. माझ्यानें कांहीं बाई फार वेळ बसवत नाहीं. आई आई! [पडते.]

सा०—च्, च्, च्, च्! काय रे देवा या नाजुक देहाची ही अवस्था! [ आंगावर हात फिरवून ] प्रत्येक हाडा-चा मणीन् मणी कीं हो दिसतो! बाईसाहेब, येथें निजल्यानें हीं तुमचीं हाडें खुपत नसतील का? काय हें नशीब तरी? देवा! ज्यांची रत्नखचित मंचकावर निजण्याची योग्यता, त्यांनीं अशा फाटक्या तुटक्या रकव्यावर कारे पडावें? अशानें या कोमल शरीराचा परिणाम तरी कसा लागेल? खरें पुसाल तर बाई-साहेब, या तुमच्या दीनवाण्या मुद्रेकडे पाहिलें ह्मणजे माझ्या बाई पोटांतून भडभडून येतें, आणि सारा दिवस आपली जिवाला हुरहुर वाटते! काम सुचत नाहीं, काज सुचत नाहीं, कांहीं नाहीं! पाहिलें असतां दे-वाच्या दयेनें कांहीं कमी आहे? खायला, प्यायला,

वस्त्रपात्राला, कश्शाला. कांहीं कमी नाहीं. पण उपयोग काय? यजमानांची गैरमर्जी असली ह्मणजे सगळें व्यर्थ. आतां या भोगाला करावें तरी काय?

रमा०—काय करायचें आहे बाई! जसें द्यावें तसें घ्यावें. नशीबीं आहे तें भोगलें पाहिजे. माझें नशीबच फुटकें, त्याला तुह्मी काय कराल? असेंच जन्मांतरीं कांहीं पातक केलें असेल तें भोगीत आहें. कोणाकडे त्याचा बोल नाहीं. बाई, तुह्मी आपल्याला उगीच कां वाईट वाटूं देतां?

सा०—असें काय ह्मणतां बाईसाहेब! या तुमच्या हाडांच्या निस्तेज पिंजऱ्याकडे पाहिलें ह्मणजे एखाद्या परक्याच्या देखील जिवाला कळवळा आल्यावांचून राहणार नाहीं, मग मी तर मेली इतके दिवस तुमचें अन्नच खात आहें. मला वाईट वाटतें यांत नवल काय? बाईसाहेब, एक गोष्ट तुह्मांला विचारतें. रावसाहेबांच्या भयानें इतके दिवस, आपली, मन घट्ट करून, गप्प बसलें होतें. पण दिवसेंदिवस अशी तुमची अवस्था होत चालली आहे, तेव्हां माझ्यानें बाई आतां विचारल्यावांचून राहवत नाहीं. या गरीबाजवळ सांगायला संकोच वगैरे करूं नका.

रमा०—कसली गोष्ट?

सा०—[ इकडे तिकडे पाहून ] बाहेर तर कोणी ऐकत नसेल ना? नाहीं; कोणी नाहीं. [ रमाकडे वळून ] रावसाहेबांची इतकी गैरमर्जी होण्याचें कारण तरी काय?

रमा०—काय बाई कारण सांगूं? हा मेला कृष्णराव. याची

संगत लागल्यापासून असे एकेक माझे सोहाळे होत आहेत! दुसरें कांहीं नाहीं.

सा०—छे:! बाईसाहेब हें कांहीं कारण नव्हे. कृष्णराव कितीही वाईट असला ह्मणून तुमची हालअपेष्टा करण्याचें रावसाहेबांना काय कारण? तुह्मी त्या मेल्याच्या अध्यांत ना मध्यांत. रावसाहेबांना तो नेहमीं हवें तसें बुडवितो पण त्याबद्दल एक चकार शब्द सुद्धां तुह्मी त्याला आजपर्यंत बोललां नाहीं. मग विनाकारण रावसाहेबांकडून तुमची छळणूक करवायची त्याला काय गरज?

रमा०—काय असेल तें असो. दुसरें कांहीं ह्मणावें तर आजपर्यंत येवढी देखील हो बाई मजकडून आगळिक झाली नाहीं. ही तुळशी आईच साक्ष. एक अक्षर सुद्धां वेडेंवांकडें बोललें नाहीं. असें असून मला अनाथाला गांजीत आहेत. गांजोत! त्यांची मर्जी! आदल्या जन्मींचा कांहीं सूड उगवून घ्यायचा असेल, तो उगवून घेत आहेत झालें!

सा०—बाईसाहेब, तें कांहीं नाहीं. माझी ह्मातारीची एक बुद्धि ऐका. पुष्कळ दिवस झाले; मला एका गोष्टीविषयीं संशय आला आहे. आणि तुमचा असा प्रकार होण्याचें तेंच कारण असावें, असें मला तर बाई आतां खचीत वाटतें. मग तुह्मी कांहीं ह्मणा—

रमा०—काय? कोणचें कारण?

सा०—काय सांगूं बाईसाहेब? या पुण्यांतील कसबिणी इतक्या दुष्ट, उलट्या काळजाच्या आहेत कीं, त्यांची एक एक करणी जर ऐकाल तर बाईसाहेब, तुमच्या

डोळ्यांतून टप्टप् टिपेंच येतील. कोणी एखादा श्रीमान् पुरुष पाहिला कीं त्यांनीं त्या बिचाऱ्याला करणी करून आपलासा केलाच. नवराबायकोचें अतिशय प्रेम असलें कीं त्यांनीं घातलाच तेथें बिब्बा. एक का दोन ह्मणून तुह्मांला त्यांचीं कुलंगडीं सांगूं? या रांडा पैसा मिळवायला काय करतील याचा नेम नाहीं. फार कशाला? एका कसबिणीनें माझ्या सख्या बहिणीवर अस्सा प्रसंग आणिला होता, बरें झालें; देवाच्या दयेनें मला लौकर समजलें. नाहीं तर ती आपल्या संसाराला मुकलीच असती!

रमा०—अग बाई! असें काय तुमच्या बहिणीला केलें होतें तरी?

सा०—तें कांहीं पुसूं नका बाईसाहेब—थेट तुमचीच अवस्था. तुह्मीं कांहीं तरी अम्मळ बऱ्या आहांत. ती तर घंटकेंत मरते कीं आतां मरते, अशी तिची दशा करून टाकिली होती!

रमा०—अग बाई! कशाकरतां पण हें?

सा०—दुसरें कांहीं नाहीं. तिचा नवरा चार पैसे बाळगून आपल्या घरचा बरा होता. आणखी माझ्या बहिणीवर त्याची अतोनात प्रीति असे. तें एका कसबिणीच्यानें पाहवलें नाहीं. आणि रांडेनें पैशाच्या लोभानें हिच्या नवऱ्याला करणी करून त्याला अगदीं आपल्या मुठींतलासा करून घेतला. मग काय विचारतां बाईसाहेब? रात्रंदिवस त्यानें तिच्यायेथें पडावें. लोक हंसतील ह्मणून दोन वेळां जेवायला मात्र काय तो घरीं येत असे. घरीं आला न आला कीं कांहीं तरी थोतांड

काढून आपलें माझ्या बहिणीला मार मार मारीत सुटा- वें. असा प्रकार आपला पुष्कळ दिवस चालला होता. त्याला पूर्वस्थितीवर आणावा ह्मणून मी पुष्कळ उपाय केले; पण कांहीं झालें नाहीं. सरते शेवटीं देवाची करणी—इतका जरी तो जादूनें त्या रांडेच्या नादीं लागला होता, तरी, येथें एक मोठे साधु आहेत त्यांनीं एका दिवसांत त्याला तिच्या मायावी पाशांतून सोड- विलें; आणि पहिल्यासारखीं तीं मोठ्या प्रेमानें राहूं लागलीं.

रमा०—काय ह्मणतां? ते साधु आहेत तरी कोठें?

सा०—या नदीवर एका ओसाड वाड्यांत आहेत. जादुवि- द्येंत फार निपुण असून विलक्षण परोपकारी आहेत. दुष्ट लोक जादू करून वाईट कर्में करितात तीं त्यांनीं करूं नये ह्मणूनच, मला वाटतें, ईश्वरानें या मोठ्या साधूला उत्पन्न केलें असावें. काय त्यांच्या मंत्राचें सामर्थ्य सांगूं बाईसाहेब? अहाहा! साक्षात् दे- वाचा अवतार यांत संशय नाहीं! त्यांना माझ्या बहि- णीनें सर्व हकीगत सांगितली आणि "मज गरीबावर कृपादृष्टि व्हावी" असें ह्मणून जेव्हां त्यांचे पाय धर- ले, तेव्हां ते कृपाघन साधुमहाराज तिजकडे वळून सद्गदित शब्दांनीं तिला ह्मणाले, "बेटा, ऊठ—हा ताईत मंत्रानें भारलेला आहे, हा डाव्या हातांत बांध ह्मणजे तुझें कल्याण होईल." त्याप्रमाणें दुसरे दिव- शींच, बाईसाहेब तिला प्रचीत आली!

रमा०—असें जर आहे तर ते साधुमहाराज येथवर येऊन मजवर कृपादृष्टि करतील काय?

सा०—तेवढें मात्र बाईसाहेब होणें नाहीं. कारण ते कुठे कुठे बाहेर जात नाहींत. तो वाडा बरा कीं आपण बरें. रात्रंदिवस हरीच्या नामस्मरणांत निमग्न. ह्मणून तुह्मीच जर तेथपर्यंत याल तर हां हां ह्मणतां सर्व क्लेशांतून मोकळ्या व्हाल.

रमा०—हुकुमाशिवाय हा वाडा सोडून जावें तरी कसें? कोणी पाहिलें तर त्या क्षणींच मला अर्धमेली करतील, आणखी दुप्पट हाल मात्र भोगावे लागतील.

सा०—त्याची अगदीं काळजी नको. रावसाहेब उद्यां संध्याकाळवेरीं येत नाहींत हें खचीत. कांहीं मनांत न आणतां चलाच. एका घटकेंत परत येऊं. सांगून ठेवतें बाईसाहेब—अशी वेळ पुन्हा यायची नाहीं.

रमा०—तें सगळें खरें—पण काय नेम सांगावा बाई? इतक्यांत यायचेंच झालें तर?

सा०—काय बोलतां बाईसाहेब! मजवर अगदींच का विश्वास नाहीं? जीव तोडतोडून तुमच्याच बऱ्याकरितां इतकी झटतें, पण सगळें फुकटच ना? रावसाहेब वाड्यांत असतात तेव्हां या खोलीवरून त्यांच्या कांहीं नाहीं तरी शंभर खेपा होतात, पण आठ आठ दिवसांत ते तुमच्याकडे ढुंकून सुद्धां पहात नाहींत. मग आतां येतांच तुमचा शोध करतील ही भीति कशाला पाहिजे? आणि त्यांतून ते उद्यां येणार.

रमा०—बरें, येथून जायचें तेव्हां गड्यामाणसांना नाहीं का समजणार? दरोडा पडल्यापासून ते तर फारच सावध आहेत.

सा०—त्याची थोडी युक्ति आहे. आतां संध्याकाळ होऊन

बराच काळोख पडला आहे. मागल्या दारानें तुह्मी बाहेर पडा. मी कडी लावतें, आणि रोजच्यासारखी पुढल्या दारानें निघून येतें ह्मणजे झालें. तुमच्या खोलींत यायचा कोणाला हुकूम नाहीं; तेव्हां तुह्मी बाहेर गेलां असें कोणाच्या मनांत सुद्धां यायचें नाहीं.

रमा०—बाहेर पडल्यावर नदीपर्यंत मला चालत कसें जाववेल ? येथून चार पावलें ह्मणाल तरी देखील हो बाई, मला चालण्याची शक्ति नाहीं !

सा०—तुह्मांला मी चालत कशी नेईन पण ? तुह्मांला शक्ति नाहीं हें मला नाहीं का बाईसाहेब समजत ? रावसाहेबांनीं काल दिलेला पगार मजजवळच आहे. मागील दारीं लागतील तितक्या भाड्याच्या गाड्या तयार आहेत. त्यांतली एक हळूच जाऊन ठरवितें ह्मणजे झालें. बाईसाहेब, तुमच्यापेक्षां मला पैसा जास्त नाहीं. तुह्मी आणि रावसाहेब आनंदानें राहूं लागलां ह्मणजे मला कांहीं कमी आहे का ? लागतील तितके पैसे तुमच्याजवळून घेईन.

रमा०—बाई, या वेळेस तुह्मी माझी मायबहीण अहां ! माझे सखे सोयरे काय त्या तुह्मी ! जसें सांगाल तसें मी करीन. हे तुमचे उपकार मी कधीं कधीं विसरणार नाहीं.

सा०—बाईसाहेब, यांत उपकार ते कसचे ? बरें पण आतां बोलण्यांत वेळ घालवून उपयोग नाहीं. अम्मळ बसा. मागल्या दारानें जाऊन आत्तां गाडी करून येत्यें.

रमा०—सावधगिरीनें जा बरें बाई ?

सा०—अगदीं भिऊं नका बाईसाहेब. ही पहा, आलेंच.

[ असें ह्मणून मागल्या दारानें बाहेर जाते. तिला एक पड्यांची गाडी दिसते ती पाहून ]

अहारे चांडाळा ! काय, मेल्याचें नांव कृष्णराव ! नांवाप्रमाणें मेल्याची करणी--कशी वेळेवर मेल्यानें गाडी तयार करून ठेविली आहे पण ! शिव ! शिव ! शिव! शिव ! काय करावें ! अडकून पडलें ! मेल्याला तेवढें माझें गृहछिद्र ठाऊक नसतें तर मेल्याचें सगळें बेंड फोडून रावसाहेबांकडून मेल्याची, या घटकेस चौवांत फटफजीती करून सोडली असती ! पण काय करूं ! फाशांत पडलें ! देवा ! दुष्टकृत्यें मीं करावीं तरी किती ? या मागें जीं केलीं त्यांबद्दल खरोखरीं मी अपराधी आहेंच; पण आतां या अनाथ साध्वीला, या अनाथ गायीला, त्या कोठडींत कोंडून ठेवून त्या निर्दय कसाबाच्या स्वाधीन करणार, या अघोर पातकाचा धनी कोण ? गोपाळरावजीला वासुदेवरावांच्या नकळत त्या मेल्यानें मजकडून आंब्यांत विष घालविलें, याचा दोष कोणाकडे ? त्याला तेवढें गृहछिद्र ठाऊक नसतें तर खचीत खचीत देवा ! असलीं अघोर पातकें केलीं नसतीं ! मागें जें जें मी वाईट केलें, त्याचा राहून राहून मला मोठा पस्तावा होतो ! पण काय करूं ? जर या वेळेस त्या मेल्याची इच्छा तृप्त न करीन, तर उद्यां गेलेंच मी फाशीं ! कारण, त्याजवळ माझें हातचें पत्र आहे. हेच माझे घरधनी असते, तर अशी मी हडळ झालें नसतें. बारा वर्षें झालीं, पण ते कोठें निघून गेले याचा पत्ता नाहीं. भगवंता ! हा जीव मोठा प्यारा आहे ! याची माया कांहीं विलक्षण !

याच्या संरक्षणासाठीं मनुष्य कोणकोणतीं अनन्वित पातकें करील याचा थांग नाहीं ! असो. फुकट वेळ घालवून आतां काय उपयोग ! जिवाची आशा सुटत नाहीं, तेव्हां हातीं धरलेलें काम तडीस नेणें भाग आहे. [ असें ह्मणून घरांत परत जाते. ]

रमा०—इतक्यांत गाडी ठरवून आलांत ?

सा०—त्याला किती उशीर बाईसाहेब ? हव्या तितक्या गाड्या उभ्या आहेत. बरें, आटपा आतां. तुह्मांला मी गाडींत बसवितें, आणि लागलींच कडी लावून पुढच्या-दरवाजानें निघून येतें. उठा लवकर !

रमा०—चला. [ उठून हात जोडून ] देवा ! नारायणा ! या निरपराधी लेंकराची कींव तुला येवो, आणि या साधूंच्या हातून या संकटापासून मी मुक्त होईन असें घडून आणण्याची तुझ्या पोटांत दया उपजो, हीच तुला या लेंकराची अनन्यभावें प्रार्थना आहे ! बाई, परत मात्र लवकर पोंचवा बरें ?

सा०—लवकर आणून पोंचवितें. कशाची काळजी करूं नका बाईसाहेब ! चला !

( असें ह्मणून रमाबाईस घेऊन जाऊन गाडींत बसविते, व आपण पुढच्या दारानें जाऊन त्याच गाडींत बसते व दोघी जातात. )

---

# अंक पांचवा.

## प्रवेश दुसरा.

### स्थल—पुणें—शहरांतील एक रस्ता.

वासुदेवरावांचा नोकर—रामराम, जयाजी, रामराम ! इक-

त्या लगबगीन हकड कुनिकडं? आन ह्ये डोक्शीवर वझ कशाच घेऊन चाल्लायास?

कृष्णरावांचा नोकर—काय थट्टा करतुस मर्दा! असं तुला ठावच नसल अगदीन्!

वा० नो०—( हंसत हंसत ) न्हाईर, पन उगाच इचारलं. अर गड्या, खन् खन् खन् खन् कशाचा आतमंदी नाद निघतुयर? फाउ फाउ बर काय हाय ते?

कृ० नो०—काय लेका फातुस काय? न्वाजचच हाय, आन् काय फातुस त्यामंदी?

वा० नो०—हं, हंग त्ये व्हय? तर मंग काढकी याक. कोन चिट्पाखरूबी न्हाई हत. टाकू बिगिद्यान फस्त करूनशेनी.

कृ० नो०—वाहवा र वाहवा! लई भाळाच दिसतुस की! लया दिसाचा सोनती म्हुन काल याक ह्राव खूस केल, म्हुन का न्वाजच्या न्वाज त्येच?

वा० नो०—काय मर्दा? याक दिलीस म्हून तुजा वाच काय जातया?

कृ० नो०—थू येड्या! जाऊदे बिगिद्यान. हत येऊनशेनी लई वाढूळ झाला. बिगिद्यान न्हाई गेलो तर समदी बामन माझ्या नांवान याकुच ब्यांब करतीला.

वा० नो०—अंः! थोडच तू त्येंच्या ब्यांबला जुमानतुइस! कायर जयाजी, तुझी तर तत लई चमन असल गड्या?

कृ० नो०—मला दिसतुयास? पड गस सुकामंदी. पान्यावरचा मानुस. कुठ जायला नग यायला नग. पायावर पाय घालूनशेनी हकडच्या तकडच्या चार

म्हाईंशी सांगाव्या आन् सुवास्त झोंप घ्येवी. हत निघ-तीया समदी फजीती !

वा० नो०—कसली फजीती आलीया ?

कृ० नो०—तुला काय ठाव हाय? माज्या कामावर याक दीसबी टिकायचा न्हाईस. काय ल्येका, कामाची काय गिनती हाय? घटकमंदी हत—तर घटकमंदी तत. घ्ये बाटल्याच वझ—जा बागमंदी. निघ ततन—धांव त्यस नायकिनीकड. पळ पळ ततन—आन् फुलाच गजर. ह्ये याकसारख चाललया. बायकूची गाठ न्हाई. पोराची गाठ न्हाई. चार दिस झाल. ही याक-सारखी किटकिट लागलीया. आन् ह्यान माझ कंब-रच टाकन् टाकच ढिल झाल्यात बग !

वा० नो०—कार गड्या, पन बागमंदी अस चाललया तरी काय ?

कृ० नो०—छे, मर्दा त्ये इचारनच नग. लइ मंजी लई मोज मोज चाललीया. या प्योकाळ बामनांनीं तर बग अगदीं ताळच सोडून दिलाया. निस्तुक हपापल्यावा-नीच करत्यात. पन ते कुठ पचतय ? बोट लालाऊन लालाऊन पित्यात आन् वकवक वकत्यात. वकत्यात, पित्यात, वकत्यात पित्यात ! तुझ्या आन् माझ्या धन्याच तर काल लईच हाल झाल. पी पी पी प्याल आन् त्यांड वासूनशेनी रातभर वरडत बेसुध पडल व्हत !

वा० नो०—( बावरून ) काय म्हनतुस ! पन आता हायत काइ बर ?

कृ० नो०—हायत. काइ बर हायत.

वा० नो०—मंग बर हाय. न्हाई तर अगुदर हत तरी

आईची सत आलीया आन् असंल वकन विकंन ऐकं- ल मर्जी अपला तर जीव बग धाकधूकच करतो !

कृ० नो०—तू तर अकलचा समुंद्रच दिसतुस ! अर ल्येका, हे वकन न्यार आन् ते न्यार. कायर, आतां काई थोडभूत गावामंदी कमी हाय ?

वा० नो०—कसल कमी आलया. रोज पांच पन्नास चा- लल्यातीच बग.

कृ० नो०—अर मर्दा, त्यो बग सुपरदंड साहेबाचा गडी. असा कार घावऱ्या घावऱ्या पळतुय ?

वा० नो०—अर व्हयर व्हय. कुनाला वाखाबिखा तर न्हा- यी झाला? [ गोपाळरावांचा गडी जवळ आलासें पा- हून ] कार गड्या, असा कुनीकड धापा टाकीत चाल्लायास ?

गो० नो०—काय पुसतुस मर्दा ! आमच्या धनीसाहेबांच्या जिवाला आज पंधरा दिस सुक न्हाई बंग. काल- फास्न तर वकारीन आक्शी हैरान झाल्यात. हंग आ- ताच डाकतर फाऊन गेलां. कांहीं वखाद देनार हाय ते जाऊनशेनी घेऊन येतो.

कृ० नो०—बर हाय. जा बिगी. मीबी जातो.

( सर्व निघून जातात. )

---

# अंक पांचवा.

## प्रवेश तिसरा.

**स्थल—पुणें—शहरा बाहेरील बाग—बंगला.**

कृष्णराव—( गाणें सुरू असतां दारूचे मदांत ) कां, वासु- देवराव, गंगाजींनीं आज फारच बहार करून दिली

बोवा. वाहवारे वाहवा! या शहराचें यांनीं नांव राखलें यांत संशय नाहीं! अहाहा! ऐका, ऐका—हा राग तर ऐका. काय एकावर एक ललकारी निघते आहे पण! या वेळेस असें वाटतें कीं आपण सर्व इंद्राचे नंदनवनांतच क्रीडा करीत आहों कीं काय कोण जाणे! वाहवा! गंगाजी! वाहवा! सर्वांना गार करून टाकलेंत आज! पुष्कळ तुमचीं गाणीं ऐकलीं, पण आज कांहीं कमालच केलीत!

नायकीण—( हात जोडून ) आपली सर्वांची मेहेरबानी. ( गाऊं लागते ).

वासुदेवराव—(कृष्णरावांकडे पाहून) कां कृष्णराव, बोलण्याची शैली कशी आहे? हळूच एका गालांत हंसून आमच्याकडे नजर फेंकण्याची खुबी पाहिलीत ना! खरेंच कृष्णराव! ज्यानें या सुखाचा अनुभव घेतला नाहीं, तो यावज्जन्म दरिद्रीच खरा! अहाहा! हा बसण्याचा थाट! हा नथेचा झोंक! हे हावभाव पाहून असें वाटतें कीं या वेळेस एक हजार रुपयांचा तोडा या रत्नावरून ओंवाळून टाकावा! ( असें ह्मणत व डुलत डुलत दोन मुठी रुपये नायकिणीस देतात.)

नायकीण—( सलाम करून रुपये ठेवते व हास्यमुद्रा करून पुनः गाते. )

बळवंतराव—( वासुदेवरावांस एकीकडे बोलावून ) काय हें वासुदेवरावजी? आज आपण हें आरंभिलें काय? गाण्याबद्दल दोनशें रुपयांचा ठराव करून पूर्वींच रुपये दिलेत; आणखी वरचेवर मुठी भरभरून रुपये देतां याचा अर्थ काय? तुह्मांला वेड तर लागलें नाहीं?

वासुदेवराव–अं:, भलत्या वेळेस भलतेंच कांहीं तरी काढतां! पैशाकडे का पहाण्याची ही वेळ? मौज काय चालली आहे आणि बोलतां काय? फार तर काय, आणखी दोन नाहीं चारशें रुपये या मारू पाखरावरून ओंवाळून टाकीन!

बळवंतराव–हं. मग चालूं द्या सपाटा! आमचें हो, काय गेलें? (आपल्या जागेवर जाऊन बसतो.)

कृष्णराव–(वासुदेवरावांकडे पाहून) कां, मधूनचसें उठवून आपल्याला बळवंतरावांनीं नेलें होतें? वारंवार इला रुपये देतां यावर बहुतकरून त्यांचा बोलण्याचा कटाक्ष असावा!

वासुदेवराव–बळवंतरावच तो! दुसरें काय बोलणार?

कृष्णराव–हं:! काय एकेक मनुष्याचा स्वभाव तरी चमत्कारिक? पैसे खर्च करून चैन भोगण्याची आपल्या आंगीं हिम्मत नाहीं ती नाहीं, आणि दुसऱ्यांनीं तसें केलें तर तेंही डोळ्यांनीं पाहवत नाहीं! काय चमत्कार!

वासुदेवराव–अं:! जाऊं द्या. तो वेडा आहे. त्याचें ऐकतें कोण?

एक स्नेही–[हात जोडून] रावसाहेब, ही वेळ बोलण्याची नव्हे. अशानें गाण्याचा विरस मात्र होऊन जातो.

वासुदेवराव–[हंसून] चुकी झाली. क्षमा असावी!

कृष्णराव–शू:–फार तलखी होते, वासुदेवराव! जरा बाहेरून फिरून येतों.

वासुदेवराव–बरें जा.

कृष्णराव–[बंगल्या बाहेर बागेंत एका खुर्चीवर बसून मनांत] वासुदेवरावांचा मनुष्य कां अद्यापि येत नाहीं?

ह्मटलें असतां मघाच यावा. पण कां येत नाहीं, कांहीं समजत नाहीं. सांगितल्याप्रमाणें करायाला फसली तर नसेल? फसेल असें होईल का पण? छेः, भलतीच शंका. एक वेळ पूर्वेचा सूर्य पश्चिमेस उगवेल; पण असें होणेंच नाहीं. नांवाची ती सावित्रीबाई. यापेक्षां कठीण कामें कईक वेळां तिनें केलीं असतील. मग असलें शुष्क काम करायला तिला किती उशीर? बरें; त्या मनुष्यानें गाडी वेळेवर नेली असेल किंवा नाहीं? खचीत नेली असावी. कारण पैसेच तसे देण्याचें त्याला कबूल केलें आहे. पैसा खर्च केल्यावर काय होणार नाहीं? इकडची पृथ्वी इकडे ह्मटली तरी होईल. असलें जबरदस्त या पैशाचें माहात्म्य! मग येवढी पैशाची लालूच लाविली असतां त्यानें वेळेवर गाडी नेली नसेल ही शंकाच नको. बरें; सावित्रीबाई मला फसविणार तर नाहीं? मजपासून तिला फारसा लभ्यांश नाहीं ह्मणून कदाचित् माझीं सर्व कृत्यें उघडकीस आणून मला तोंडघशीं देण्याचें तिच्या मनांत तर आलें नसेल? हो. असल्या बायकांचा काय नेम? भलतेंच कांहीं तरी करून बसायच्या! पण असें करण्याला ती धजेल का? छेः! छाती काय तिची असें करण्याची? तिचा जीव तिला नको आहे का? असें करील तर गेलीच उद्यां फाशीं! पण अशा वेड्या कल्पना काय ह्मणून माझ्या मनांत येतात?—

वासुदेवराव—कृष्णराव, या आंत या. अशी मौज टाकून बाहेर काय बसलांत?

कृष्णराव—चालूं द्या. ऐकत आहें—आलोंच इतक्यांत.

( आपल्याशींच )—काय मूर्ख आहे हा वासुदेवराव ! अरे, तुला रत्नपारखी ह्मणावें कीं गाजरपारखी ! गाजरपारखी हेंच नांव तुला साजतें. कारण रत्नजडित हिऱ्याला लात मारून गारगोटीची वाखाणणी करीत बसला आहेस. खरें आहे. गाढवाला गुळाची काय चव ? काय वेड्यासारखा या रांडेला भुलला आहे पहा ! तुझ्या पत्नीच्या एका नखाग्राची तरी सर या रांडेला येईल काय रे ? अहाहा ! किती गोड स्वरूप माझ्या प्रियेचें ! भाषण किती रम्य ! हंसणें किती मनोहर ! सुंदरी ! अद्यापि या दीनाची तुला कींव येत नाहींना ? अशा गचकळ्या खात किती दिवस या दुःखसागरांत पडावें ? खरोखर; माझे पंचप्राण तुझ्या हृदयस्थानीं वास करण्याच्या इच्छेनें कितीएक दिवस तुझ्या अप्रतिम शरीरा सभोंवतीं गरगर, गरगर, घिरट्या घालीत आहेत, परंतु अद्यापि तूं त्यांचा आंत रिघाव होऊं देत नाहींस हें तुझ्या कोमल हृदयाला शोभतें का ?—

वासुदेवराव—[ बाहेर येऊन ] कृष्णराव, चला आंत ! कसला विचार करीत बसलांत ? काय मौज चालली आहे आंत आणि तुह्मी स्वस्थ बाहेर बसतां ! चला उठा.

कृष्णराव—छेः बोवा ! उष्मा कांहीं मनस्वी होत आहे. मद्यां घेतली त्यानें कतिशय डोकें चढलें आहे. थंड वारा सुटला आहे. कांहीं बरें वाटलें ह्मणजे येतों.

वासुदेवराव—बरें सावकाश या. [ हळू ] काय हो ! गोपाळरावांना उलट्या होत आहेत ह्मणून जयाजीनें सांगितलें, हें काय असेल ? विष तर लागू झालें नसेल ?

कृष्णराव—दुसरें काय ? तेंच.

वासु०—बरें; तुह्मी आंब्यांत विष घालून त्यांना दिलें हें उमगणार तर नाहींना ?

कृ०—त्याविषयीं काळजीच नको.

वासु०—या विषानें थोड्या दिवसांतच गोपाळराव, संसाराला मुकणार एकूण !

कृ०—यांत काय संशय ? त्या दुष्टाला हेंच शासन योग्य.

वासु०—कृष्णराव, तुह्मी कांहीं ह्मणा. हें वर्तमान ऐकल्यापासून माझ्या जिवाला चैन नाहीं ! उदक नसलें ह्मणजे ज्याप्रमाणें मासा तळमळ करतो, तद्वत् माझ्या मनाची स्थिति झाली आहे. दुर्धर कृत्य त्यांनीं केलें खरें; परंतु त्याबद्दल एकदम विचार न करितां तुह्मी त्यांच्या जिवावर उदार झालां हें फार अनुचित कर्म केलें. त्याजवर विषप्रयोग करणार हें मला पूर्वींच कळविलें असतें तर तसें करण्याला मी कधीं रुकार दिला नसता. केलेल्या अपराधाबद्दल त्यांना हें शासन केलें हें विशेष नाहीं असें ह्मणतां येईल; परंतु हें शासन करण्यांत त्या निरपराधी, सुशील, व ममताळू वहिनींवर विनाकारण दुःखांचा डोंगर कोसळेल याची कल्पनाही तुमच्या मनांत आली नाहीं याचें मला फार वाईट वाटतें ! एखाद्या पाषाणहृदयी तस्करानें नाकांतील दागिना काढून घ्यावयाचा ह्मणून नासिक छेद करावा तसें तुह्मी केलें ह्मणून माझें मन, कृष्णराव, या वेळेस आंतल्या सुया बोंचल्याप्रमाणें टोंचटोंचून घेत आहे ! पुनः गोपाळरावांनीं अपराध केला असें ह्मणण्यास आपणास तोंड कोठें आहे ? कारण त्यांनीं दरोडा पडला त्या वेळेस आपले प्राण वांचविले हें प्रत्यक्ष तुह्मी पाहि-

लेंचें. त्यांच्या एकेक उपकाराची स्मृति होऊं लागली ह्मणजे असें वाटतें कीं तुह्मी त्यांना विष दिलेंत हें फारच वाईट केलेंत. दुसऱ्या कोणत्याही रीतीनें त्यांचें शासन केलें असतें तर बरें झालें असतें ! निरपराधी असतां त्यांजवर विषप्रयोग केलात असा देखील, कधीं कधीं मला स्वप्नांत भास होतो ! काय करावें, कृष्णराव, चैन पडत नाहीं ! !

कृ०—काय, वासुदेवराव, तुह्मांला वेड तर लागलें नाहीं ? उपकार केले ? कसले उपकार केले हो ? याला उपकार ह्मणावयाचें काय ? दुष्टकृत्यावर झांकण पडावें ह्मणून नानातऱ्हांनीं कोणीही असे प्रकार करीलच. ह्मणून ते उपकार झाले कीं काय ? धडधडीत तुमच्या डोळ्यांत धूळ घालून तुमच्या अत्युत्तम सुखाचा त्या चांडाळानें निर्धास्तपणें वांटा घेतला त्याबद्दल क्षणोक्षणीं तुमच्या मनांत कसें येत नाहीं? कशी तुमच्या जिवाला शरम वाटत नाहीं ? पत्र पाहिलें त्या वेळेसच त्या तस्कराची गर्दन उडवावी असा मी तुह्मा-ला रुकार दिला असता; पण विचार केला कीं असें केल्यानें तुह्मीही प्राणास मुकाल. असा घातकी मनुष्य या भूतलावर असला काय आणि नसला काय? उगीच काय शुष्क विचारांत पडलां आहां? बेहत्तर आहे मेला तर!!

( इतक्यांत वासुदेवरावांचा नोकर येतो. )

वा० नो०—रामराम सरकार.

कृ०—कांरे कशाकरितां आलास?

वा० नो०—घात झाला सरकार ! बुडाल घर आमच ! !

वासु०—अरे असें झालें तरी काय ?

वा० नो०—बाईसाबांचा आज फाटपास्न कुट कुट पत्ता न्हायी सरकार! न्मोजच्या परमान फाटच्या पान्यामंदी साइत्त-रीबाई त्येस्नी उठवायला गेल्या आन् खोलीमंदी फातात तर तत हातरूनापांगरूनाबिगर कोनबी न्हायी! न्हायीत असा फुकारा व्हताच वाड्यामंदी समद्या कोन्याकोपऱ्या-ला धुंडल पन सरकार, कुट कुट त्येंचा ठाव न्हायी!

कु०—विहिरीकडे वगैरे चोंहींकडे पाहिलेंत?

वा० नो०—संमद फायल सरकार!

कु०—नीट पाहिलेंत?

वा० नो०—नीट फायल सरकार!

कु०—कायरे? तुह्मी सर्व लोक देवडीवर जागत असतां असा प्रकार कसा झाला? मला वाटतें, तुह्मी सर्व जण काल खुशाल झोंपा काढीत होतां!

वा० नो०—अस कस व्हइल सरकार? न्वाजच्या परमान पाळीपाळीन खडा पारा देत व्हतो सरकार. ह्या पाया-चीच आन, ख्वाटं बोलन तर!

कु०—बरें, पिच्छाडीचें दार उघडें होतें?

वा० नो०—त्येंव्हढ मातुर उघड व्हत, आन् तकुंडच गे-ल्या अस समद्यासनी वाटत सरकार!

कु०—तें कां उघडें होतें? नित्याप्रमाणें सायंकाळीं ला-वलें नव्हतें?

वा० नो०—लावल व्हत सरकार! समद्यास्नी ठाव हाय!

कु० बरें, जा तूं पुढें; आह्मी येतों इतक्यांत.

(वासुदेवरावांचा नोकर जातो.)

कु०—काय हो, वासुदेवराव? मोठें आश्चर्य आहे! बरें, या गेल्या असाव्या कोठें?

वा०—असेल, कोठेंही गेली असेल. पळून गेली असेल, किंवा जीव दिला असेल. जीव दिला असल्यास फारच उत्तम. त्याची इतकी वाटाघाट कशाला पाहिजे? कधीं तोंड काळें करील असें मला झालें होतें कृष्णराव. फार चांगलें झालें. आतां घरांत सुखानें तरी राहीन—

कृ०—नाहीं, असें नाहीं. याचा बारीक रीतीनें शोध लावलाच पाहिजे. तूर्त गाणें बंद करा. पाहिजे असल्यास आणखी चार आठ दिवसांनीं येऊं.

वासु०—चला. मजकडून कांहीं हरकत नाहीं.

कृ०—चला तर. गोपाळरावांच्या येथें पळून गेल्या कीं काय, येवढाच शोध मला प्रथमतः लावायचा आहे. नसल्या तेथें, तर याबद्दल गवगवा करण्याची कांहींच गरज नाहीं. [ असें ह्मणत बंगल्यांत येऊन ] गंगाजी, आटपा आतां. दिवस उगवला. फार श्रम झाले तुह्माला. करूं आणखी चार आठ दिवसांनीं मजा.

[ सर्व जातात. ]

---

# अंक पांचवा.

## प्रवेश चवथा.

स्थळ—पुणें—शहराबाहेरचा एक ओसाड वाडा.

रमाबाई—[ आपल्याशींच ] का अजून साधुमहाराज या गरीबाला दर्शनाचा लाभ देत नाहींत? कालची रात्र आणि आजचा सगळा दिवस येथें घालविला? सावित्रीबाई यांना घेऊन येणार तरी केव्हां! बागेंतून

आतां घरीं यायचें झालें असलें आणि मी नाहीं असें समजलें तर माझी देवा! काय रे गत होईल? काय वेड्यासारखी मी घर सोडून आलें! नेहमीं या वाड्यांत साधुमहाराज असतात. कोठें जात नव्हते, येत नव्हते. पण कालच येथून जाण्याची त्यांना बुद्धि कां व्हावी? नशीबच माझें फुटकें! मग त्यांना तशी बुद्धि का नाहीं होणार? काय काय अजून माझे सोहाळे व्हायचे आहेत कोण जाणे! आतां येतील; घटकाभऱ्यां येतील, आणि माझें संकट दूर करतील, या आशेला गुंतून व्यर्थ राहिलें आहें! इतक्यांत ते कसचे येतात? त्यांना का हेंच काम आहे? काय मी वेडी! चला; येतें; ह्मणून सावित्रीबाईला सांगण्याची मला चांडाळणीला कशी बुद्धि झाली? आजपर्यंत विचारल्याशिवाय कुठें घराच्या बाहेर पाऊल देखील टाकलें नव्हतें, आणि कालच हें माझ्या मनांत कोठून वेड भरलें? सावित्रीबाईनें तरी चला ह्मणून कशाला आग्रह केला? तिच्याकडे तरी काय बोल! कालच साधुमहाराज बाहेर जातील हें तिला तरी काय माहीत? बिचारी कोंवळ्या मनाची ती. माझें चांगलें व्हावें; मी या जाचांतून सुटावें; माझा संसार रंगारूपाला यावा; ह्मणून त्या माउलीची इतकी खटपट! पण काय उपयोग? [ इतक्यांत दाराजवळ पाऊल वाजलेंसें वाटून ] कोण आहे बाहेर?—सावित्रीबाई?—साधुमहाराज आले काय हो?

कृ०—[ साधूच्या वेषांत ] बेटा—काळजी करूं नकोस. ज्याचें दर्शन घेण्याच्या हेतूनें चातकाप्रमाणें मार्ग-

प्रतीक्षा करीत आहेस तोच मी प्राप्त झालों आहें—दार उघड.

रमा०—[ आनंदानें दार उघडून ] महाराज ! नमस्कार करतें. [ नमस्कार करते ]

कृ०—[ डोक्यावर हात ठेवून ] अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ! बेटा ! सर्व तुझे मनोरथ परिपूर्ण होतील. बैस.

रमा०—आपण बसावें महाराज. या गरीब दासीकरितां आपणाला फार श्रम झाले.

कृ०—आह्मां साधूंना कशाचे श्रम बेटा ? सुख दुःख आह्मी समान मानतों ! सार्वभौमत्व जरी प्राप्त झालें तरी त्याचा हर्ष नाहीं, किंवा घोर दरिद्रावस्था प्राप्त झाली त्याचा खेद नाहीं ! राजा आणि रंक आह्मांला सारखे बेटा ! सकुमार देह तुझा हा ! तुला मात्र फार श्रम झाले असतील ! बैस; ये अशी जवळ.

रमा०—बसतें महाराज येथें. सेवकाला काय आज्ञा आहे ?

कृ०—बेटा ! भिऊं नको. ये बैस जवळ.

रमा०—महाराज आपणांसमोर भीति कशाची ? आपण वडील आहां, मी लेंकरूं आहें आपलें. लेंकराला वडिलांजवळ भीति कसली ? ( असें ह्मणून कांहींशी जवळ बसते. )

कृ०—( रमाबाईचा हात धरून व तोंडाकडे पाहून ) बेटा ! काय ही तुझी अवस्था ? अरेरे ! अशा सुंदर स्वरूपाची स्थिति अशी कशानें झाली ?

रमा०—महाराज आपण त्रिकालज्ञ आहां; त्या अर्थी आपण सर्व जाणतांच आहां !

कृ०—अहाहा ! बेटा ! किती मधुर भाषण तुझें ! आणि

तुझे भाषणांत विनय तरी किती आहे? पुष्कळ स्त्रिया पाहिल्या; परंतु तुजसमान रूपवती व सद्गुणी स्त्री आजपर्यंत माझ्या पहाण्यांत आली नाहीं. जगन्नियंत्या, तूं धन्य आहेस. या पुतळीला निर्माण करतेवेळीं तूं आपल्या सर्व कल्पनेचा व कौशल्याचा कळस केलास यांत संशय नाहीं. तुझ्या शहाणपणाची आणि चातुर्याची पराकाष्ठा झाली.

रमा०—महाराज, मी बोलतें याचा राग नसावा. आपण साधू—आपली इतकी बारीक दृष्टि बायकांच्या रूपावर नसावी. सर्व बायका आपल्यास समान. रूपवती असो किंवा कुरूप असो. आपण ज्ञानी आहांत. मी मूढ स्त्रीनें आपल्याला उपदेशपर गोष्टी सांगाव्या असें नाहीं. लहान तोंडानें मोठा घांस घेतला याचा मात्र राग नसावा महाराज.

कृ०—बेटा, असल्या मंजुळ भाषणाचा कसा मला राग येईल? स्त्रियांच्या स्वरूपावर दृष्टि नसावी हें आह्मांसारख्यांना मोठें भूषण खरें, परंतु अशी मनाची स्थिति होण्याला सर्वसंगपरित्याग करून वनांतरीं जाऊन राहिलें पाहिजे. इतकी मनाची दृढता होण्याला, बेटा! अद्यापि अवधी आहे. बाळे! तुला ठाऊकच असेल कीं, ज्यांच्या तपोबळाचें माहात्म्य इतकें विलक्षण कीं जर मनांत आलें असतें तर त्यांनीं एका निमिषमात्रांत सर्व विश्वमंडळाचा संहार करून टाकला असता—अशा ऋषिमंडळांत जो प्रमुख विश्वामित्र राजर्षि तो देखील स्वर्गांतलि अप्सरेचें सौंदर्य पाहून मोहित झाला, आणि त्या योगानें साठ सहस्र वर्षें लोहभस्म

खाऊन केलेल्या तपाचा भंग होऊन गेलां. मग आह्मी काय य:कश्चित् ! आमची काय प्रतिष्ठा ! आमचा पाड किती ! अशा सौंदर्याला पाहून कोण नाहीं मोहित होणार ? बेटा ! तुझें हें अप्रतिम लावण्य पाहून आणि हें अमृततुल्य गोड भाषण ऐकून, खरोखर, माझ्या मनाची कांहीं चमत्कारिक स्थिति झाली आहे. अहाहा ! काय ही नेत्रांची ठेवण ! बांधा तरी किती गोंडस ! किती सुबक हनुवटी तुझी ही ! ( हनुवटीस हात लावितो ).

रमा०—( निरखून पाहून व क्रोधानें लाल डोळे करून ) चांडाळा! समजलें ! तूं कोण आहेस आतां समजलें ! दुष्टा ! कपट करून मला फसवायला पाहतोस काय? निर्लज्जा ! तुला लाज नाहीं वाटली हें सोंग घेऊन मजपुढें येण्याची! हरहर ! परमेश्वरा ! आज सर्वोपरी माझा घात झाला ! सावित्रीबाई ! काय हो मला अशी आणून फसविलीत ही ! मी काय असा तुमचा अन्याय केला ह्मणून या निर्दय कसाबापुढें मला आणून टाकलीत ? कांहीं काहो तुह्माला माझी कींव आली नाहीं ? इतके दिवस अन्न खाल्लयाचे चांगले उपकार फेडलेत ! घरांत राहिल्या दिवसापासून उद्धटपणानें एक दिवस तरी मी तुह्माला बोललें, का एक दिवस तरी तुमचा अपमान केला, कां सांगा—सांगा—कां आतां तोंड काळें करून बाहेर लपलां आहां! या अशा समोर. कायहो मानभावीपणाच्या गोष्टी सांगून मला घरांतून बाहेर काढून आणलीत! अग सटवे! काय मजमध्यें वांकडें पाहिलेंस ह्मणन हा प्रसंग मजवर

आणलास ? चांडाळणी ! तुझा सत्यानाश होवो ! तुझे हात चुलींत जावोत ! दुष्टे तुझें देव कधीं बरें करणार नाहीं ! अन्न अन्न करीत तडफडून मरशील, हें तूं पक्कें ध्यानांत ठेव! हे तुळशी आई ! आतां मी काय करूं !

कृ०—सखे! असा व्यर्थ आपल्या जिवाला कां संताप करून घेतेस ? मी काय ह्मणतों तें एकवार ऐकून तर घे!

रमा०—निघ मेल्या येथून ! काय जनावरासारखा, मेल्या, तोंडावाटे उच्चार करीत आहेस ? असे घाणेरडे शब्द तोंडांतून काढण्याची, चांडाळा तुला लाज नाहीं वाटत ! तुझ्या आई बहिणी कोणी असतील त्यांना "सखे" ह्मणून ह्मण जा ! जा येथून लवकर—तोंड काळें कर !

कृ०—प्रिये ! इतक्या कठोर शब्दांनीं कां माझा धिःकार करतेस ? अशा तीव्र भाषणांनीं माझें ताडण करशील तर माझ्यासारखा दुर्दैवी प्राणी या जगतांत कोणी-ही नाहीं ! तुझी एकांतांत भेट व्हावी; तुजबरोबर दोन घटका प्रेमाच्या गोष्टी बोलाव्या, एकवार तरी थोडें हसून मजकडे तूं पहावेंस, ह्मणून ही इतकी खटपट !

रमा०—मेल्या ! तुझें हें तोंड आहे का काय आहे रे ? माझी अशी दशा व्हायला, तूंच रे मांगा कारण असावास ! दोघांत अशीताटातूट करण्यांत, मेल्या तुला काय मिळालें ? काय मी तुझा असा अपराध केला ? मनमानेल तसें बुडविलेंस—जिवावर हवीतशी चैन करून घेतलीस—आणि सर्वस्वी माझ्या सोन्यासारख्या संसाराचें मातेरें करून टाकलेंस; पण "कां

असें करतोस " अशीं अक्षरें, एक दिवस देखील तिकडून निघालीं नाहींत, त्या उपकारांची, चांडाळा ! ही कारे फेड !

कृ०—सुंदरी ! सर्वोपरी अपराधी आहें, हें मी कबूल करतों; परंतु या अपराधाचा दोष कोणाकडे ? काय ह्मणून मला व्यर्थ बोल लावतेस ! सर्व दोष आपल्या लावण्याला लाव. ज्यानें तुला उत्पन्न केलीं त्याला दोष लाव. सखे ! ज्या दिवशीं तुझा हा रतीसारखा सुंदर देह पाहिला, त्या दिवसापासून माझी काय अवस्था झाली आहे हें त्या सर्वसाक्षी जगदीशालाच माहीत. अहोरात्र चैन नाहीं. ध्यानीं, मनीं, स्वमीं तुझी मूर्ति डोळ्यापुढें उभी ! तूं कशी चालतेस, कशी बोलतेस, कशी दिसतेस, कशी हंसतेस, हें सदासर्वकाळ माझ्या अन्तःकरणांत घोळत असतें ! या मोहपाशांत गुंतविलें नसतेंस तर हे सोंग घेण्याची मला काय गरज होती ! कशाला मी ह्या तुझ्या कोमल तनूचे हाल केले असते ! फार तर काय, सुंदरी ! तुझ्या प्राप्तीकरितां मी आपल्या प्राणाची देखील आहुती देण्यास तयार झालों आहें ! यापेक्षां तुला जास्त काय फोडून सांगूं ?

रमा०—शिव ! शिव ! शिव ! शिव ! भगवंता ! माझा अंत तरी तूं आतां किती वेळ पाहणार ! कसा—इतका वेळ, झोंपीं तरी कसा गेला आहेस ! अनन्यभावानें तुला शरण आलें आहें ! अज्ञानामुळें या दीन लेंकराकडून कांहीं अन्याय घडले असतील तर हा पदर पसरतें ! एकवार त्यांचीं क्षमा कर ! या दुष्ट चांडाळाच्या तावडींतून सोडविणार, देवा ! तुजवांचून आतां कोणीरे नाहीं ! सर्वस्वी माझा

पाठिराखा तूंच आहेस! सती द्रौपदीची लज्जा जशी राखलीस तशी या अनाथेची यावेळेस राख! सर्व लोक तुला दयेचा सागर ह्मणतात, मग आज इतकें कठोर मन करून कसा स्वस्थ बसला आहेस! या भावड्या लेंकीवर कांरे इतकी माया पातळ! धाय धाय करून केवढा वेळ तुझा धांवा करीत आहें; पण अजून तुझ्या दयार्द्र अन्तःकरणाला प्रेमाचा पान्हा कसा फुटत नाहीं? [ कृष्णरावाकडे पाहून ] कृष्णराव! हात जोडतें! पायां पडतें! नाक घांसतें! येथून निघून जा; आणि कृपा करून या कोंडवाड्यांतून या गाईची सुटका करा! वडील भावाप्रमाणें तुह्मी मला आहां! असे दुष्ट विचार नका हो नका मनांत आणूं! अशानें तुमचें तिळभर देखील बरें होणार नाहीं! दुःशासनाची काय अवस्था झाली याचा विचार करा—एकाएकीं आपल्या प्राणाला कीचक कसा मुकला हें लक्षांत आणा—शिवाचे विवाहकालीं ब्रह्मदेवाला शिरच्छेदाची शिक्षा कां झाली, हें आपल्या मनाला विचारा—येवढा लंकेचा राजा रावण; पण जेव्हां पापाची घडी भरली, तेव्हां त्याची गत काय झाली, तें सगळें मनांत आणून सावध व्हा! पापकर्म केल्यानें कधींही चांगला परिणाम होत नाहीं! कृष्णराव!—काय असा मी तुमचा अन्याय केला. ह्मणून मज दुबळीवर हा प्रसंग आणलात? येथून माझी सुटका कराल तर तुह्मीं असें केलेंत याबद्दल एक अक्षर सुद्धां मी तिकडे बोलणार नाहीं. विचारल्याशिवाय घरांतून बाहेर पडलें याबद्दल देहदंडाशिवाय दुसरी

शिक्षा होणें नाहीं, हें खचीत. कांहीं चिंता नाहीं–हातून मी आनंदानें मरेन, पण तुह्मीं मला येथें फसवून आणलीत अशीं अक्षरें जिभांत जीव आहे तोंपर्यंत, या धरित्रीमातेशपथ हो, या तोंडावाटे काढणार नाहीं! मी मेल्यावर खुशाल दोघेजण आनंदानें राहा! इतके दिवस हवे तसे तुह्मी पैसे उधळलेत, आणि नाहीं नाहीं ते छेद केलेत, पण एक अक्षर सुद्धां मी बोललें नाहीं! बोललें असेन असें तुह्मांस वाटत असल्यास किंवा ही आडकाठी उगीच मधें कशाला पाहिजे असें वाटत असल्यास ही घ्या माझी मान! आणा तरवार आणि करा दोन तुकडे, आणि येथल्या येथेंच मला पुरून टाका!–ह्मणजे तुह्मांवर कांहीं वहीम येणार नाहीं. कृष्णराव! पदर पसरतें!–कृपा करून येवढी ओंवाळणी बहिणीला द्याल! येवढेंच रे भाउराया! सरते शेवटचें तुझेपाशीं मागणें आहे. खरोखरी या संसाराला मी त्रासलें! अगदीं या देहाचा वीट आला! कांहीं बहिणीची कींव येत असेल तर हें शीर आणि हें धड वेगळें करायाला नको आतां उशीर लावू!

कृ०–हरहर! सखे! काय मुखावाटे असें अभद्र वचन बोलतेस! मी तुझे प्राण घेणार? खाटकाचें अघोर कर्म करण्याकरितां येथें आलों आहें काय! हा हात [ हात पुढें करतो ] आणि [ रमाकडे हात करून ] या सकुमार देहाची मान कापण्याकरितां शस्त्र घेण्याला धजणार! छेः! छेः! छेः! कोण भयंकर विचार! किती घोर कल्पना ही! शिव! शिव! शिव! सुंदरी ही गोष्ट माझ्या स्वमांत तरी येईल काय? हर हर!

एकूण तूं मला मारेकऱ्यांत गणलेंस अं! असो—नशीब माझें! मी पाषाणहृदयी खरी!—परंतु तूं आतां जें बोललीस त्यानें माझ्या देखील अन्तःकरणास द्रव येतो; आणि या वेळेस तुझी सुटका करावी अशी देखील मनांत इच्छा होते, परंतु काय उपयोग? येथून घरीं गेलीस न गेलीस तोंच वासुदेवराव तुला जिवंत राहूं देणार नाहींत. तूं नाहींशी झालीस असें त्यांना कळल्यापासून त्यांना कांहीं विलक्षण संताप उत्पन्न झाला आहे.

रमा०—माझे प्राण घ्यायचें होईल येवढेंच ना? कांहीं चिंता नाहीं. मरणापेक्षां आतां मी कशाचीच इच्छा करीत नाहीं. सोडा मला. जाऊं द्या येथून लवकर. माझ्या सर्व इच्छा परिपूर्ण झाल्या. कशाची आशा राहिली नाहीं. केव्हां मरण येईल याचीच मी वाट पहात आहें. सोडा; जाऊंद्या मला कृष्णराव.

कृ०—सुंदरी, भलताच हट्ट काय धरून बसतेस? मरणाची वाट पाहत आहें ह्मणतेस पण हें का वय तुझें मरण्याचें? अजून तुझ्या ओठावरचा जार देखील नाहीं वाळला. पुरतीं वीस वर्षेंही तुला लोटलीं नसतील! तारुण्यावस्थेमध्यें ज्या ज्या अत्युत्तम सुखाचा अनुभव घ्यावयाचा, त्याचा शतांश देखील अद्यापि तुझ्या वांट्यास आला नसेल. अज्ञान पोर आहेस तूं—अजून तूं काय पाहिलें आहेस? अत्युत्तम सुखाचें खरें स्वरूप काय आहे हें तुझ्या गांवीं देखील अद्यापि नाहीं— आणखी मरणार ह्मणतेस! किती पोरकट विचार तुझा हा! किंचित् विचार कर. कां इतकी आपल्या जिवावर उदार झालीस? कोणतें तुजवर असें महत्संकट येऊन पडलें?

इतकी विरक्त कां होतेस ? शेंकडों बायकांना-आपल्या नवऱ्यांनीं सोडून दिल्या ह्मणून त्यांनीं आपले, वेड्यासारखे प्राण दिले कीं काय ? खुशाल त्यांच्या छातीवर बसून मजा मारीत आहेत. कां इतक्या हाल अपेक्षेमध्यें विनाकारण दिवस काढतेस ? कोणत्या गोष्टीचें तुला कमी आहे ? या सेवकाचा एकवार अंगिकार करून तरी पाहा—केलास कीं तुझ्या सुखाला पारावार नाहीं असें करीन. जिवांत जीव आहे तोंपर्यंत तुझा ह्मणून पुन: अंगिकार करणार नाहीं असा निर्धार वासुदेवरावांनीं केला आहे. मग विनाकारण घरीं जाण्यांत काय अर्थ आहे ? कशाला त्याचें इतकें आर्जव करतेस ? ये इकडे अशी. नको रडूं. (अंगास हात लावणार इतक्यांत.)

रमा०—(लाल डोळे करून) खबरदार मेल्या, माझ्या एका नखाला धक्का लावशील तर!—माझ्याशीं गांठ आहे—विचार करून पुढें पाऊल टाक ! चांडाळा ! तुला मी आपला प्रत्यक्ष भाऊ कीं रे ह्मटलें ! परोपरीनें विनवणी केली ! पायां देखील पडलें !—तरी कांहीं कारे मांगा, माझी तुला कींव येत नाहीं ! (मोठ्यानें ओरडून) या हो या कोणी बाहेरून !—या लौकर !—लौकर या !—जलदी करा !—या दुष्टाच्या हातून मला सोडवा !—हा मेला मला भ्रष्ट करूं पहात आहे !—कोणी येऊन सोडवाल तर अनाथावर मोठे उपकार होतील! हा पहा दुष्ट मला धरतो आहे ! धरतो आहे हो ! धरतो आहे ! !—या लौकर ! जलदी करा ! पायां पडतें !—नका उशीर लावूं !

हृ०—सखे ! काय हें ? अशा ओरडण्यानें काय होणार ? केवढा अफाट वाडा हा ! अगदीं मधल्या खोलींत आपण आहों—यापेक्षां शतपट जरी मोठ्यानें ओरडलीस तरी बाहेरच्या लोकांना काय दाद लागणार आहे ? मुद्दाम तुजकरितां महिन्यास वीस रुपये भाडें देण्याचें ठरवून हा वाडा घेतला तो का लहान असेल ? व्यर्थ ओरडून कां आपला नाजुक घसा बसवून घेतेस ? इतका वेळ मीं तुझें पुष्कळ आर्जव केलें, परंतु तिकडे तूं बिलकुल लक्षच देत नाहींस—तर तुला अखेरचा ठराव सांगतों—माझी इच्छा तृप्त न करशील तर तुझी जन्मपर्यंत देखील येथून सुटका व्हायची नाहीं.—हीं दगडावरचींच अक्षरें समजून ठेव ! !

रमा०—शिव ! शिव ! शिव ! शिव !—नारायणा ! कोठें रे इतका वेळ दडून राहिला आहेस ? हे धरित्री माते ! ह्या अनाथ लेंकराला आतां आपल्या पोटांत घ्यायला उशीर नको लावूं ! आईगे ! आतां मी काय करूं ! [मोठ्यानें रडूं लागते ]

कृ०—[ जवळ जाऊन हात धरून ] सुंदरी !—

रमा०—[ हात झिटकारून ] थू: तुझ्या तोंडावर मेल्या ! रक्तपिती भरून रे मेल्या हे तुझे पापी हात झडतील ! तोंडांत अगणित किडे पडून, कुजून कुजून मरशील ! असें ह्मणत एका कोंपऱ्यांत जाते तों पायांस विळी लागते ती हातांत घेऊन ] अहाहा ! भगवंता ! आली—शेवटीं माझी करुणा तुलाच आली ! माझें लेंकराचें गाऱ्हाणें तूंच ऐकलेंस ! केवढे उपकार तुझे ! हे उपकार जन्मजन्मांतरीं सुद्धां मी विसरणार नाहीं ! ! या लेंकीला

घेच आतां आपल्या पदरांत !!!! [ असें ह्मणून माने-वर विळीचा घाव करते ]

कृ०—[घाबरून] हां ! हां ! हां ! हां ! सुंदरी ! हें काय ? अरे! निश्चेष्ट होऊन पडली! शिव! शिव! शिव! मानेवर विळीचा घाव करून घेतला ! अरे ! केवढी रक्ताची धार ही ! सावित्रीबाई—या आंत लौकर ! [ सावित्री आंत जाते. ] हा पहा काय प्रकार झाला तो ! असो. झालें तें झालें; पण भिण्याचें कांहीं कारण नाहीं. अजून गोष्ट हातांतून गेली नाहीं—जखम झाली आहे—पण अशी झाली नाहीं कीं तिच्या जिवास एकाएकीं धक्का पोंचेल. जलदी पाण्याची पट्टी मात्र लावा. आत्तां डाक्टराकडून दुसरी पट्टी आणतों. मी जातों; बाहेरच्या दाराला आंतून कडी लावा—आणि मी येई तोंपर्यंत येथून हालूं नका.—[ कृष्णराव व सावित्रीबाई बाहेरच्या दारापर्यंत जातात.]

सावित्री०—रावसाहेब इकडे पहा, तुह्मांला कांहीं सांगायाचें आहे. आपण खोलींत होतां त्या वेळेस आपला नोकर येथें आला आणि ह्मणाला, आपल्या आईसाहेबांस वाख्याचा उपद्रव झाला आहे. दोन चार रेच आणि उलट्या झाल्या ह्मणून सांगत होता. आपण येथें आहां असें मीं त्याला सांगितलें नाहीं ह्मणून तो इतक्यांत आपणास दुसरीकडे पहावयास गेला.

कृ०—आईला वाखा झाला ? शिव ! शिव ! सावित्रीबाई, आतां तुह्मीही मजबरोबर चला. पट्टी देतों ती लवकर आणून तिच्या मानेवर लावा; आणि जवळ जागत बसा. चला लवकर—लावा बाहेरून कुलूप.

सा०–[ कुलूप लावतां लावतां ] रावसाहेब, पट्टी देणार त्यानें बरें झालें तर बरें. नाहीं तर भलतेंच जर तिचें येथें कांहीं झालें तर, रावसाहेब, मी एकटी एवढ्या वाड्यांत त्या प्रेताजवळ बसून काय करूं?

कृ०–( थोडा थांबून किंवा हळूच ) छे: छे: छे: ! सावित्रीबाई ! घात केलात ! केवढ्यानें बोललां ? इतक्यांत इकडून लपत लपत कोणसा गेला त्यानें खचीत तुमचें बोलणें ऐकलें; असो. कांहीं चिंता नाहीं. बोलतांना तिचें नांव घेतलें नाहीं, येवढें तरी बरें केलेंत. आतां झालें तें झालें; पण मेहेरबानी करून या पुढें मात्र एक अक्षर बोलूं नका. पुढें काय व्यवस्था करायची तें सर्व मी वाटेनें सांगतों. चला. [ निघून जातात. ]

गोपाळ०–काय करावें !–काय ती चांडाळीण त्या दुष्टाबरोबर बोलली हें बरोबर ऐकूं आलें नाहीं; "नाहीं तर भलतेंच जर तिचें येथें कांहीं झालें" येवढीं अक्षरें मात्र खास मीं ऐकलीं. "तिचें येथें कांहीं झालें" हींच अक्षरें–खास हींच–ती कोण? इतक्या रात्रीं कृष्णराव आणि सावित्रीबाई या ओसाड वाड्यांत असण्याचें कारण काय? खास या वाड्यांत वहिनी आहेत, आणि त्यांच्यावर मोठा वाईट प्रसंग गुदरला आहे, यांत संशय नाहीं. या दोघांच्या पाठोपाठ जाऊन, काय बोलतात तें ऐकलें असतें, ह्मणजे सर्व समजलें असतें. पण काय करूं! त्यांच्या इतकें जलद चालण्याची मला शक्ति नाहीं. या दुखण्यानें मोठा घात केला, याबद्दल येथें गवगवा करून चौकशी करावी तर तेंही वाईट. वहि-

नी नसून दुसरीच बायको असेल, आणि या प्रकरणांत वासुदेवरावांचें अंग नसेल हें तरी कशावरून? छेः! तसें केलें तर भलतेंच होईल. युक्तीनेंच तपास लावला पाहिजे. [ जातात. ]

# अंक सहावा.

## प्रवेश पहिला.

स्थळ—पुणें—गोपाळरावांचा वाडा.

सरस्वतीबाई—बगींत बसून येवढ्या रात्रींचें कोठें जायचें झालें होतें? बरोबर विश्वासरावांनाही घेतलें होतें. प्रकृत जास्त बिघडली ह्मणून डाक्तराकडे जायचें झालें होतें वाटतें?

गोपाळराव—नाहीं. आंगाची तलखी फार होऊं लागली, आणि झोंप येईना ह्मणून असाच बुधवारांतून फिरून आलों. औषध लवकर आणशील तर बरें होईल—जीव फार कासावीस होऊं लागला!

स०—[ औषध आणते. ]

गो०—[ औषध घेऊन ] काय करावें! कांहीं चैन पडत नाहीं! औषधावर औषधें चाललीं आहेत तरी तिळभरही प्रकृतीच्या मानांत फेर पडत नाहीं, तेव्हां या रोगाला ह्मणावें तरी काय?

स०—काय माणसानें बोलावें बरें आतां! खरेंच,—पुरे बरें का आतां ह्या डाक्तरांचीं औषधें. या मेल्यांना कांहीं देखील समजत नाहीं. भ्रस्पतवार, भ्रस्पतवार आठ—आणि शुकुरवार, शुकुरवार आठ, आज बरोबर पंधरा दिवस झाले या डाक्तराचें औषध घ्यायाला लागून. पण अम्मळ कांहीं तरी गुण! मेल्यांना गोड गोड बोलून पैसे उपटायला तेवढें सांगा, गुणाच्या नांवानें मात्र आंवळ्याएवढें पूज्य!

गो०—काय बोलतेस? हा डाक्तर सामान्य का आहे?

येवढ्या पुण्यामध्यें ज्याची प्रसिद्धि तो का असाच असेल? आपलें भोक्तृत्वच संपलें नाहीं, त्याला तो नाहीं, मोठा धन्वंतरी आला तरी करणार काय?

स०—असें बोलायचें झालें ह्मणजे आमचें बोलणेंच खुंटतें; पण थोडें माझें ऐकायचें होतें! येथें मेहेंदळे वैद्य आहे कीं नाहीं त्याची फार ख्याति सांगतात. रोग्याला पाहतांच परीक्षा करतो ह्मणतात. हें मला ह्या रामचंद्रानेंच सांगितलें. इतक्यांचीं जशीं औषधें झालीं, तसें त्याचें तरी एकदां घेऊन पहायचें होतें.

गो०—कां रे रामचंद्र, इतका कां रे मेहेंदळ्या उत्तम आहे?

राम०—काय सांगूं रावसाहेब? त्यांच्या परीक्षेची आणि औषध देण्याची कांहीं शर्थ आहे. नुस्ता रोग्याला लांबून पाहतात, आणि अमुक अमुक रोग आहे ह्मणून फाड्कन् सांगून टाकतात. विलक्षण स्पष्टवक्ता! ताड कीं फाड—मुरवत त्या प्राण्याला कशी ती ठाऊकच नाहीं. ब्रह्मदेव कां असेना—जें खरें दिसेल तें स्पष्टपणें सांगून टाकायचें. मग तिकडे कांहीं होवो! चार पांच दिवस झाले, सहज त्यांच्यायेथें गेलों होतों. कांहीं वेळ बसलों, तों तेथें एक व्याधीग्रस्त श्रीमान् गृहस्थ आला, आणि रीतीप्रमाणें जाजमावर बसायला लागला. असेंच त्याच्या तोंडाकडे पाहिलें आणि जाजमावर कांहीं त्यांनीं त्याला बसूं दिलें नाहीं. "जा लौकर" ह्मणाले—"आतां तोंड नका दाखवूं. पाणी न पितां नुसत्या दुधावर राहा ह्मणून तीन तीन वेळां बजावून सांगितलें असतां खास तुह्मी आज पाणी प्यालांत, हें तुमच्या मुखचर्येवरून स्पष्ट दिसतें—हं—जा, जा, लौ-

कर. आपल्या सर्व जिनगीची व्यवस्था लावा. आणखी दोन तासांनीं वायु होऊन खास तुह्मी मरणार." असें त्यांनीं त्याला खाड्कन् सांगितलें. बिचारा गर्भगिळित होऊन तसाच परत गेला—आणि काय सांगूं महाराज—सांगितल्याप्रमाणें खरोखरीच दोन तासांनीं पार !! हें प्रत्यक्ष मीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलें.

गो०—काय सांगतोस रामचंद्र तूं ? अमुकच वेळेस तुह्मी मरणार असें भविष्य करण्याला तो ब्रह्मदेव का आहे ? झाडावर कावळा बसायला आणि ढाळी मोडायला गांठ पडली झालें.

स०—झालें रामचंद्र ! कांहीं सांगून येथें उपयोग नाहीं; सांगितलेलें खरें वाटायचेंच नाहीं. जीव वेडा ह्मणून बोलल्याविना राहवत नाहीं इतकेंच.

गो०—असें भलतेंच जर सांगितलें तर तें खरें वाटेल कसें ?

स०—आतां ह्मण ह्या रामचंद्राला खोटें सांगून काय मिळणार ? तोच कशाला पाहिजे ? कोणालाही विचारलें तर त्याच्याविषयीं आपलें अस्सें सांगतात. लांब कशाला ? हीच आपल्या शेजारच्या टोळांची सून. बाळंतरोग होऊन मरते कीं जगते अशी तिची अवस्था झाली होती. उपाय करकरून सगळे थकले. इंग्रजी "डाक्तर झाले—आमचे वैद्य झाले—जो भेटेल त्याचें औषध त्यांनीं आपलें देऊन पाहिलें—पण गुणाचें कसें तें नांव नाहीं. सरतेशेवटीं यांचें जेव्हां दिलें तेंव्हां तिला गुण आला. नुस्ता हाडांचा सांपळा उरला होता, पण आतां कशी झाली आहे कीं, ज्याचें नांव ! भराभर हौदावरून पाण्याच्या घागरीच्या घागरी आणते. "

गो०—असेल, तो चांगला असेल. त्याविषयीं माझें कांहीं ह्मणणें नाहीं. परंतु सत्रा हजारांची औषधें घेणें बरोबर नाहीं. एकावर विश्वास ठेवावा, मग गुण येणें हें ईश्वराधीन आहे.

स०—नाहीं, पण मेहेंदळ्याचें एकदां घ्यायचेंच होतें.

गो०—बरें तर. आणखी पांच दिवस वाट पाहतों, तोंपर्यंत वीस दिवस होतात. वीस दिवसांनीं हटकून गुण येईल, ह्मणून डाक्तरांनीं सांगितलें आहे. नच गुण पडला तर त्याचेंही घेऊन पाहूं. आपल्याला काय, कोणाच्याही हाताला यश येवो आणि आपणाला गुण येवो ह्मणजे झालें.

स०—मी तरी तेंच ह्मणतें.

राम०—बाहेर विश्वासराव उभे आहेत.

गो०—विश्वासराव? या ह्मणावें आंत लौकर. त्यांचीच मी वाट पाहत आहें.

वि०—[ येतात. ]

गो०—कसें काय? सांगितल्याप्रमाणें लागला पत्ता? आणल्यात त्यांना?

वि०—छे:, अद्यापि त्या वाड्यांत प्रवेशच होत नाहीं. एका जवानाला तेथें दडवून ठेवला आहे. सावित्रीबाई बाहेर जातांच इकडे वर्दी द्यायला येईल.

गो०—अजून ती चांडाळीण बाहेर निघत नाहीं?

वि०—नाहीं. नित्य वासुदेवरावांच्या येथें केव्हां जाते हें कांहीं समजत नाहीं.

गो०—हो, खरेंच हिला ठाऊक असेल. तिची वासुदेवरावांच्या येथें जाण्याची कोणची वेळ बरें?

वि०—पहांटेची चार वाजतां जाते ती दिवसभर त्यांच्या येथेंच असते.

गो०—मग काल चार वाजतां कशी गेली नाहीं कोण जाणे! राहिली असेल चांडाळीण कांहीं तरी मिष करून.

वि०—असेल. तिचा नेम काय? पण रावसाहेब, रमाबाईच आंत आहेत हें कशावरून? दुसरीच एखादी बायको असेल.

गो०—छेः, त्याविषयीं शंकाच नको विश्वासराव. इतकी काल मेहनत केलेली फुकट जाईल काय? वहिनी नाहींशा झाल्यापासून त्या सटवीचाच वहीम मला आला होता. कारण ती वाईट चालीची आहे असें मला बरेच दिवसांपासून समजलें आहे. आणि ह्मणूनच ती कोठें राहाते याचा परवां मीं शोध लाविला. हजार मसलती करून वहिनींना तिनेंच फसवून आणिल्या असाव्या असा माझा तर तर्क होतो. असो, कोणीही असो. बिचारीवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे यांत संशय नाहीं! ती चांडाळीण बाहेर जातांच सांगितल्याप्रमाणें युक्ति करून बेलाशक कुलूप फोडा आणि जी कोण आंत असेल तिला येथें तावडतोब घेऊन या. चला. आटपा.

वि०—हा पहा, निघालोंच रावसाहेब.

गो०—कांहीं गवगवा न होतां तुमच्या आंत शिरकाव झाला तर बरेंच झालें. नाहीं तर कांहीं वहीम आल्याकारणानें मीं कुलूप फोडण्यास हुकूम दिला ह्मणून बेधडक कोणी विचारील त्याला सांगा. मीच आलों असतों;

पण काय करूं? माझ्यानें आज उभें देखील राहवत नाहीं विश्वासराव!

वि०—कांहीं काळजी करूं नये आपण. तपास लावण्याच्या कामांत सारी रात्र काल आपण जागून मेहनत केलीत, हेंच फार वाईट झालें. इतकी प्रकृति बिघडली असून असें करणें बरोबर नाहीं. आज प्रकृति जास्त बिघडण्याचें कारण तेंच. जातों आतां. आपण चार घटका स्वस्थ पडावें.

गो०—वाड्यांत शिरल्यावर कृष्णराव येतो कीं काय याचा मात्र बरोबर तपास ठेवा. तो आला तर कांहीं भलतेंच होईल.

वि०—त्याविषयीं आतां भीतीच राहिली नाहीं. एक वर्तमान आपणास सांगण्यास विसरलोंच. महामारीचा उपद्रव होऊन, कृष्णरावांच्या मातोश्री आज प्रातःकाळींच वारल्या. आणि दोनप्रहरापासून कृष्णरावांचे पोटांत एकाएकीं विलक्षण तिडिक निघून ते फारच बेजार झाले आहेत. कृष्णराव काय करतात, कोठें जातात वगैरे गोष्टींचा बारकाईनें शोध लावण्याकरितां ज्या जवानाला काल रात्रीं आपण पाठविलात, त्यानें ही बातमी आणिली.

गो०—असें काय? फार चांगलें झालें. जा तर तुह्मी आतां लवकर. दोन इतक्यांतच वाजतील. रामचंद्र एक काड्यांची पेटी आणि मेणबत्ती यांच्याजवळ दे. लागेल तेथें तुह्मांला.

वि०—नको रावसाहेब, सर्व मीं घेतलें आहे.

गो०—हं हं!—जा तर मग.

[ विश्वासराव जातात. ]

गो०—काय करावें? पायांची फार आग होऊं लागली; तूप लावून थोडें चोळ बरें.

स०—कशाला? कांहीं नको चोळायला. जायचें होतें विश्वासरावांबरोबर आतांच. भाऊजींपेक्षां आणि रमापेक्षां का प्रकृत जास्त आहे? पायांची आग काय, राहील मेली कधीं तरीं! खरेंच, आतां शर्थ झाली बरें—काय हें? काल सारी रात्र जागरण करायचें झालें ना? मला हें समजूं देखील दिलें नाहीं! पहा मला मेलीला कशी झोंप लागली ती? झोंप लागतांच हळूच उठून जायचें झालें वाटतें?

गो०—मग काय करावें? वहिनी नाहींशी झाल्यापासून या जिवाला खरोखर चैन नाहीं. कसा झाला तरी वासुदेवराव आपला स्नेही. आणि त्यांची सुशील पत्नी नाहींशी झाल्यावर मी डोळे झांकून स्वस्थ बसावें काय? मूर्ख तो! मजशीं कसाही वागला ह्मणून अशा प्रसंगीं मी कानाडोळा करावा, हें तुला तरी प्रशस्त दिसतें? प्रकृति प्रकृति ह्मणजे काय? बेहत्तर आहे बिघडली तर. रमावहिनी तुझा जीव कीं प्राण असून असें तूं मला वर्मी बोलतेस हेंच आश्चर्य!

स०—रमाचें ह्मणजे वाईट व्हावें असें का माझ्या मनांत आहे? या जागरणामुळें प्रकृत फारच बिघडली ह्मणून मी बोललें. हें पहा बरें तोंड किती सुकून गेलें आहे तें? आंगांत अम्मळ तरी शक्ति? ( गोपाळराव खोकूं लागतो ) हें पाहिलें? पुरतें खोकवत सुद्धां नाहीं.

आगबाई? असे काय ह्मणून डोळे फिरवायचे? रामचंद्र—अरे रामचंद्र! इकडे ये लौकर बाबा! हें पाहा काय तें! जा डाक्तरला घेऊन ये लौकर.-अरे देवा! आतां मी काय करूं! [ स्फुंदूं लागते.]

गो०—काय वेड्यासारखी भितेस? लौकर घोटभर पाणी दे. शोष पडला ह्मणून जीव अम्मळ कासावीस झाला त्याला इतकें भ्यावें! [ रामचंद्र पाणी देतो. ]

स०—गरगर डोळे फिरवितांच माझ्या पोटांत तर बाई धःस झालें; आतां हात जोडतें!—पुरे बरें हा हट्ट! आज तरी मामंजीना आणि सासूबाईंना या ह्मणून लिहून धाडायचें होतें. खरेंच, काय अजून वेड्यासारखी मी विचारतें? आतां ऐकूं नये सवरूं नये. ऐकून ऐकून तर या थराला गोष्ट येऊन पोंचली. मीच उद्यां विश्वासरावाकडून लिहून धाडतें ह्मणजे झालें.

राम०—पत्र पाठविण्यापेक्षां तारच करावी.

गो०—वा: मोठाच शाहाणा तूं! काय एकावर एक अकलेचे तारे तुटत आहेत पण. खबरदार कोणी पत्र लिहाल किंवा तारबीर कराल तर! सगळ्या पोरचेष्टा आहेत वाटतें; वृद्धापकाळ त्यांचा—आणि त्यांना येथें आणून मजसाठीं विनाकारण काळजी लागवायला लावणार. ते आले तर काय अधिक करणार? अनेक उपाय चाललेच आहेत. होईन बरा थोडे दिवसांत. असाच राहीन कीं काय? बिचारे सुखी प्राणी आणि ह्मणे त्यांना तार करूं. मूर्ख कोठले?

स०—रागावूं नये बरें. स्वस्थ पडायचें होतें. आह्मी आतां

एक अक्षर बोलूं तर शपत. ईश्वर संभाळणार आहे. रामचंद्र, जा तूं बावा. मी दार लावून घेतें.

गो०--रामचंद्र, विश्वासराव किंवा कोणी पोलीसचे शिपाई किंवा दुसरें कोणी आलें तर लागलीच मला कळीव.

रा०--बरें आहे महाराज. ( जातो. )

---

## अंक सहावा.

### प्रवेश दुसरा.

स्थळ--पुणें--कृष्णरावाच्या घरांतील दिवाणखाना.

कृष्णराव--[ हंतरूणावर तळमळ करीत ] अरे राम !--अरे राम !--अग आईग!--अग आईग ! आतां काय करूं ? आली कळ !--अरे रे रे रे ! छेः ! काय करावें ? शिव ! शिव ! शिव ! शिव ! ही व्यथा जडण्याला ती चांडाळ दारूकारण ! टाकला रांडेनें कोठा फोडून --केला मला कफल्लक भिकारी ! अरेरेरेरे !--नको--नको देवा ! नको ही दुर्धर यातना !--मरण दे!--नको आतां उशीर लावूं ! जयाजी--अरे--जयाजी !

जयाजी--जी सरकार.

कृ०--अरे, तो स्वैपाकी ब्राह्मण कोठें आहे रे ?

ज०--हेंग असाच घराकड गेला सरकार. याक वख्तानं येईन ह्मंगाला. या बोगन्यामंदी पथ्याच ठेऊन गेलाय.

कृ०--अरे आग लाव त्या पथ्याला !--अगोदर त्यांतलें घोट-भर पाणी दे रे !--अरे दे लौकर ! लौकर दे ! जीव चालला.--आग आईग ! आग आईग !--अरे राम !

ज०—इकत्यामंदी पानी प्याया देऊ नका ह्मनूनशानी डाक्तर सांगून गेलाय सरकार.

कृ०—गाढवा !—दे लौकर पाणी—अरे दे लौकर—देतोस कीं नाहीं ?—इकडे प्राण चालला आहे आणि हा गाढव डाक्तर आणि फाक्तर घेऊन बसला आहे ! अंः—अंः—अंः—

ज०—[मनांत] उगच का वटवट करतुयस ? हे घे पानी—मरनास पानी पिऊन ! माझ काय हत जायच हाय ? [ पाणी देतो. ]

[कृष्णराव त्रासून रागानें पेला फेंकून देतो.]

कृ०—अरे चांडाळा—तें पाणी, अरे तें कोनाड्यांत बाटलींत आहे त्यांतुलें पाहिजे. [ इतक्यांत स्वतःच उठण्याचा प्रयत्न करतो तोंच. ]

ज०—( मनांत ) भरल लेका तुझ. घे हे पानी घे. माज्या काय बाच जातय त्यामंदी ? ( असें ह्मणून देतो. )

कृ०—अरे रे रे रे !—आली कळ आणखी !—व्यर्थ प्यालों !—आली—आली—आली—फार आली !—आतां कसें करूं ? छेः; छेः; छेः; छेः !—आतां यांतून नाहीं वांचत ! शिव ! शिव ! शिव ! शिव ! शूः—शूः—शूः !—आईआई ! आईआई !—आई !

ज०—वाइस प्वाट रगडूं का सरकार ? ( पोट चेपूं लागतो तोंच. )

कृ०—अरे नको !—नको !—नको चेपूं !—चेपून काय होणार ?—कोणी कारे येथें नाहीं जयाजी ?

ज०—कोनबी नाहीं सरकार—समद गेल.

कृ०–कोणी नाहीं अं? अरे त्या ब्राह्मणाला तरी लौकर आण जा आधीं–अरे रे रे!–अरे चांडाळो जा लौकर! वाट कशाची पाहतोस? अं–अं:–अं:–

ज०–(मनांत) चांडाळा आन् फिंडाळा करून उगच का ल्येका शिव्या देतुयस? कुनी लेकान् रात आन् दीनभर तुज्या डोकशा भोतीं राव्हाव? तीन महिन झाल तरी हाय का पगाराच नाव? आन् ह्मन, जयाजी ह्ये कर–आन् जयाजी त्ये कर, करतुय जयाजी–जयाजीच अडलय! मर हतच! बामन बिमन चट सगळ गुंडाळून ठेवल आतां!–बसतोय आपला सवास्त घरामंदी. बायकूबरूबर तरी चार ग्वाष्टी करीन. (जातो.)

[इतक्यांत बळवंतराव व वासुदेवराव दाराजवळ येतात.]

बळ०–काय! येथें कोणीही दिसत नाहीं, आणि दार तर उघडें आहे.

वासु०–हं, हं–मोठ्यानें नका बोलूं. कदाचित् कृष्णरावांना झोंप लागली असेल. थोडी झोंप लागेल तर बरें असें डाक्तर मघा बोलत होते–लागली किंवा नाहीं हें हळूच जाऊन एके बाजूस उभे राहिलों ह्मणजे कळेल. लागली असल्यास आपण निमूटपणें परत जाऊं; व त्यांच्या समाचारास आणखी चार घटकांनीं येऊं.

(दोघे तसें करतात.)

कृ०–आई आई, आई आई!–किती दिवस हें दुःख मी सोसावें!–भगवंता? कां मला व्यर्थ गांजीत आहेस? हर! हर! हर!–त्या अंधारकोठडींत त्या रमणीची अवस्था काय झाली असेल कोण जाणे! सुंदरी, आतां तुझी माझी पुनः कशानें गांठ पडणार? आतां-या

दुखण्यांतून कसचा मी वांचतों ? तूं मला आतां दूर होणार अं ? शिव ! शिव ! शिव ! एक दोन दिवसांतच हें जग मला नाहींसें होणार हें खास ! तुझ्या प्रीती-करितां इतके श्रम केलेले सखे सर्व व्यर्थच होणार ना ? या अभाग्याकडून सेवा करून घेण्याचें नाहींच ना तुझ्या मनांत ? खरें आहे.—या कर्मचांडाळाला तूं कशाला विचारशील ? पाषाणहृदयी मी ! माझी कींव तुला काय ह्मणून येणार ? श्रीमान् वासुदेवराव तुझा पती, त्याचा त्याग करून या भिकारड्याचा अंगिकार कशाला करशील ? मोठी साध्वी तूं ! कशाही दुर्घट संकटांत पडलीस ह्मणून भलत्याच विचाराचा मळ तूं आपल्या आरशासारख्या स्वच्छ अंतःकरणावर कोठून बसूं देशील ? दुष्ट हेतु पोटांत धरून इतके तुझे हाल केले; पण नाहींच तूं या चांडाळाला वश झालीस! शाबास तुझी! हे सुशीले ! हे सुपतिव्रते! धन्य आहे तुझी ! किती मूर्ख मी ! विनाकारण तुला त्या चांडाळ सावित्रीबाईकडून फसवून आणून त्या भयाण वाड्यांत कोंडून ठेविली ! किती नाजुक तूं ! तुला तेथें चैन तरी कसें पडत असेल ? एका फाटक्या चिंधीवर कशी तुला झोंप येत असेल ? हर ! हर ! हर ! मरणोन्मुख झालों आहें, तरी त्या कुत्येला सांगून, अझून तरी तुझी सुटका करावी असें माझ्या मनांत देखील येत नाहीं ! किती कठोर मी ! अझून या दुखण्यांतून वांचेन आणि एकवार तरी तुझा मुखचंद्र पाहून आपले नेत्र शांत करीन या आशेला गुंतून व्यर्थ बसलों आहें ! [ इतक्यांत कळ येत्ये ] अरे रे रे रे !—ओय—ओयोय!

-ओयोय !-आयाई!-आयाई-अरे-बाहेर कोणी कारे नाहीं ?-अरे-कोणी तरी या इकडे! या लौकर!-लौकर या !-मरतों !-मरतों-मरतों ! रे मरतों आतां ! -आतां खास मरतों !-आयाई !-आयायी ! !—

बा०-[ हळूच ] जाऊं नका बळवंतराव इतक्यांत आंत ! खबरदार गेलां तर! तो मातागमनी आणखी काय बोलतो हें सर्व मला ऐकलें पाहिजे. या वेळेस येथें दुसरें कोणी नाहीं याबद्दल-भगवंता! मी तुझा ऋणी आहें ! अरे चांडाळा !

कृ०-आयाई !-आईग !-गेलीस मला टाकून ! अरे,-कोणी कारे नाहीं खालीं ? मरतों !-देवा !-मरतों आतां! अशा प्रसंगीं कोणी देखील मजजवळ नाहीं अं? खरें आहे.-कोण मला विचारतो ?-चांडाळा! तुला आतां कोण विचारतो !-मर असाच! भोग आपल्या पापांचीं फळें !-जा नरकांत !-कां नाहीं तुला असें मरण येणार ?-तुझीं पातकें काय लहानसान आहेत ? त्या साध्वीचा सर्वस्वीं नाश करण्याला, दुष्टा कारण तूंच. काय त्या माउलीनें तुझें वांकडें केलें होतें? तिच्या अक्षरासारखें अक्षर काढून त्या परोपकारी वासुदेवरावांची भलतीच समजूत घालून दिलीस, आणि येवढी साध्वी असून ती जारिणी आहे असा त्यांच्या मनाचा पक्का ग्रह करून दिलास ! निरपराधी असतां गोपाळरावांना विष दिलेंस हें लहान पातक काय ? हर ! हर। नारायणा ! एकेक दुष्टकृत्याची स्मृति होऊं लागली ह्मणजे आंगावर कांटाच उभा राहातो !-कितीकांचे-पैसे तर बुडविले !-ज्याप्रमाणें क्षुधिताच्या

तोंडांतून पंचपक्कान्नाचा घांस काढून घ्यावा त्याप्रमाणें कितीएक तरूण पुरुषांच्या अबला काढून आ न भ्रष्ट केल्या—जात्याच दुष्ट मी ! आणि तशांत त्या ंडाळ सावित्रीबाईची मदत मिळाली, मग तर माझ्या दृष्ट-कृत्यांचा कळस झाला ! या राक्षसिणीची गांठ पड ी नसती तर तिच्याजवळ विष आहे हें मला समज असतें कशाला ? आणि तें बिचाऱ्या गोपाळरावांना देण्याचें माझ्या मनांत तरी कशाला आलें अ तें ? असो. तिच्याकडे तरी काय बोल? मीच पापी!—मीच चांडाळ!—मी सांगितलें नसतें तर तिनें कशाला केलें असतें? शिव ! शिव ! शिव ! काय माझी योग्यता ? हीं दुष्टकृत्यें कोणाला समजलीं, तर, जोड्याजवळ देखील मला उभा राहूं देणार नाहींत, मग त्यांबद्दल त्या सर्वसाक्षी परमेश्वराला कां नाहीं विलक्षण क्रोध येणार? आजपर्यंत त्यानें सर्व अन्याय पोटांत घातले ! आतां तो झाला तरी, एक अन्याय पोटांत घालील, दोन घालील, तीन घालील—परंतु एकसारखा तोच क्रम ठेविला तर त्याला कसा नाहीं राग येणार?—भगवंता ! जें मला शासन केलेंस तें यथायोग्य आहे!—यांत मी मरणार खास ! त्याबद्दल मला मुळींच वाईट वाटत नाहीं ! परंतु त्या निरपराधी सुकुमार साध्वीची त्या बंदीखान्यांतून सुटका कशी होणार ?—मजजवळ विषाच्या उताराचें औषध आहे खरें, पण तें गोपाळरावांस नेऊन देणार कोण ?—वासुदेवरावांस शरण जाऊन सर्व अन्याय उघडपणानें पदरांत घ्यावे तर तिकडूनही वाईट! एक दोन दिवसांनीं मरावयाचें तें

आतांच मरावें लागेल ! काय करावें !—कांहीं सुचत नाहीं !! [ इतक्यांत कळ थांबते. ] अरे पण ! कां ही वेड्यासारखी कल्पना करितों ? भलभलतेंच विचार काय ह्मणून माझ्या मनांत येतात ? मला इतक्यांत मरायास काय झालें ? शेंकडो मनुष्यांना अशीं किंवा याहूनही जिवावरलीं दुखणीं येतात ह्मणून तीं लागलींच मरतात कीं काय ? छेः ! असें होणेंच नाहीं ! कृष्णराव असा काय तूं डगमगतोस ? थोडा धीर धर ! अरे, असल्या प्रकारचे विकट प्रसंग शेंकडोदां मनुष्यावर येतात, ह्मणून त्याबद्दल उदास व्हावें कीं काय ? अरे वासुदेवरावांचा स्नेह जोडलास कशाकरितां ? त्यांच्या घरीं सावित्रीबाईला कोणत्या उद्देशानें ठेविलीस? त्या सुंदरीला कशाकरितां फसवून आणिलीस ? भलभलतेच व्यूह रचून तिच्याविषयीं कां त्या भोळ्या सांभाचें मन विटविलेंस ? आंब्यांतून त्या सज्जन गोपाळरावांला असलें हालहाल करून मारणारें हालाहल कशाकरितां देवविलेंस ? या सर्व गोष्टींचा कांहीं विचार कर. भिड्यासारखा काय गडबडतोस ! येवढा खटाटोप केलास तो काय केवळ वासुदेवरावांस कळविण्याकरितां ! [ बळवंतराव ( हळूच ) " यांत काय संशय ? " ] वः फारच शहाणा तूं ! तुझा जीव वर आला आहे कीं काय ? मरण येईना, ह्मणून वासुदेवरावांच्या हातून मरावें ? येवढ्याचकरितां येवढा डोंगर पोखरलास ?—छेः ! अरे ! दुखणें दुखणें ह्मणजे काय ? होशील बरा चार दिवसांनीं ! असाच राहतोस कीं काय ? वेड्यासारखे प्राण देण्याच्या हेतूनें माझ्या प्रियेनें माने-

वर विळीनें जखम करून घेतली तीही बरी होत आली. चांगली बरी झाल्यानंतर त्या सुंदरीशीं विलास भोगतांना आणि तिच्या अधरांचें चुंबन घेतांना किती आनंद होईल याचा विचार कर! अरे—

वासु०—( असें कृष्णरावाचें भाषण ऐकतांच धांवत धांवत मोठ्या त्वेषानें येऊन कृष्णरावांचें नरडें धरून )—मातागमन्या! कोणाच्या तूं अधरांचें चुंबन करणार रे? नीचा! कोणाशीं रे तूं विलास भोगणार?—बोल लवकर! मांगा! लौकर बोल! बोलतोस कीं नाहीं? का असाच घेऊं प्राण? बोल बोल लौकर!!

बळ०—वासुदेवराव! हें काय हें? करतां काय तुह्मी?—असा गळा चेपाल तर प्राण जाईल हो त्याचा!

वासु०—खबरदार बळवंतराव येथें एक ब्र काढाल तर! ऐकलीं नाहींत काय ह्या मांगाचीं कृत्यें तुह्मीं?—बसा तिकडे जाऊन स्वस्थ! नाहीं तर आपल्या वरीं, चालते व्हा!

कृ०—( गळा चेपल्यामुळें ) मरतों! मरतों! मरतों! सोडा मांझा गळा कृपा करून वासुदेवराव! सोडा! सोडा हो सोडा—जीव गुदमरतो—सोडा!

वासु०—चूप! चूप!—खबरदार जास्त वटवट करशील तर! बोल लौकर उताऱ्याचें औषध कोठें आहे तें!—बोलतोस कीं नाहीं! का देऊं एक लाथ!

कृ०—बोलतों—बोलतों पण गळ्यावरून अम्मळ हात काढा! ( वासुदेवराव तसें करतो. )—त्या टेबलांत पुडी आहे ती पहा.

वासु०—बळवंतराव, पहा हो कोठें आहे ती पुडी लौकर!

( कृष्णरावाकडे वळून ); चांडाळा! सांग. ( असें ह्मणतांना दांत ओठ खाऊन एक ठोसा कृष्णरावाचे छातींत मारतो. ) लौकर कोठें आहे ती !

कृ०—सांगतों ! सांगतों ! नका असें मारूं मला ! बळवंतराव, मरतों हो मी आतां ! गळ्यावरचा हात काढण्याला, वासुदेवरावांना तुह्मी तरी सांगा !

बळ०—काय सांगा काय ?—सांग अगोदर पुडी कोठें ठेविली आहेस ती ! तूं असा खाटिक असशील हें नव्हतें मला ठाऊक !

वासु०—अरे ! बोल ह्मणतोंना पुडी कोठें ठेविली आहेस ती ? [ असें ह्मणून एक लाथ देतात. ]

कृ०—नका, नका, नका,—असा मारूं !—तुमच्या पायां पडतों बळवंतराव, अहो बळवंतराव, तेथेंच उजवीकडच्या बाजूस पुडी एका कागदांत गुंडाळून ठेविली आहे. काढा ती लौकर आणि लिंबाच्या रसांतून द्या ह्मणजे आतां गोपाळराव बरे होतील.

[ बळवंतराव पुडी काढून घेतात. ]

वासु०—बोल लौकर कृतघ्ना, माझी प्रिया कोठें लपवून ठेविली आहेस ती ! तस्कराप्रमाणें चोरून नेण्याची, गाढवा, तुला भीति वाटली नाहीं ? कांहीं लाज वाटली नाहीं ? बळवंतराव, पहा हा कृतघ्न चोर बोलत नाहीं ! मारा दोन खेटरें मादरचोदाच्या मुसकटांत बघतां काय ?—तमाशा पहायला येथें आलांत वाटतें !

बळ०—काय वासुदेवराव हें ! व्यर्थ आतां संतापून काय उपयोग ? मेल्यापेक्षां मेला झाला आहे तो. त्याला खेटरें मारलीं काय आणि न मारलीं काय सारखींच. पुढचा

विचार (मह. गोपाळरावांची अवस्था तिकडे काय झाली असेल, हें पाहिलें पाहिजे. चला—आटपा— [ कृष्णरावाकडे पाहून ] कायरे निर्लज्जा !—बोल लौकर बाईनींना कोठें ठेविल्या आहेस त्या, नाहीं तर घेतलाच तुझा प्राण !!

वासु०—चांडाळा !—बोल लौकर कोठें आहे ती !—हं—

कृ०—माझ्यानें नाहीं हो बोलवत आतां वासुदेवराव ! क्षमा —क्षमा मजवर—मजवर आतां क्षमा करा. कोण या घरांत त्या आहेत, हें सावित्रीबाई सांगेल,—जा लवकर तुह्मी, नाहीं तर गोपाळराव या जगाला फुकट आंचवतील ! वासुदेवराव, सर्वस्वी मी अपराधी आहें हें सांगायला नकोच !—जेथें मी प्रत्यक्ष बंधूचें नातें ठेवावें तेथें—वासुदेवराव, मी कोण चांडाळ !—नाहीं !—चांडाळाचेंही मन असें कर्म करण्यास धजणार नाहीं. जेव्हां माझ्या मनांत हा दुष्ट विचार आला तेव्हांच कां रे यमधर्मा !—माझा प्राण घेतला नाहींस?—या—बळवंतराव ?—तुह्मी आतां तरी द्या !

वासु०—बस !—बस !—बस !—बस !—बैस गप्प !—जास्ती बचबच् करशील तर जीभ कापून टाकीन ! चला बळवंतराव ! या मांगापाशीं बसून काय उपयोग ? त्या रांडेचा समाचार घेतला पाहिजे !—कोण रांड दुष्ट !!

( जातात. )

कृ०—वासुदेवराव, बळवंतराव, जाऊं नका. माझा घसा वाळून चालला. घोटभर पाणी द्या. गेले ते ! मजजवळ पाणी देण्याला कोणी नाहीं ! अरे—हीं अक्राळ विक्राळ भुतें मजकडे कशाला येतात ? अरे—नका नका. माझ्या

अशा निर्दयपणानें मुसक्या बांधूं नका. सोडा. पायां पडतों सोडा. अरे—ह्या डागण्या तापवून कशाला आ- णतां? अरेरे! असे नका डागूं! ओय ओय! हाय हाय! अरे—नका डागूं. अरे—नका डागूं. मी अशीं पातकें पुन्हा खचीत, खचीत करणार नाहीं. नका डागूं. नकारे अशा सुया टोंचूं. अरे—पुन्हा आणखी कशाला डागतां? ओय ओय! अरे—नकारे! अरे—आंगाची भडका झाली. तहाने लागली. पाणी द्यारे. पाणी द्यारे. प्राण चाल- ला. पाणी, पाणी, पाणी! ( प्राण जातो. )

जयाजी—आतां हा बामन तर गेलाच—ह्याला कोन न्हेईल आतां! त्याच्या वळखीच्या बामनांना बोलावलं फाइजे. ( इतक्यांत पोलीस इन्स्पेक्टर येतो. )

पो० इ०—कायरे, कृष्णरावांचें कसें आहे?

ज०—कसंच काय म्हाराज! आतांच आटपलं!

पो० इ०—आटपलें! अरेरे! वाईट झालें! पोलीस सरकारचे हुकुमाप्रमाणें कामगिरी केली पाहिजे. कायरे जयाजी, सावित्री नांवाची बायको कोणी कृष्णरावाकडे येत असे?

ज०—व्हय महाराज.

पो० इ०—तिला लिहितां वाचतां येतें?

ज०—व्हय म्हाराज, येत. तिन लिहल्याली लई पत्र मीं आमच्या म्हाराजाकड आनली हायत.

पो. इ—असें काय? कृष्णराव कागदपत्र कोठें ठेवीत असे- त हें तुला माहीत आहे?

ज०—या टेबलांत आन् त्या पेटींत. ( हातानें दाखवितो. )

पो. इ.—( सर्व कागदपत्रें काढून एक एक पाहातां पाहा- तां ) अरे हेंचरे हेंच सांपडलें. भरलीं तिचीं शंभर वर्षें!

पोलीस, चला आतां. अयाजी, प्रेताला इतक्यांत ने-ण्याचा हुकुम नाहीं. एका शिपायाला तुझे जवळ ठेवि-तों. पुढें कसें काय करायचें तें तुला लवकरच कळेल. येथून दोघे कोठें जाऊं नका. (असें ह्मणून एक शिपाई ठेवून बाकीचे शिपायी बरोबर घेऊन जातात.)

---

# अंक सहावा.

## प्रवेश तिसरा.

### स्थळ ओसाड वाडा.

वासुदेवराव.—बळवंतरावाजवळ तर उताऱ्याचें औषध देऊन गोपाळरावाकडे पाठविलेंच. हजार हिश्शानें उतार पडेल. काय! हाच तो वाडा! सांगितल्या-प्रमाणें याच्या तर सर्व खाणाखुणा जमतात. कितीतरी ओसाड वस्तीमध्यें आहे! साधारण मनुष्याला येथें खचीत भय वाटेल आणि त्या दुष्टानें माझ्या प्रियेला येथें कोंडून ठेविली आहे अं! प्रिये, प्रिये, कितीग मी चांडाळ! ज्या तोंडांतून तुझे हाल हाल करावे असें शब्द निघाले तें हें घाणेरडें तोंड एकदम आग लागून जळून कां जाईना. एकदम त्यांत घाणेरडे किडे पडून घागरीच्या घागरी पू कां निघेना. जिला भेट-ण्याला यत्किंचितही धास्ती वाटूं नये तिला भेटायला जायचें तर असे पाय लटलटा कापावेत काय? कां नाहीं कापणार? मागा हीं तुझीं भयंकर कृत्यें बरें! शिव. शिव. काय करूं. कशी मी तिची भेट घेऊं.! (इतक्यांत त्या वाड्याचें दार विश्वासराव उघडीत

आहेत असें दृष्टीस पडतें ) काय, विश्वासराव येथें आहेत ! विश्वासराव—

विश्वासराव.—(हात जोडून) महाराज.

वासुदेवराव.—विश्वासराव, तुह्मी इकडे कोणीकडे. आणि हे शिपाई कशाकरितां ? ( मनांत ) भलत्याच वाड्याकडे तर मी आलों नाहींना ?

विश्वासराव.—महाराज, आतांच हें दार मोठ्या प्रयासानें उघडलें. कृष्णरावानीं कोण्या एका स्त्रीला येथें कोंडून ठेविली आहे असें गोपाळरावजीस कळल्यावरून तिला सोडवून आणण्याकरितां त्यांनीं मला पाठविलें आहे.—आपण इकडे कशाकरितां आलांत ?

वासुदेवराव.—शिव. शिव ! तोच वाडा अरे ! तोच हा ! हायरे गोपाळराव ! ( असें ह्मणत धाडकन् जमिनीवर पडतो. ) मरणोन्मुख झाला आहेस तरी माझ्या कल्याणाकरितां झटतोस ना. गोपाळराव, तूं बाबा मनुष्य नव्हेस. खास ईश्वर आहेस. बाबारे ही मनुष्याची करणी नव्हे. पहा मी कसा राक्षस या भूतलावर जन्मास आलों. अरे सर्व शहरांतील पिसाळलेल्या कुत्र्यानों, या माझ्या पातकी देहाचे लचके तोडून चाऊन चैंधी काढून मला वेड का लावून टाकीनात. ( स्फुंदून रडूं लागतो. )

विश्वासराव.—वासुदेवरावजी, काय झालें काय ? रमाबाई का येथें आहेत ?

वासुदेवराव.—होय हो विश्वासराव. तीच, तीच आहे. हे सुपतीव्रते धिःकार असो मला. माझ्यानें आतां बोलवत नाहीं. चला आंत लौकर विश्वासराव. शिपायांनीं येथेंच

उभे [illegible]आ. ( वासुदेवराव विश्वासरावास आंत घेऊन जातात. तों रमाबाई निजलेली दृष्टीस पडते. वासुदेवराव, तिच्या आंगावर पडून ) प्रिये, प्रिये, उठ. या दीनाकडे पहा.

रमा.–( एकदम जागी होऊन उठून वासुदेवरावास न ओळखतां झिटकारून देऊन ) चांडाळा कृष्ण्या, अजून कां रे तुला दया येत नाहीं ? दुष्टा, ही जीभ [illegible]टून प्राण सोडते पहा. ( असें ह्मणून जीभ हातांत धरते आहे तोंच. )

वासुदेवराव.–( रमाचे हात धरून ) हां हां प्रिये, भलतेंच करूं नको. प्रिये, मी तो चांडळ कृष्णराव नव्हे. पहा नीट, मजकडे पहा.

रमा.–( वासुदेवरावास ओळखून त्यांचे वट्ट पाय धरून ) काय ? मी स्वप्नांत तर नाहींना ! काय ? [illegible] कारागृहांतून सोडवून मला नेणार ? आपल्या घरीं नेणार ? या पायाची सेवा या हतभागीचे हातून घडणार ? नाहीं, नाहीं, रमे ! कुठलें ग एवढें तुझें भाग्य ! अशाच [illegible]तना तूं निरंतर सोसाव्यास असें ब्रह्मदेवानें तुझ्या कपाळीं लिहिलें आहे. व्यर्थ स्वप्नावस्थेंत कां आनंद मानून घेतेस ! हल्लीं, जी विपत्ति भोगीत आहेस ही कांहींच नाहीं. यापेक्षां सहस्रपट यातना तूं भोगाव्यास ह्मणून ग रमे येथें मुद्दाम येणें झालें आहे. महाराज, मी समजलें. न विचारतां मी घरांतून निघून आलें याबद्दल मजवर राग झाला आहे खास. तसें असल्यास आतांच या जगांतून मला नाहींशी करा. ( रडूं लागते. )

वासुदेवराव.–प्रिये, ऊठ. ऊठ. महदन्याय मा. आजवर माझ्याकडून झाले त्याची तूं क्षमा कर ( रमाच्या गळ्यावर हात ठेवून ) तुझ्याच गळ्याची शपथ प्रिये. आजपासून तुझ्या पायाचा मी दास झालों आहें. जन्मपर्यंत तुझी लुगडीं धुतलीं तरी नाहींग प्रिये नाहीं माझ्या अन्यायाचें ओझें कमी होणार. फार फार या दुष्टानें तुझा छळ केला. नाहीं नाहीं तें बोललों याबद्दल प्रिये आतां नको राग धरूं. ऊठ आणि कृपा दृष्टि करून मजकडे पहा.–

रमा०–( उठून मिठी मारून ) हें काय बरें असें बोलून धरलें, मागचें सगळें मी विसरलें.–देवानें हा मला दिवस दाखविला याबद्दल त्याची मी ऋणी आहें. या नरक वासांतून मात्र लौकर मला काढावें.–

वासुदेवराव–( अनुवकीस हात लावून ) हें काय सांगावें? त्वरा करून मी धांवत आलों प्रिये. ( तिच्या मानेवर प्रेमानें हात फिरवून ) बरें तुझ्या मानेवरच्या जखमेचें कसें आहे?

रमा–पुष्कळ बरी होत चालली. काळजी करूं नये. पण हें सर्व इकडे समजलें कसें?

वासुदेवराव–चल येथून प्रिये. वाटेनें सर्व मी तुला सांगतों. गाडी बाहेर तयार आहे. ( असें ह्मणून रमाला हातांत धरून जातां जातां ) विश्वासराव चला मजबरोबर.

विश्वासराव–ठीक आहे चलावें.—

( सर्व जातात. )

## अंक सहावा.

### प्रवेश चवथा.

स्थळ-गोपाळरावांचा वाडा.

(गोपाळरावांस झोंप लागली आहे. जवळ बळवंतराव बसले आहेत इतक्यांत वासुदेवराव व विश्वासराव येतात.)

वासुदेवराव.-(हळूच) बळवंतराव, त्या उताऱ्यानें कांहीं गुण आला?

बलवंतराव.-बराच आला. कितीएक दिवस त्यांना झोंप कशी ती ठाऊक नव्हती. हा उतारा घेतांच पहा कशी झोंप लागली आहे. बरें, रमाबाईना आणल्या का?

वासुदेव०-इकडेच घेऊन आलों आहे. सरस्वती वहिनीजवळ बसली आहे. मानेवरची जखम पुष्कळ बरी होत आली. (गोपाळरावजीकडे बोट दाखवून) यांना झालेली सर्व हकीकत सांगितलीत? आता

बळवंत०-सर्व सांगितली. तुह्मी येथें येण्याचे पूर्वी कृष्णराव वारल्याचें वर्तमान गोपाळरावांचे नोकरानें सांगितलें. म[illegible]ळेस त्याचे फार हाल हाल झाले असें ह्मणतात.

वासुदेव०-म[illegible]से पूर्वी त्या हरामखोराला तापलेल्या कढईंत टाकलें असतें तर बरें झालें असतें. अरे हो, त्या अवदसा सावित्रीबाईला मीं येईपर्यंत घराच्या बाहेर बिलकुल जाऊं देऊं नका ह्मणून सर्व नोकर लोकांना सांगून ठेविलें आहे. पहातों तिचा समाचार काय आहे तो.—

बळवंत०-(हळूच) मोठ्यानें बोलूं नका.

मोडु [illegible]ईल.—

गोपाळ०—(झोंपेंत बडबडतो) अहाहा ! भगवंता, किती मला आज बरें वाटतें. इतकीं दुसरीं औषधें घेतलीं पण व्यर्थ.—(कांहीं वेळ थांबून) अरे राम ! किती तो दुष्ट उलट्या काळजाचा. मित्राशीं दुष्टी ! आणि रमा वहिनीवर ! शिव ! शिव ! शिव ! किती पातक हें ! ईश्वरा, जे दुसऱ्यांच्या अबलांना पापदृष्टीनें पहातात, त्यांना त्याचवेळेस कां आंधळे करून टाकीत नाहींस? काय या जगांत मौज आहे ! एखाद्याचें चांगलें करायला जावें तर त्याला तें रुचत नाहीं. एवढेंच नाहीं, तर त्याला जगांतून नाहींसा करून टाकण्याचा प्रयत्न करायचा. परंतु सत्य तें सत्य. सत्याचा जयच व्हायचा.

वासुदेव०—(हळूच) शाबास गोपाळराव शाबास. धन्य आहे तुमची. किती जन्म त्या मातेनें ईश्वराची उपासना केली असेल, तेव्हां असलें रत्न ती प्रसवली. नाहीं तर आलो

गोपाळ०—(जागे होऊन) कोण बोलत आहे ?

वासुदेव०—(उठून गोपाळरावांचे पाय घट्ट धरून) मी खून करणारा, साध्वी स्त्रियांचा छल करणारा, चांडाळ पातकी, अधम, कृतघ्न असा वासुदेव आहे.—

गोपाळ०—वासुदेवराव, काय हें ? उठा. असे पाया पडूं नका.—

वासुदेव०—गोपाळराव, या तमच्या दुखण्याला मी दुष्ट, मज चांडाळ कारण. भगवंता, कशाला या चांडाळाला विश्वासराव... (?) ...लास. गोपाळराव, तो दुष्ट कृष्णराव तुम्हावर ...रणार, याची वार्ता देखील हो मला नव्हती. ...र त्या मांगानें मजजवळ ...तलें.

गोपाळ०—ईश्वर साक्ष आहे. हें वर्तमान ऐकतांच माझें काळीज फाटून गेलें. रात्रंदिवस चैन नाहीं. रात्रीं जरा डोळा लागला, तर सकारांतून धरणें आलें असें मला वाटावें. हा चांडाळ त्याविषयीच उतारा औषध आहे असें बोलता तर आजला तुह्मी चांगले बरे झाले असतां. तो दुष्ट काय बोलला, हें सर्व बळवंतरावांनीं तुह्मांजवळ सांगितलेंच असेल. अखेरपासून अखेरपर्यंत मी चांगला फसलों. मला चांगली अद्दल घडली, ( हात जोडून ) आतां एवढेंच हात जोडून मागणें मागतों कीं, सर्व अपराधांची क्षमा करा. पुन्हा अशी गोष्ट कालत्रयीं माझ्या हातून होणार नाहीं. गोपाळराव, काय माझी योग्यता! ( रडूं लागतो. )

गोपाळ०—वासुदेवराव, काय हें. बिलकूल [illegible] गतगोष्टी सर्व मी विसरलों.—

वासुदेव०—धन्य, धन्य, गोपाळराव. धन्य आहे तुमची. खरोखरी क्षमेचे सागर आहांत.—( रडूं लागतो. )

गोपाळ०—हें काय बरें. पुरे आतां. रमा वहिनींना आणल्यात ?

वासुदेव०—होय, सरस्वती वहिनीजवळ आंत बसली आहे. आणतांना बरोबर विश्वासराव होतेच.—

गोपाळ०—विश्वासराव, दोघींना इकडे घेऊन या.

विश्वास०—बरें आहे. ( जातो आणि दोघींस घेऊन [illegible]

रमा—( गोपाळरावास नमस्कार करून ) भा[illegible] हून ( वासुदेवरावाकडे बोट दाखवून [illegible] त्रास झाला असेल तर त्याची [illegible]

स्वती तूंही सर्व गोष्टी विसरून पूर्वीप्रमाणें आह्मांवर लोभ ठेव. होऊं नये ती गोष्ट होऊन गेली. आतां कांहीं मनांत आणूं नको.

अरुन्धती.—माझ्या कांहीं मनांत नाहीं. मुलांना मी क्षमा केली आहे.

वासुदेव०—गोपाळराव, वहिनी, जसा तुमचा मी अन्यायी आहें तसाच हिचाही आहें. हिला या दुष्टानें फार छळलें. माझें तोंड हिनें पाहूं नये अशी माझी योग्यता आहे, तरी सर्व अपराधांबद्दल तुह्मांदेखत हिनें मला क्षमा करावी एवढेंच माझें मागणें आहे.

रमा०—हें काय भलतच बोलणं? (इतक्यांत रामचंद्र गडबडीनें येतो.)

गोपाळ०—कांरे, रामचंद्र, इतकी लगबग कसली?

रामचंद्र—(वासुदेवरावाकडे पाहून) महाराज, आपल्याकडे नायकीण असलेल्या बाईला इतक्यांत पोलिसांनीं पकडून नेतांना मीं पाहिलें.

गोपाळ०—(आश्चर्यानें) काय! सावित्रीबाईला! आणि तें कशाकरितां!

वासुदेव०—आमच्या बाईला!

रामचंद्र—होय, आपल्या गांवीं कोणा एकाला चार दिवस सांपूर्वीं वीष घालून मारून ती इकडे पळून आली, विश्वासतिला पकडण्याचे खटपटींत तिकडचे अम्मलदार ... त्यांना ती इकडे असल्याचा सुगावा लागून ... अम्मलदारांचे मदतीनें तिला पकडली. ... तिच्या स्वदस्तुरचें पत्र कृष्णा... ...लें. आणि विषप्रयोग केला ह...